१० जून १९६७
चाळीस पैसे




दाक्षिणात्य उंट आणि मराठी अरब

## सहर्ष घोषणा

• •

### नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

• •

### राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

• •

## सप्रेम भेट योजना . . .

पहा : कव्हर पान तीन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : दुसरा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## पत्रमैत्री

स. न. जून, २

गेल्या सहा वर्षातील ' माणूस 'ने केलेली प्रगती स्पृहणीय तर आहेच शिवाय मराठी वाचकांना दर्जेदार असे वैचारिक खाद्य पुरवून मराठी वाचकांना जिंकले आहे. जाहिराती आणि हलक्या प्रतीच्या साहित्याला बळी न पडता उच्च अभिरुची संपन्न व वैचारिक साहित्य प्रसिद्ध करण्यात ' माणूस ' महाराष्ट्रात अग्रेसर ठरले आहे हे नि:संशय.

वर्षारंभाचा ३ जूनचा अंक कालच आणला. मराठी लेखकांनी मद्रासला केलेल्या दौऱ्याचा श्री. ज. जोश्यांचा प्रथम वृत्तांत, रंजक वाटला. प्रत्यक्ष राजकीय बातमीपत्रांची उत्सुकतेने वाट पाहत आहे.

' उर्दू वार्ता ' सदरात राष्ट्रपती निवडणुकीच्या निमित्ताने मांडलेले निर्भिड विचार कोणत्याही हिंदुत्वनिष्ठ वाचकास पटणारे आहेत. निधर्मीपणाचा टेंभा मिरविणाऱ्या काँग्रेसवर केलेली टीका यथायोग्यच वाटते. असेच वैचारिक लिहीत जाणे.

' गफूरमियाँ ' कथा भावस्पर्शी वाटली. ' रसिक कौल ' लेख बरा वाटला. नाट्यपरिक्षणाच्या सदरातील ' शिगरू मेलं हेलपाट्यानं ' हे परीक्षण व त्यावर गोखल्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय अगदीच ' तोंडभरू ' वाटला. पण हलकीफुलकी करमणूक करणारे लोकनाट्य हा अभिप्राय एकंदर परीक्षणात योग्य वाटला. लोभ आहेच तो वृद्धिगत व्हावा ही इच्छा.

प्र. मा. अकलूजकर, पुणे

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# बिहार परिवार

एप्रिलचा शेवटचा आठवडा. कुमार सप्तर्षींच्या परीक्षेचा शेवटचा दिवस. प्रॅक्टिकल आटोपून रात्री ८-८। च्या बेताला ते कॉलेजमधून तडक श्री. ग. माजगावकर यांच्या घरी येतात. अनिल अवचट ठरल्याप्रमाणे आले नाहीत याची चौकशी करण्यासाठी अरुण साधू यांच्या दोन-चार चकरा झालेल्या असतात. शेवटी पानावर चौघेजण बसले तेव्हा घड्याळाचा काटा ९॥ च्या पुढे सरकलेला असतो.

रात्र चढत चालली तसे बोलणे मुख्य विषयाकडे वळलेले आहे—बिहार आणि पुण्यातील विद्यार्थीवर्ग—त्यातल्या त्यात 'यूथ ऑर्गनायझेशन.'

पाचशे दुष्काळग्रस्तांसाठी एक अन्नछत्र कमीत कमी एक महिन्यासाठी, जास्तीत जास्त तीन महिन्यांसाठी चालविण्याची संपूर्ण जबाबदारी उचलावी. निधी गोळा करण्यापासून बिहारात जाऊन प्रत्यक्ष अन्नछत्र चालविण्यापर्यंत. या कल्पनेवर बराच खल होतो. बिहारसाठी काहीतरी, कुठेतरी वेगवेगळे करण्यापेक्षा अशी लहानशी जबाबदारी पूर्णपणे उचलण्यात विद्यार्थ्यांना कामाचा प्रत्यय येईल, उभारणीचे समाधान लाभेल व तऱ्हेतऱ्हेचे अनुभव येतील ही, हा कार्यक्रम सुचवण्यामागील श्री. ग. माजगावकर यांची दृष्टी होती.

आठवडाभर यावर अधिक विचार झाला. 'माणूस' कार्यालयात दुसरी बैठक भरली. वरील चौघांव्यतिरिक्त या बैठकीला 'यूथ ऑर्गनायझेशन'चे आणखी ८।१० कार्यकर्ते होते—शिवाय मावळ सेवा मंडळाचे श्री. चिंचलीकरही ऐनवेळी उपस्थित झाले. 'माणूस प्रतिष्ठान' आणि 'यूथ ऑर्गनायझेशन' यांनी संयुक्तपणे 'बिहार दुष्काळ निवारण प्रकल्प' सुरू करावा यावर एकमत झाले.

'दुष्काळ निवारण' हा शब्द सर्वांनाच खटकत होता. कारण वापरून वापरून तो फार गुळगुळीत झालेला आहे. म्हणून 'बिहार परिवार' हे नामकरण. शिवाय निधी जमवण्याच्या कार्याला 'परिवार' या शब्दामुळे येणारा कौटुंबिक जिव्हाळ्याचा वेगळाच स्पर्श.

पावतीपुस्तके, पत्रके छापून व्हायचीच होती, पण आळंदीहून तेथील बँक ऑफ

# एक महिना



महाराष्ट्र शाखेचे प्रमुख श्री. कुलकर्णी 'माणूस'कडे एक आमंत्रण घेऊन आले. एकादशीला आळंदीला चांगली यात्रा भरते, ठिकठिकाणांहून लोक जमतात. या संधीचा फायदा घेऊन एक सभा घेण्याचे आळंदीच्या काही प्रमुख व्यक्तींनी ठरविले आहे, या सभेत बिहार दुष्काळाची माहिती सांगण्यासाठी 'माणूस'ने आपला प्रतिनिधी पाठवावा, म्हणजे मदत गोळा करणे सोपे जाईल.

आळंदीचा प्रसाद म्हणून हे निमंत्रण चटकन स्वीकारले आणि अरुण साधू (माणूस) व डॉ. बिडवे (यू. ऑ.) हे एकादशीला सभेसाठी आळंदीला रवाना झाले. या सभेत जागच्या जागी एकशे एक्कावन्न रुपये व रोख मदतीची काही आश्वासने मिळाली. धान्यमदतही अनेकांनी देऊ केली.

'माणूस' परिवारापैकी सौ. निर्मलाबाई पुरंदरे यांच्या लंडनमधील एका मैत्रिणीने पाठवलेली पाच पौंडाची पोस्टल ऑर्डरही एक दिवस अचानक कार्यालयात दाखल झाली. या मैत्रिणीने 'माणूस'मधील बिहारवार्तापत्रे वाचली आणि चटकन् जमली ती मदत लगेच पाठवूनही दिली.

आळंदी ते लंडन–बिहार परिवाराच्या कामाला तडाखेबंद सुरुवात झाली होती. फक्त पावतीपुस्तके, पत्रके वगैरेंचा अजून पत्ता नव्हता.

मे महिना उजाडला. अगदी सुरुवातीलाच कोल्हापूरहून डेप्युटी कलेक्टर श्री. भोसले 'माणूस' कार्यालयात बिहारसंबंधी अधिक माहिती मिळवण्यासाठी दाखल झाले. कोल्हापुरात अन्नधान्य, रोख रक्कम, कपडे व औषधे इत्यादी मदत जमा करून पंधरा-वीस विद्यार्थ्यांची तुकडी घेऊन बिहारला जाणे, तेथे महिनाभर राहून या मदतीचे वितरण डोळ्यांदेखत करणे, ही श्री. भोसले यांची कल्पना 'बिहार रिवारा'च्या कल्पनेशी मिळती जुळतीच होती, त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या कार्यात अधिक संबंध व संपर्क साधण्याचे चटकन ठरले.

१० मे रोजी ही कोल्हापुराची तुकडी पुण्यास यायची होती. 'बिहार परिवारा'तर्फे या तुकडीचे स्वागत करावे असे ठरले व या तुकडीला व्यवस्थित वेळेवर हजर करण्यासाठी पुण्याहून खास प्रतिनिधीही रवाना झाला–मानवेंद्र वर्तक.

'शिवाजी मंदिर' ही स्वागत कार्यक्रमाची जागा. सायंकाळी ५।। ही वेळ. लाऊडस्पीकरपासून पाण्याच्या तांब्यापर्यंत सर्व व्यवस्था चोख होती. निमंत्रणे गेली होतीच. आणि ४ वाजता 'माणूस' कार्यालयात कोल्हापूरचा ट्रंककॉल घणघणला. तुकडीला निघायला चार तासाचा उशीर झालेला आहे. ठरल्या वेळी तुकडी पोहोचू शकत नाही.

पण सभा ठीक ५।। ला सुरू झाली. प्रारंभी कुमार सप्तर्षी यांनी 'यूथ ऑर्गनायझेन'ची माहिती सांगितली. भाषणाचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग असल्याने त्यांनी चार-पाच मिनिटांतच आवरते घेतले. नंतर श्री. ग. माजगावकर यांनी थोडक्यात 'बिहार परिवारा'मागील भूमिका विशद केली. -'पंतप्रधानांचा, महापौरांचा निधी असला तरी कुणी कार्यकर्ते यासाठी घरोघर जाऊ शकत नाहीत. त्यामुळे वृत्तपत्रातील आवाहने हवेत राहतात, इच्छा असूनही जनता प्रवृत्त होऊ शकत नाही, म्हणून असे छोटे छोटे स्वतंत्र प्रकल्प. शिवाय मोठमोठ्या निधींचे काय होते, शेवटपर्यंत आपण दिलेली मदत पोचते की नाही याची जनतेला नेहमी शंका वाटत राहते. यापेक्षा लहानसा निधी, आपल्या ओळखीच्या, विश्वासाच्या माणसाजवळ दिला तर लोकांना अधिक खात्री वाटण्याचा संभव'...इत्यादी मुद्दे.

कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करणारा ठराव संमत झाला.

कुणी कुलकर्णी नामक एक मुलगा भाषण करायचे आहे म्हणून पुढे आला व त्याने, त्याला स्कॉलरशिप म्हणून मिळालेले ५१ रुपये तिथल्या तिथेच 'बिहार परिवाराच्या स्वाधीन केले.

श्री. रावसाहेब पटवर्धन यांनी उचित समारोप केला.

सभेला उपस्थिती चांगली होती. संख्येने नाही, गुणवत्तेने; सर्वश्री मोहन धारिया, रामभाऊ म्हाळगी, ग. प्र. प्रधान, नामदेवराव मते, 'तरुण भारत'चे संपादक चं. प. भिशीकर, वा. ब. गोगटे, अच्युतराव आपटे, डॉ. अरविंद लेले, वि. ग. कानिटकर, भाऊसाहेब नातू आणि आपल्या मुलाचे, मुलीचे, मावाचे कौतुक पाहायला जमलेली पालक मंडळी.

रात्री दहाच्या सुमारास, धान्याच्या पोत्याने भरलेले दोन ट्रक्स 'माणूस' कार्यालयासमोर घोषणा देत येऊन थडकले. कोल्हापूरची तुकडी आली होती. ट्रकसमधल्याच सतरंज्या काढून कार्यालयाबाहेरच्या अडचणीच्या जागेत दाटीवाटीने बैठक भरली. ओळखीपाळखी झाल्या. संध्याकाळच्या सभेतील ठराव वाचून दाखवण्यात आला. 'बिहार परिवार'चे बॅजेस या तुकडीला देण्यात आले. रसपान आटोपले आणि तुकडीने नगरच्या दिशेने आगेकूच केले.

**रविवार, दिनांक १४ मे**–सुमारे ४० विद्यार्थ्यांनी 'पूनम' व 'कॉफी हाऊस' या उपाहारगृहांत दिवसभर वेटर म्हणून कामे करून 'बिहार टिप्स' गोळा केल्या. काहींनी बाहेर गाड्या पुसल्या, बुटपॉलिशही केले.

शनिवार दि. २० व रविवार दिनांक २१ हे दोन दिवस लोणावळ्यासाठी विद्यार्थ्यांनी राखून ठेवले होते. या दोन दिवसांची कथा अशी. कथा लेखकाचे नाव सुहास मेहेंदळे.

**सुहास लिहितो,**

आणि मग 'यूथ ऑर्गनायझेशन्'च्या मिटिंगमध्ये निर्णय घेण्यात आला. सर्वांनी लोणावळ्याला जायचं; तिथल्या हवा खायला आलेल्या लोकांकडून पैसे गोळा करायचे–बिहारच्या भुकेल्यांना अन्न पुरवण्यासाठी ! मग योजना साकार होऊ लागली. चक्रं फिरू लागली. लोणावळ्यातील प्रतिष्ठित नागरिकांच्या सह्या असलेली पत्रकं छापून घेतली गेली. मराठीत, इंग्रजीत. दोन दिवस जायचं ठरलं. राहण्याची सोय डॉ. आगाशेबाईंकडे झाली. एक वेळचं जेवण एका कारखान्याच्या अधिकाऱ्याकडे, आणखी एक वेळचं जेवण त्याच कारखान्यातील कामगारांकडे. एक वेळचा डबा न्यावयाचा. प्रवासाचं भाडं प्रत्येकाचं. आता अडचण अशी उरलीच नाही. लक्ष केंद्रित झालं होतं ते शनिवारवर !

अन् शनिवार सकाळ उजाडली. 'यूथ ऑर्गनायझेशन'चे आम्ही चाळीस विद्यार्थि–विद्यार्थिनी पुणे स्टेशनवर जमलो. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्साह होता. पूनम–पूना कॉफीहाऊस मधील अनुभव होता. इतक्यात एकाच्या सुपीक डोक्यातून एक कल्पना निघाली. आमच्यातील चौघे डेक्कन क्वीनमध्ये चढले आणि लोणावळा येईपर्यंत लोकांकडून पैसे गोळा करू लागले. एका तासात दोनशे रुपये जमले. उत्साह वाढला. लगेचच्या लोकलने इतर मुले आली. त्यांना बातमी समजली. उत्साह द्विगुणित झाला. लगेच वेगवेगळ्या बॅचेस पाडल्या गेल्या. प्रत्येक जोडीला एकेक भाग वाटून दिला गेला. कामाला सुरुवात झालीदेखील...

लोणावळ्यात एक वेगळच वातावरण पसरलं. बाजारात वेगवेगळ्या ठिकाणी पोस्टर्स लावली गेली. मुलं–मुली गटागटांनी हिंडत होती. लोकांना बिहारमधील परिस्थितीची माहिती देत होती. जाणारे–येणारे लोक थबकत होते... हे दृश्य पाहत होते. कुतूहल वाटत होतं. उत्साह वाटत होता. कौतुक स्पष्ट दिसत होतं.

मदत केली जात होती. लोणावळ्यांतील रहिवाश्यांनीदेखील आपली मुलं-मुली आमच्याबरोबर पाठविली. त्यांच्या ओळखीच्या घरी आम्ही जात होतो. हक्काने पैसे घेत होतो. दहा वाजता सुरू झालेलं हे काम दीड वाजला तरी चालूच होत. उन्हाची तमा वाटत नव्हती. श्रम वाटत नव्हते. एरवी चार पावलं चालल्या की दमणाऱ्या ह्या पोशाखी मुली ..प्रत्येक घरात जात काय होत्या...बिहारसाठी मदत काय मागत होत्या...पैसे मिळाले की आनंदित काय होत होत्या...सगळं वातावरण उत्साहमय होतं...जाणीव होती ती बिहारमधील गंभीर परिस्थितीची !!

आणि लोक तरी काय तऱ्हेतऱ्हेचे भेटले ! बहुतेक सगळ्यांना दुष्काळाची जाणीव

दिसली. नव्हती ती फारच थोड्यांना. पण बिहार परिवाराचे बिल्ले लावलेली मुलं-मुली दिसली की काही दारं धाडकन लावली जात...काहीजण लहान मुलांना पाठवीत...मग ती सांगत "आमचे पप्पा किनई बाहेल गेलेत अन् ते पलत येनाल नाहीत." पुन्हा दारं लावली जात...! काही बहाद्दर तर किती तरी वेळ दारच उघडत नसत...काही सवाई बहाद्दरांनी तर कुत्रीदेखील अंगावर सोडायला कमी केलं नाही ! पण हे क्वचितच. बाकी सगळीकडे दिसला तो बंधुभाव...त्यागी वृत्ती...आपुलकी आणि कौतुक !!

डेक्कन क्वीनमध्ये असेच गंमतीदार अनुभव आले. बिहार परिवाराचे आम्ही स्वयंसेवक जवळ आलो की काहीजण चक्क झोपेचं सोंग घेत. तर काही शेजारच्या माणसाला माहिती सांगताना, आपण 'त्या' गावचे नाही असा आव आणत. काहीजण भांडत. विचारत, "बिहारला मदत का ? रत्नागिरीला का नाही ?" याचं उत्तर आपली संस्कृती. स्वतःआधी इतरेजनांना मदत करणे हा आपला धर्म आहे, नव्हे काय ? असा प्रश्न विचारून उत्तर दिलं की मग पैसे निघायला वेळ लागत नसे. एक जण तर चक्क भांडलाच. आवाज काय चढविला...तुम्ही पैसे खाताय... लोकांना फसवताय...असा आरोप काय केला...त्याला वाटलं आम्ही 'बिहार रिलीफ फंडा'साठीच पैसे गोळा करीत आहोत. इतर प्रवासी त्याला त्याची चूक समजावून सांगू लागले. आम्हांला भरपूर मदत करू लागले. आणि मग त्याचा पडलेला चेहरा पाहण्याचा मोह आवरताना मलाही फार कष्ट पडले !

काही ठिकाणी लोक घरात बोलवत. बसायला सांगत. इतकंच नाही तर तुम्ही दमला असाल असं म्हणून खायला-प्यायला देत. पैसा बिहारला पोहोचण्याबद्दल शंका व्यक्त करीत. पण आमच्यातले काहीजण प्रत्यक्ष बिहारमध्ये जाऊन धान्य-वाटप करणार आहेत हे ऐकून समाधान व्यक्त करीत. मदत करीत. अकरा रुपयांची...सहा रुपयांची ! काही जण दहाच रुपये देत. अकरा रुपयांत एक बिहारी एक महिना जगू शकेल हे कळल्यावर, खुशीनं एक रुपया वाढे. पावती फाडली जाई ती अकरा रुपयांचीच ! काही सांगत आम्ही आधीच मदत केली आहे मग पुन्हा कशासाठी ? त्यांना समजावून सांगावं लागे, मदतीची आवश्यकता पटवली जाई, विद्यार्थ्यांविषयी विश्वास निर्माण केला जाई, आणि मग मदत मिळे ती देखील अतिशय समाधानानं !

दुपारी दीडला काम थांबवलं. जेवण आणि विश्रांती झाल्यावर दुसऱ्या भागात पुनश्च काम सुरू झालं. संध्याकाळी लोक फिरायला बाहेर पडत. पुण्यांतील विविध कॉलेजचे युवक अन् युवती एकत्र येऊन लोणावळ्यात हे काम करीत आहेत, हे पाहून त्यांना समाधान वाटत असे. रस्त्यावरच्या लोकांना थांबवून विनंती केली जाई. पैसे मिळत. काही लोक तर स्वतःचे पत्ते देत व अधिक पैसे घेऊन जायला सांगत संध्याकाळी एके ठिकाणी लग्न होतं. लोणावळ्यातील बरेच प्रतिष्ठित

लोक येणार आहेत असं कळलं. चार जणांची एक तुकडी रवाना झाली. बऱ्याच वेळाने ही तुकडी हात हलवीत परत आली. मात्र पानसुपारी व ( वाटाण्याच्या ) अक्षता त्यांना मिळाल्या ! !

शनिवारी रात्री काम थांबलं. आणि आम्ही आमच्या (!) निवासस्थानी परत आलो. तर तिथं कारखान्यांतील अधिकारी आमची वाट पाहत होते. प्रत्येकाकडे एकेक जण दिला गेला. त्यांच्या घरी जेवायला गेलो. तिथं तर पंक्तीचाच थाट होता. रांगोळ्या घातल्या होत्या. दोन्ही वेळेला पहिल्या वाफेचा भात, चटण्या, कोशिंबिरी, भाज्या अन् शिवाय वर गोडाचं पक्वान्न ! ' दिवसभर हिंडून थकला असाल, आता पोटभर जेवा, संकोच करू नका ' असा प्रेमळ आग्रह. घरांतील लहान मुलंदेखील उत्साहानं प्रश्न विचारीत. बरोबर फिरण्याचा हट्ट धरीत. पोटभर जेवल्यावर चांदण्यात रमत रेंगाळत गप्पा मारीत येण्यात फार मौज आली अन् दिवसभरात एक हजार रुपये जमल्याची वार्ता कळल्यानं प्रसन्नतेची अन् उत्साहाची जी लाट पसरली तिचं वर्णन करणं केवळ अशक्य आहे.

रविवार सकाळ उजाडली ती वेगळ्याच वातावरणात ! दोन बॅचेस पाडल्या गेल्या. एक बॅच गेली खंडाळ्याला. अन् दुसरी चालत निघाली खंडाळ्याकडे—वाटेतले बंगले गाठीत. काही जण खूप माहिती विचारत, बराच वेळ गप्पा मारीत अन् काहीच देत नसत. काही जण म्हणत, तुमची बडबड नको. पैसे हवेत ना ? मग हे घ्या पैसे ! काही म्हणत आमचा तुमच्यावर विश्वास नाही. पण तुम्ही इतक्या लांब आलात...मोठ्या घरचे दिसता ... तर हे घ्या पैसे ! एका हॉटेलमधील मालकानं पैसे देण्याचे नाकारले. पण केवळ ३३ पैश्यांनी एका बिहारी माणसाला एका दिवसाचे अन्न मिळेल हे कळल्यावर तेथील वेटर्सनी आठ-आठ आणे दिले. मग त्या मालकाला काय वाटलं कुणास ठाऊक पण त्याच्या नावानं अकरा रुपयांची पावती फाडली गेली ! !

कोणी कसाही असला तरी आमचा प्रचार चालूच होता. वीस मुलं आणि तितक्याच मुली शांतपणे माहिती सांगत...पैसे गोळा होत...कुठंही गडबड नव्हती ... गर्दी नव्हती. सगळं पद्धतशीर चालू होतं. बोलण्याची पद्धतदेखील ठरली होती.

" माफ करा. "

" काय ?" कपाळावरच्या सतराशे साठ आठ्यांतून प्रश्न उमटे ...

" आम्ही पुण्यातील विद्यार्थि-विद्यार्थिनींनी एक युवक संघटना स्थापन केली आहे; आणि बिहारमधील भुकेल्यांसाठी आम्ही मदत गोळा करीत आहोत. आमच्यापैकी काही इंजिनिअरिंगचे, मेडिकलचे, स. प. चे तर काही फर्ग्युसनचे, कॉमर्सचे विद्यार्थी आहेत. "

त्या व्यक्तीच्या कॉलेजचे नाव आलं की आठ्यांची संख्या सतराशेवर येई !

[ पान ६४ पाहा ]

सदाशिव पेठकर

# मुखवटे

राजकर्त्यांच्या वर्तनाविषयी आपल्या काही अपेक्षा असतात. लोककल्याणासाठी सत्तादंड हाती घेऊन उभी ठाकलेली व्यक्ती मूलत: लोकसेवेच्या भावनेने ही अवघड जबाबदारी स्वीकारीत असते; असे आपण मानतो. शास्त्याचे चारित्र्य निरपवाद असले पाहिजे, असे राजनीतिविषयक प्राचीन ग्रंथांतही म्हटल्याचे आढळून येते; परंतु वीस वर्षांपूर्वी आपण स्वतंत्र झाल्यानंतर अनेक नवी ध्येयधोरणे स्वीकारली आणि त्या वेळेपासून अनेक जुन्या कालबाह्य मूल्यांशी छेद घेतला. ज्यांच्या हातीं सत्ता आली त्यांतील बऱ्याच जणांना हे निरपवाद चारित्र्याचे मूल्य कालबाह्य वाटू लागले असल्याचे त्यांच्या आचरणावरून दिसून येऊ लागले. अधूनमधून त्यासंबंधी कुजबुज होई. कधी कधी एखादे लफडे (Scandal) लखलखत उजेडातही येई. या लफड्याचा फारच बोभाटा झाल्यावर संबंधित मंत्री व अधिकारी आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देऊन मोकळा होई ! परंतु या अशा प्रकरणासंबंधी फार मोठा गहजब होत नसे किंवा समजा क्वचित झाला तरी त्याची दखल घ्यावी, असे सत्तारूढ काँग्रेस पक्षातील उच्चपदस्थांना वाटत नसे. पं. नेहरूंच्या अनन्यसाधारण लोकप्रियतेच्या ढालीमागे अशा भ्रष्टाचारी मंत्र्यांना भरपूर संरक्षण मिळत असे. पंडितजींना या गोष्टी माहीत नसत असे नाही; परंतु स. का. पाटील यांच्यापासून कृष्ण मेनन यांच्यापर्यंत अगदी टोकाची मते धारण करणाऱ्या व्यक्तींच्या सहकार्याने राज्यशकट चालविणाऱ्या पंडितजींना मानसिक क्लेश होत असतानाही हे प्रकार खपवून घ्यावे लागत.

प्रधानमंत्र्यांचे हे दडपण आता कोठे नाहीसे झाले आहे आणि त्यानंतर म्हणजे इंदिरा गांधी यांनी सत्तास्वीकार केल्यानंतर भ्रष्टाचाराची छोटी मोटी प्रकरणे उजेडात येऊ लागली आहेत. त्यावर चर्चा होऊ लागली आहे. हजारी–समितीच्या अहवालावर गेल्या आठवड्यात संसदेत जी जोरदार चर्चा झाली त्यावरून हेच सिद्ध होत आहे. वस्तुत: इतर काही अहवालांप्रमाणे हा अहवालही गुलदस्तात राहिला असता; पण संसदेच्या गेल्या अधिवेशनामध्ये चंद्रशेखर या काँग्रेस–सदस्याने त्या अहवालाच्या निमित्ताने आयातपरवाने देताना संबंधित मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी किती पक्षपाती धोरण स्वीकारले होते व आहे याचा प्रथम उच्चार केला, अर्थात हा विषय उजेडात आणताना हजारी–समितीच्या अहवालामध्ये ज्या उद्योगपतीचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला आहे त्याचे आर्थिक आणि औद्योगिक साम्राज्य बलिष्ठ बनविण्यात कोणाकोणाचा हात आहे यावर काहीतरी प्रकाश

पडावा हाच चंद्रशेखर यांचा हेतू होता. परंतु मागच्या अधिवेशनात वेळेच्या अभावी या अहवालावर फारशी चर्चा होऊ शकली नाही.

या अहवालावर संसदेत सविस्तर चर्चा झाली नाही तर बरे, असेच सरकारला व सचिवांना वाटत होते. परंतु पंधराएक दिवसांपूर्वी संसदीय कॉंग्रेस पक्षाची बैठक भरली असताना अर्जुन आरोरा यांनी या विषयाला तोंड फोडले. हजारी-अहवालामध्ये आयात-परवान्यांबाबत स्वीकारण्यात आलेल्या पक्षपाती धोरणाचा विचार करताना प्रामुख्याने उल्लेख आला आहे तो बिर्ला उद्योगसमूहाचा. त्यांनी असे म्हटले आहे की, १९५६ मध्ये बिर्लाबंधूंचा जो व्याप होता त्यात गेल्या दहा वर्षांमध्ये किती तरी पटींनी वाढ झाली असून त्याचा परिणाम असा झाला, की आर्थिक सत्ता एकाच उद्योग समूहाच्या हाती केंद्रित झाली. भांडवलदार काय किंवा उद्योगपती काय, केवळ सरकारी धोरणाचा फायदा घेऊन आपले साम्राज्य वाढविण्यावर थांबत नाही. हे धोरण असेच चालू राहावे या हेतूने तो चटकन वश होणाऱ्या काही उच्चपदस्थांना आर्थिक आमिषे दाखवून आपले हस्तक बनविण्याची कारवाई करतो. गेल्या निवडणुकीमध्ये बिर्लाबंधूंनी ज्या राजकीय उलाढाली केल्या त्यामागे त्यांचा हाच उद्देश होता. इंदिरा गांधी आणि मोरारजी देसाई यांच्यात प्रधानमंत्रिपदासाठी चुरस निर्माण झाली असताना बिर्लाबंधूंनी आपल्या ' खिशातील सदस्यां 'ना इंदिरा गांधी यांच्या बाजूने उभे राहण्यास आदेश दिला होता. इंदिरा गांधी यांच्यासारखी दुबळी व्यक्ती सत्ताशिखरावर आरूढ झाल्यावर आपल्या गोटातील मंत्री आपल्या हितसंबंधांचे अधिक जोरदार रीतीने संरक्षण करू शकतील हा हेतू मनीमानसी बाळगूनच बिर्लाबंधू नेहरू-कन्येच्या मागे उभे राहिले.

हा सारा प्रकार ' तेरी भी चूप, मेरी भी चूप ' या थाटाचा होता. परंतु काही केंद्रीय मंत्री बिर्ला यांच्याकडून तनखा घेत असतात, असा आरोप करून अर्जुन आरोरा यांनी संबंधितांचे या प्रकरणाकडे लक्ष वेधविले. त्यांचा हा आरोप ऐकताच बरेच कॉंग्रेस सदस्य प्रक्षुब्ध झाले व त्यांनी असले बेजबाबदार आरोप करू नका, असा आरोरा यांना उद्देशून गिल्ला सुरू केला. परंतु अशा आरडाओरडीने गडबडून जाण्याइतके आरोरा यांचे व्यक्तिमत्त्व लेचेपेचे नाही. त्यांनी असे सांगितले की, बिर्लाशेठजींच्या आर्थिक कृपेवर जगणाऱ्या मंत्र्यांची नावे सांगण्यास मी तयार आहे. ही माहिती खोटी ठरली तर संसद-सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची माझी तयारी आहे. आरोरा यांनी एवढी निग्रही भूमिका घेतल्यामुळे हजारी-समितीच्या अहवालासंबंधी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा घडवून आणण्याविना सरकार पक्षाला गत्यंतर उरले नाही.

## आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण

राज्यसभेमध्ये हजारी–अहवालाची चर्चा सुरू झाली तेव्हा भूपेश गुप्ता या अभ्यासू कम्युनिस्ट सदस्याने पहिला जोरदार हल्ला चढविला. काही वर्षांपूर्वी हरिदास मुंदडा या उद्योगपतीच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी व्हिव्हियन बोस या न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखाली समिती नेमली होती. ' बिर्ला–साम्राज्याच्या आधारस्तंभांची चौकशी करण्यासाठी अशीच समिती नेमली पाहिजे, अशी गुप्ता यांनी मागणी केली. देशातील निम्मे खाजगी भांडवल मूठभर म्हणजे अवघ्या ७५ उद्योगपतींच्या हाती केंद्रित झाले आहे. चौकशी समितीच्या अहवालातील माहिती सांगून गुप्ता यांनी काँग्रेसच्या वीस वर्षांच्या राजवटीत आर्थिक सत्तेचे केवढया मोठया प्रमाणावर केंद्रीकरण झाले आहे याचा आढावा घेतला. आयात–परवान्यांसाठी एकूण ९३८ अर्ज आले होते. त्यांपैकी ३७५ अर्ज एकटया बिर्ला उद्योगसमूहाचे होते. हे अर्ज मंजूर करताना बिर्लाशेठजींवर सरकारची एवढया मोठया प्रमाणावर मेहेरबानगी झाली, याचे कारण बिर्ला यांचे काही हस्तक राज्ययंत्रणेत मोठमोठया हुद्यांवर आरूढ झालेले आहेत हे होय! लाचलुचपत आणि वशिलेबाजी यांच्या आधारावर बिर्ला–साम्राज्याची उभारणी झालेली आहे, हे दाखवून देताना भूपेश गुप्ता यांनी काँग्रेस पक्षास बिर्ला यांचेकडून एक कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या देणग्या कशा मिळाल्या आहेत व निवृत्त झालेले वरिष्ठ अधिकारी बिर्ला यांचेकडे नोकरीस लागून नव्या अधिकाऱ्यांवर दडपण आणून आपल्या धन्याची चाकरी कशी करतात याचाही तपशील पुरविला. काही मंत्री ते बिर्ला यांच्या सूचनेनुसारच नेमले जातात अशी वस्तुस्थिती आहे. सध्याच्या मंत्रिमंडळात सत्यनारायण सिन्हा व कृष्णचंद्र पंत हे बिर्लांचे मंत्री समजले जातात.

भूपेश गुप्तांची ही टीका विरोधी पक्षाच्या सदस्याची टीका म्हणून क्षणभर बाजूस ठेवली तरी चंद्रशेखर यांच्यासारखा काँग्रेससदस्य काय म्हणतो याचा विचार करणेही उद्‌बोधक ठरते. बिर्ला यांचे ' उद्योग ' पाहून मुंदडादेखील चकित होतील, असे चंद्रशेखर म्हणाले. बिर्ला यांचा एकदेखील कारखाना अश्लाघ्य व अनैतिक मार्ग वापरल्याशिवाय उभारण्यात आलेला नाही, हेही त्यांनी सांगितले. कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत व गुजरातपासून आसामपर्यंत विस्तारलेल्या बिर्ला यांच्या औद्योगिक साम्राज्याच्या पायाभरणीला आणि विकासाला कोणीकोणी मदत केली आणि ही मदत करताना सरकारी यंत्रणेचा व्यक्तिगत स्वार्थासाठी केवढया मोठया प्रमाणावर गैरवापर केला याची चौकशी झालीच पाहिजे हे चंद्रशेखर यांच्या भाषणाचे मुख्य सूत्र होते. बिर्ला यांचे काँग्रेस सरकारवर एवढे प्रचंड दडपण आहे की, त्यांना हवी असलेली कोणतीही गोष्ट ते चुटकीसरशी साध्य करू शकतात. केवळ केंद्र सरकार हातात ठेवून आपले उद्दिष्ट साध्य होणार नाही, हे बिर्ला यांनी ओळखले व त्यानंतर त्यांनी अनेक राज्यांचे मुख्यमंत्री खिशात घाल-

ण्याचे तंत्र अवलंबले. बिर्ला यांच्या या कारवायांसंबंधी हजारी–समितीच्या अहवा-लात आलेला उल्लेख अगदी अपुरा आहे. बिर्ला यांच्या हस्तकांची रांगच रांग वर-पासून खालपर्यंत उभी असल्याने त्यांची कामे पटकन पार पडतात !

## मोरारकांचा पराभव

'मध्यंतरी जयंति जहाज वाहतूक कंपनी'चे डॉ. धर्म तेजा यांनी भारत सरकारची फार मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली. आता हे राजेश्री अमेरिकेत पळून गले असून त्यांना तेथून भारतात परत आणण्याबाबत'आपल्या सरकारला अद्याप यश आलेले नाही. बिर्ला यांनी 'रत्नाकर' जहाज वाहतूक कंपनी स्थापन केली होती, तिचे पुढे काय झाले याचीही माहिती उजेडात आलेली नाही. चंद्रशेखर यांच्या मताने ' जयंति ' पेक्षाही रत्नाकर हे अधिक गंभीर भानगडीचे प्रकरण आहे. थोडक्यात सांगावयाचे तर देशाचे आर्थिक आणि राजकीय जीवन बिर्ला यांनी आपल्या पैशाच्या बळावर पोखरून टाकले असून या कार्यात काही मंत्र्यांनी व सचिवांनी आपला हातभार लावला आहे. बिर्ला यांचीही मजल कोठपर्यंत नेली आहे हे मोरारका यांना पराभूत करण्याच्या कार्यात बिर्ला कसे यशस्वी झाले हे पाहिले की समजून येते. तिसऱ्या संसदेने नेमलेल्या सरकारी हिशेब तपासणी समितीच्या अध्यक्षपदावर अस-ताना आर. आर. मोरारका यांनी औद्योगिक परवाने घेताना बिर्ला यांच्या बाजूने किती पक्षपाती धोरण अवलंबले जाते यावर बरीच टीका केली होती. त्यामुळे बिर्ला यांचा मोरारका यांच्यावर घुस्सा. गेल्या निवडणुकीत मोरारका पराभूत व्हावेत यासाठी बिर्ला शेठजींनी झुनझुनु मतदारसंघामध्ये पाण्यासारखा पैसा खर्च केला. शासनयंत्रणा आपल्या तंत्रानुसार चालावी यासाठी उद्योगपतींची मजल कोठपर्यंत जाते हे या एका उदाहरणावरून समजून यावयास हरकत नाही.

अर्थात् बिर्ला यांच्या दातृत्वाचा ओघ केवळ कॉंग्रेस पक्षापुरताच मर्यादित राहि-लेला नाही. जनसंघ आणि स्वतंत्र या दोन पक्षांचेही हात ओले झालेले आहेत. कॉंग्रेसप्रमाणेच या दोन पक्षांचे बल वाढले तरीही आपल्या साम्राज्याला धोका नसल्यामुळे बिर्ला त्यांच्या पाठीशी उभे राहिले. हे सारे पाहिले की आपले सार्व-जनिक जीवन कोणत्या मर्यादेपर्यंत भ्रष्ट झाले आहे हे ध्यानात येते आणि मग कॉंग्रेसचा लोकशाही समाजवाद असो, जनसंघाचा प्रखर राष्ट्रवाद असो किंवा स्वतंत्र पक्षाचा आर्थिक स्वातंत्र्याचा पुकारा असो–सारेच केवळ बेगडी आणि दिखाऊ वाटू लागते. अलीगड–अमृतसरहून प्रसिद्ध होणाऱ्या ट्रान्झिस्टर्सच्या किंवा रिव्हॉल्व्हर्सच्या जाहिरातीसारखे. तेथे उघड उघड व्यापारी व्यवहार तरी आहे. येथे मात्र आवरण वा कवच आहे ते देशसेवेचे–लोककल्याणाचे ! आणि म्हणूनच अधिक धोका-दायक! उदात्त ध्येयवादाचा मुखवटा चढवून राष्ट्रजीवनाशी खेळणाऱ्या मुखवट्यां-पैकी काही थोडे मुखवटे जरी हजारी–समितीच्या अहवालाच्या निमित्ताने उघड-कीस आले तरी हेही नसे थोडके !

●

# मुक्ताफळे



## ❑ भोळी मौज

पुण्यात नुकताच एक समारंभ पार पडला. प्रख्यात संगीत–दिग्दर्शक व संगीताचे मर्मज्ञ टीकाकार श्री. केशवराव भोळे यांच्या 'अंतरा' या लेख–संग्रहाचा अनौपचारिक समारंभ निमंत्रितांच्या उपस्थितीत पार पडला. मराठी पुस्तकाच्या प्रकाशनाचा समारंभ होण्याचा योग हा विरळा. पुस्तक छापून काढल्यानंतर पहिल्या तीनशे प्रती खपून कागद व छपाईचा खर्चवेच बाहेर पडतो की नाही या विवंचनेत प्रकाशक असताना पुस्तकाचा प्रकाशन समारंभ करून आणखी खर्चात पडणारे प्रकाशन मराठीत असावे ही खरोखर मौज आहे. या समारंभप्रसंगी 'अंतरा'चे लेखक श्री. केशवराव भोळे यांनी एक मार्मिक भाषण केले. ते म्हणाले—

"मी पूर्वी 'मौज' या साप्ताहिकात विपुल लिहिले. सपाटून लिहिले. 'मौज' बंद पडावे हे खरोखर दुर्दैव होय." या उद्‌गारांवरून साप्ताहिकात कोण किती चांगले लिहितो याचा साप्ताहिक चालण्याशी काहीही संबंध नाही हे चतुर श्रोत्यांनी लगेच ओळखले. श्री. भोळे यांनी पुढे अशी तक्रार केली, की मराठी पुस्तकेही खपत नाहीत. अशाही स्थितीत एका मराठी प्रकाशकाने न खपणारे पुस्तक काढावे व शिवाय समारंभाचा खर्च करावा हे पाहून श्री. भोळे यांना इतके गहिवरून आले की त्यांनी 'मौज' प्रकाशनगृहाचे श्री. पु. भागवत यांना व्यासपीठावर चक्क मिठी मारली. लेखक भोळे, यांनी भोळ्या प्रकाशकांना मिठी मारलेली पाहून प्रेक्षकही सद्‌गदित झाले.

## ❑ नवे पसायदान

मराठी पुस्तके खपत नाहीत हे चक्क जाहीर कबूल करून तरीही प्रकाशनाचा व्यवसाय दोन तपे करीत असलेले अनेक प्रकाशक पुण्यात आहेत. त्यांचा, 'मराठी पुस्तके व मासिके खपत नाहीत' या विषयाचा व्यासंग इतका दांडगा आहे की, या

विषयावर आम्ही काही लिहिणे हा त्यांचा अपमान आहे. तात्पर्य, मराठी पुस्तके मुंबईला छापा, पुण्याला छापा, ती खपत नाहीत.

बारकाईने जेव्हा आम्ही या प्रश्नाची तपासणी केली तेव्हा आम्हांला असे आढळून आले की, येथेही अमेरिकन 'पोसिजिन'चा हात आहे. आपला तांदूळ आपल्याला पिकवता येत नाही, त्याप्रमाणे आपली मराठी पुस्तकेही आपल्याला 'खपवता' येत नाहीत, हे अमेरिकन सरकारच्या ध्यानात आले. मराठी पुस्तकाच्या विक्रीतील हा ठणठणाट पाहून अमेरिकन लोकांनी मराठीत पुस्तके वाचण्याची गोडी निर्माण करण्याकरता एक 'साहित्यपाळ' नेमला.

अमेरिकन जीवनाची, अमेरिकन स्त्रियांची, अमेरिकन संस्कृतीची बहारदार वर्णने असलेली अमेरिकन उत्तमोत्तम पुस्तके व मराठीतील ख्यातनाम, सिद्धहस्त, वाचकांचे लाडके, सरकारी पारितोषिकांची खैरात झालेले नामवंत मराठी लेखक असा 'अमृतसिद्धी' योग जमवण्यात आला. मराठीतील मोठमोठ्या धंदेवाईक प्रकाशकांनी या पुस्तकाच्या छपाईची कामे प्रसंगी पदराला खार लावून स्वीकारली. बाजारात अमेरिकन पुस्तकांचा घो घो प्रवाह सुरू झाला. शेकड्यांनी, हजारोंनी पुस्तके खपू लागली. मराठी वाचक, पहिल्या एडिशनलाच प्रकाशकाला कपाळाला हात लावायला लावतो, परंतु 'पोसिजिन'च्या जादूने तो इतका खूष झाला की ख्यातनाम मराठी लेखकाचे अमेरिकन पुस्तकांचे भाषांतर बाजारात आले रे आले की तो त्यावर तुटून पडू लागला. गेली दहा वर्षे मराठीत जी खंडोगणती अमेरिकन पुस्तके भाषांतरित होऊन अवतरली आहेत ती काय उगीच! कुठला प्रकाशक यात धंदा होत नसताना ही पुस्तके छापील? कुठला ख्यातनाम लेखक यात भरपूर पैसे नसताना असले काम स्वीकारील?

जत्रेत सराफाची आणि वाण्याची दुकाने तेजीत चालावी तशी प्रकाशकांची अवस्था या महाराष्ट्रात झाली आहे. काही शिष्ट प्रकाशक ही भाषांतरित पुस्तके छापीत नाहीत. मूळ मराठी पुस्तके अजून छापतात! लवकरच या प्रकाशन–संस्थांना 'टाळेबंदी' करावी लागेल यात मुळीच शंका नाही.

'पोसिजिन'ने दिलेले हे पसायदान ज्ञानेश्वरांच्या पसायदानापेक्षा मराठी सारस्वतात मूल्यवान ठरले आहे–

प्रकाशकांचे तिमिर जावो। लेखकू सुवर्ण पाहो।
जो जे वांछील तो ते लाहो। शब्दजात ॥
वर्षत जॉन्सन मंडळी। अनुवादकांची मांदियाळी।
रूजवात साहित्यपाळी। भेटतु भूतां ॥
पुढती पुढती पुढती। इया ग्रंथपुण्य संपत्ती।
सर्वसुखी सारस्वती। संपूर्ण होई जो ॥

शके एकोणीसशे सदुसष्टे । हे टीका केली अशिष्टे ।
ग्यानबा बाबा आदरे । लेखकू झाला ।।

## □ बिचारा स्पेंडर !

इकडे मराठी प्रकाशकांना व लेखकांना चांगले दिवस येऊ लागलेले असताना इंग्लंडमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सुप्रसिद्ध 'एन्काउंटर' या मासिकाचे ख्यातनाम संपादक स्टीफन स्पेंडर ('गॉड दॅट फेल्ड'चे लेखक) व फ्रँक करमोड यांनी 'एन्काउंटर' मासिकाच्या संपादकत्वाचा राजीनामा दिला आहे. का तर म्हणे १९५१ ते ५४ या तीन वर्षांत सी. आय्. ए. या पैसे वाटून बदनाम झालेल्या अमेरिकन संस्थेमार्फत या मासिकाला देणगी मिळत होती. कमाल आहे ! पैसे वाटून कुठलीही संस्था का बदनाम व्हावी हे आम्हांला कळत नाही. समजा, पैसे देण्यात त्या संस्थेचा काही हेतू असला तरी स्टीफन स्पेंडर व फ्रँक करमोड यांनी राजीनामा कशाला द्यायला हवा होता ? आपण भिकाऱ्याला पैसा देतो, काय हेतू असतो आपला ? काही असतो ? भिकाऱ्याला त्याची गरज असते. आपण तो देतो, आत्मिक हेतू काही नाही ! या मासिकाशी संपादक म्हणून संबंधित असलेले तिसरे लेखक मेल्विन लास्की यांनी जाहीर केले आहे की पंधरा वर्षांपूर्वी अशी भीक अमेरिकेतून येत होती यावर त्यांचा विश्वास नाही. म्हणजे जर ही गोष्ट उद्या खरी ठरली तर तेदेखील 'एन्काउंटर' सोडणार !

भले ! म्हणजे 'एन्काउंटर'चा अवतार संपला की ! युद्धनेता म्हणून चर्चिलचे स्थान, स्टॅलिनचे स्थान अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा म्हणा, किंवा भारत व संस्कृती यांवरील विद्वत्तापूर्ण लेख म्हणा, किंवा ऑडेन इशरवूड, किंग्सले अमिस, रॉय जेन्किन्स, जॉन वेन अशा ख्यातनामांचे लेखन म्हणा आता कोण छापणार ? स्पेंडर यांनी संन्यास घ्यावा असे या 'सी. आय्. ए.' या संस्थेत खरोखर काही वाईट आहे का ?

आम्ही भारतात त्यांचे गहूं, तांदूळ घेतो, अनुवादित अमेरिकन पुस्तके निर्माण करतो. आम्हांला तरी याचा काही परिणाम जाणवत नाही बुवा ! उलट ज्यांना चार पैसे दिसत नव्हते त्यांना निढळाच्या घामाचे पैसे मिळू लागले आहेत. स्पेंडर साहेब तुम्ही भारतात येऊन राहा. इथल्या हवेत तुमचे नक्की हृदयपरिवर्तन होईल.

आता या सी. आय्. ए. संस्थेचे काम काय आहे ? मुख्य काम हे आहे की परदेशांतील विविध माहिती गोळा करायची, रिचवायची व अमेरिकन सरकारला आपले परराष्ट्र धोरण ठरवण्यासाठी ही माहिती उपलब्ध करायची. आता यात आक्षेपार्ह काय आहे बुवा ? आपण परदेशांत वकील याच कामासाठी ठेवतो ना ? त्यांना नाही कुणी सांगत—"चालते व्हा !" रशियन वकिलातीमार्फत तर

याहून महत्त्वाची कामे करण्यात येतात असा प्रवाद आहे.

स्पेंडर यांच्यासारख्या कम्युनिस्ट राजवटीबद्दल भ्रमनिरास झालेल्या लेखकांनीही सी. आय्. ए. संस्थेने पंधरा वर्षांपूर्वी पैसे दिले, या कारणास्तव त्यांनी राजीनामा द्यावा यात काही अर्थ नाही. आमच्याकडील लेखकांचे त्यांच्याविषयी आतापर्यंत बरे मत होते; परंतु त्यांच्या या कृतीचा मराठी सारस्वतभक्त तरी निषेधच करतील. कारण आम्ही अमेरिकन लोकांचे बारसे जेवलेलो आहोत. आम्ही त्यांचे तांदूळ, गहू घेतो, पुस्तकांसाठी पैसे घेतो आणि शिवाय अकाबाच्या आखातात नेमकी नासरला मिठी मारतो ! हे साधले, पाहिजे ! या गुंतागुंतीच्या गोष्टी समजण्यासाठी स्पेंडर यांनी संन्यासावस्थेत भारतदौरा करावा अशी आमची त्यांना विनंती आहे. त्यांचे भले होईल. आम्हालाही एका मूर्ख माणसाचे दर्शन होईल.

## ☐ तनखे

अतुल्य घोष यांनी सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर संस्थानिकांचे तनखे बंद करू, असा ' अतुल्य रोष ' प्रकट केला होता हे आठवत असेल. निवडणुकीत घोष तोंडावर पडते ना, तर एव्हाना संस्थानिकांचे मामलेदार कचेरीत किंवा पी. डब्ल्यू. डी. खात्यात आपल्याला दर्शन होऊ लागले असते. २८१ संस्थानिकांना भारत सरकार वर्षाला ५ कोटी रुपये तनखा म्हणून वाटते. म्हणजे ५० कोटींचा आपला देश माणशी १० पैसे या संस्थानिकांना वर्षाला देतो. किंवा महिन्यातून १ नया पैसा देतो म्हणा. भारताचा एकंदर वार्षिक खर्च ३००० कोटी रुपये होतो. त्यांचे हे पाच कोटी रुपये हा वायफळ खर्च आहे व तो कमी करावा असा आ ह अतुल्य घोष यांनी नुकत्याच झालेल्या कॉंग्रेस पक्षाच्या बैठकीत धरला.

या पाच कोटीं पैकी हैदराबाद, बडोदा, म्हैसूर, ग्वाल्हेर, त्रावणकोर, व कोचीन, या सहा संस्थानिकांनाच काय ते १० लाखांहून अधिक पैसे मिळतात. सरकारने या संस्थानिकांना हा जो पैसा दिला तो त्यांनी शांततापूर्ण रीतीने गडबड न करता विलीनीकरणाला मान्यता दिली म्हणून दिला जातो ! त्यात त्यांना त्यांच्या माणसांचे पगार द्यावे लागतात. त्यांचे हत्ती, घोडे, सांभाळावे लागतात.

परंतु अतुल्य घोष यांनी ही जी नवी देखरेख हाती घेतली आहे ती महत्त्वाची आहे. घोष यांनी निरनिराळ्या कॉंग्रेस पक्षांचे मंत्रिमंडळ असलेल्या प्रांतांत विपुल मंत्रिपदे का दिली जातात याचा तलास घ्यावा. त्यांच्या हे लक्षात येईल की काही जणांनी गडबड करू नये व शांत राहावे म्हणून त्यांना मंत्रिपदाचा तनखा दिलेला आहे. आमची खात्री आहे घोषांसारखा हुशार माणूस या संस्थानिकांचीही पाठोपाठ विल्हेवाट लावील. कारण त्यांनी हे केले नाही, तर जनता हे करील हे समजण्याइतके ते नक्की चतुर आहेत.

ग्यानबा

# शि व से ना

□ □ □ □

□ शिवसेना म्हणजे मराठी मनाच्या न्यूनगंडाला लागलेले विकृत वळण—

□ निराश तरुणांच्या विफलतेतून उद्‌भवलेल्या निष्फल क्रोधाचा हिंसक आविष्कार म्हणजे शिवसेना—

□ शिवसेना म्हणजे जातीयतेचा अर्क—प्रांतीयतेचे जहर—अराष्ट्रीय संकुचितपणाची कमाल—

□ भडक बेकार तरुणांना हाताशी धरून प्रतिगामी भांडवलवाद्यांनी धूर्तपणे उभारलेली चळवळ—

□ अक्षम्य अन्यायाने निर्माण झालेल्या पोटतिडिकीचा विस्फोट—अन्याय दूर करण्यासाठी निर्माण झालेली न्याय्य चळवळ—

□ अन्यायाचे मूळ कारण समजावून न घेता भारतीय तरुणांच्या नैसर्गिक असंतोषाला लागलेले प्रांतीय वळण—

□ शिवसेना मुळातच गाडून टाकली पाहिजे—

□ शिवसेनेचे हिंसक स्वरूप घालवून चळवळीला योग्य विधायक वळण लावले पाहिजे—

□ कोण म्हणतो शिवसेना हिंसक आहे ?— चळवळ ज्या मार्गाने चालू आहे त्या मार्गानेच गेल्याशिवाय मराठी माणसाला तरणोपाय नाही—

## १

ज्वलंत विषयावर
वस्तुनिष्ठ वार्तापत्रे
सादर करणे
ही 'माणूस'ची खास परंपरा.
या परंपरेला साजेसा
हा आणखी एक प्रयत्न

□ □ □

शिवसेना हा नुसता शब्द जरी तोंडातून काढला तरी मुंबईचे लोक फटाफट बोलू लागतात. प्रत्येकाचे शिवसेनेविषयी काही ठाम मत आहे. आणि प्रत्येकाला या विषयावर खूप काही तरी बोलायचे असते. मुंबईत सध्या सर्वांत जास्त चर्चेचा विषय म्हणजे शिवसेनाच. मुंबईतील सर्व जातीजमातींच्या लोकांच्या जीवनाला या विषयाने स्पर्श केला आहे. विशेषतः, मुंबईतील मध्यमवर्गीयांच्या जीवनाची लयच शिवसेनेने व्यापून टाकली आहे. हा प्रश्न आहे जीवनमरणाचा, अस्तित्वासाठी चाललेल्या झगड्याचा. या प्रश्नावर चर्चा केल्याशिवाय, त्यावर निश्चित मत बनविल्याशिवाय आणि निश्चित बाजू घेतल्याशिवाय मुंबईत राहणारा कुणीच माणूस सुटू शकत नाही. एवढ्या निकडीचा आणि सर्वस्पर्शी असा हा विषय आहे.

सुमारे ४५ लाख वस्तीच्या या बहुरंगी बहुढंगी मुंबईत रोज मद्रास, दिल्ली, कलकत्ता आणि देशातल्या साऱ्या कोन्या कोपऱ्यातून हजारो लोकांचे लोंढेच्या लोंढे येऊन लोटत असतात. पोटासाठी-व्यापारासाठी, धंद्यासाठी, चैनीसाठी, सर्व प्रकारच्या कारणांसाठी साऱ्या भारतातून लोक मुंबईत लोटतात. मुंबईचे बहुरंग अधिकच खुलत जातात. संपत्ती वाढत जाते. जीवन एका बाजूला अधिक समृद्ध होत जाते. कारखाने उठतात. डोळे फिरवणारे इमले उभे राहतात. व्यापार बजबजतात. नोकऱ्या वाढतात. तसेच बेकारीही वाढते. अंगावर खरूज चढल्यासारख्या झोपडपट्ट्या उठून वाढू लागतात. दोन हातांच्या जागेसाठी जीव टाकावा लागतो. गुन्हेगारी तीव्र होते.

आणि या झपाट्याने घाबरून जाऊन आधीच कमी संख्येने मुंबईत असलेला मराठी माणूस जीव मुठीत घेऊन मुंबईबाहेर पळू पाहतो. बाहेरचा मराठी माणूस मुंबईत यायला कां कूं करतो. आणि आर्थिक दुर्भिक्ष्याने ग्रासलेले इतर प्रांतीय

चरितार्थ चालविण्यासाठी भरभरून मुंबईत लोटतात. मुंबईतला व्यापार गुजराती, सिंधी आणि पारशी करतात. कारागिरी आणि इतर छोटे धंदे शीख करतात. उंच उंच इमले उठवतात तेही हेच लोक. मराठी लोक मुंबईत फक्त कारकुनी, हमाली आणि राजकारण करतात. या क्षेत्रातही आता तामीळ, केरळी, आंध्र प्रदेशीय इत्यादी दक्षिणी लोकांची स्पर्धा वाढू लागली आहे. आणि महाराष्ट्रोची राजधानी असलेल्या मुंबई शहरातच आम्हा मराठी लोकांची सर्व क्षेत्रात पीछेहाट होते आहे, म्हणून नव्या मराठी तरुणांत असंतोष वाढतो आहे. मुंबईतील आणि मुंबईबाहेरील या मराठी तरुणांच्या असंतोषाचा एक आविष्कारच शिवसेनेच्या रूपाने प्रकट झालेला आहे.

कारणे कुणी काहीही सांगोत पण जी आपली गाऱ्हाणी म्हणून शिवसेना पुढे मांडते त्या गाऱ्हाण्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल काही अपवाद वगळता कुणी शंका घेत नाही. मुंबईमध्ये आणि मुंबईबाहेरही महाराष्ट्रामध्ये औद्योगिक आणि इतर कारकुनी नोकऱ्यांच्या बाबतीत मराठी माणसाची पद्धतशीर पीछेहाट होत आहे हे खरे आहे. कारणे कोणतीही असोत. ही वस्तुस्थिती आहे. खुद्द मुंबईत तर साऱ्याच क्षेत्रात सालोसाल मराठी माणूस मागे पडत आहे. बूट पॉलिशच्या धंद्यापासून तो विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्रीयांची संख्या सालोसाल कमी कमी होत आहे. मुंबईचा ज्या झपाट्याने विस्तार होत आहे, ज्या वेगाने मुंबईतील कारखानदारी आणि व्यापार वाढून नोकऱ्यांचे प्रमाण वाढते आहे, ज्या प्रमाणात मुंबईतील जीवनाच्या कक्षा रुंदावत आहेत त्याच गतीने मुंबईतील महाराष्ट्रीयांची संख्या कमी होत आहे. मुंबईच्या उपनगरांमध्ये, गृह निर्माण मंडळाने बांधलेल्या गाळ्यांमध्ये महाराष्ट्रीयेतरांची संख्या झपाट्याने वाढते आहे. कारकुनी, हमाली, दुकानदारी आदी ज्या क्षेत्रांमध्ये मराठी लोक टिकून होते तिथेही त्यांची भराभर पीछेहाट होऊन त्यांची जागा इतर प्रांतीय– विशेषतः दक्षिण– भारतीय घेऊ लागले आहेत.

आणि केवळ मुंबईतच नव्हे तर मुंबईबाहेर महाराष्ट्रातही हे लोक पसरू लागले आहेत. अगोदरच महाराष्ट्र सरकारचा अधिकारीवर्गामध्ये इतर कोणत्याही प्रांतांत आढळणार नाही एवढे इतर जातीयांचे प्रमाण आहे. आता जिथे जिथे महाराष्ट्रात कारखानदारी नव्याने वाढू लागली आहे तिथे तिथे सर्व प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये इतर प्रांतीयांचा–विशेषतः दक्षिण भारतीयांचा–भरणा वाढू लागला आहे. पुणे–नागपूर या शहरांची उपनगरे इतर प्रांतीयांनीच भरत आहेत.

मोठ्या शहरांतील रुग्णालयांमध्ये केरळी नर्सेस, टपाल आणि तार खात्यामध्ये दक्षिण भारतीय कारकून, सर्व कचेऱ्यांमध्ये दक्षिणी लघुलेखक हे मोठ्या संख्येने वाढू लागले आहेत. इतर कोणत्याही राज्यांपेक्षा महाराष्ट्रात इतर प्रांतियांचे प्रमाण प्रथमपासूनच जादा होते ते गेल्या ८–१० वर्षांत अधिकच वाढले

**खुद्द मुंबईत, संयुक्त महाराष्ट्र होण्याच्या आधी, १९५६ साली मराठी लोकांचे प्रमाण ५४ ते ५५ टक्के होते. ते आज मुंबई संयुक्त महाराष्ट्राची राजधानी झाल्यावर–३५ ते ३६ टक्क्यांवर घसरले आहे.**

मुंबईत जे लोक बाहेरून येतात त्यांमध्ये सर्वांत जास्त प्रमाण आहे दक्षिण भारतातून येणारांचे. काही अंदाजानुसार गेल्या दहा वर्षांत मुंबईतील दक्षिण भारतीयांची संख्या सुमारे दोन लाखांवरून आठ ते दहा लाखांपर्यंत गेली आहे.

मोठमोठ्या सरकारी आणि बिनसरकारी कचेऱ्यांमध्ये, कारखान्यांमध्ये उच्च अधिकाराच्या जागा क्वचितच महाराष्ट्रीयांकडे आहेत. आणि मराठी तरुण नोकऱ्यांच्या बाबतीत होणाऱ्या स्पर्धांमध्ये टिकेनासा झाला आहे. स्पर्धेत येणाऱ्या अपयशामुळे तो निराश बनू लागला आहे. कर्तृत्वशून्य बनू लागला आहे.

हे असे का? मराठी राज्यातच मराठी लोकांची अधोगती का व्हावी? मराठी लोकांच्या कर्तृत्वाला एकाएकी ही ओहोटी का लागावी? ही पीछेहाट मराठी माणसांतील काही वैगुण्यांमुळे होते की पद्धतशीरपणे ती केली जाते?

सर्व बाजूने विचार केला असता तीन गोष्टी प्रामुख्याने या पीछेहाटीला जवळ जवळ सारख्याच प्रमाणात जबाबदार आहेत.

**गेल्या एक–दोन दशकांत मराठी समाजात निर्माण झालेली प्रचंड मरगळ व न्यूनगंडाची भावना, महाराष्ट्र सरकारचे दुर्लक्ष आणि व्यवसायासाठी दक्षिण भारतातून आलेल्या लोकांची आक्रमक गटबाजी.**

मराठी माणसाचा आक्षेप आहे तो नुसत्या गटबाजीवर नव्हे तर या आक्रमक गटबाजीवर. व्यापार आदी क्षेत्रांत मराठी माणूस स्पर्धेत कधीच फारसा उतरला नाही. म्हणून या क्षेत्रातील परप्रांतीयांविषयी मुंबईतील मराठी माणसाचे विशेष गाऱ्हाणे नाही. आहे ते त्याच्या जिव्हाळ्याच्या कारकुनी क्षेत्रात आपल्या तडफेने आणि कष्टाळू वृत्तीने झपाट्याने पुढे येणाऱ्या दक्षिण भारतीयांविरुद्ध. कारण या क्षेत्रातील स्पर्धा त्याला अतिशय तीव्रतेने जाणवते आहे.

औद्योगिक व कारकुनी क्षेत्रात मराठी तरुणांची का पीछेहाट होत आहे याची मुंबईच्या परिसरात तपशीलवार चौकशी केली असता मराठी मनाला येत असलेल्या भयानक मरगळीचे विदारक चित्र स्पष्ट होते. वाटेल तसे काबाडकष्ट करून, श्रम करून पैसे मिळविण्याची तडफ महाराष्ट्रीय तरुणांमध्ये दिसत नाही. माफक काम करून पोटापुरते पैसे मिळवले की पुरे, अशी वृत्ती आहे. कामाचे तास जास्त आहेत आणि सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेसहा असे विचित्र आहेत म्हणून मराठी मुले चांगल्या पगाराच्या नोकऱ्या नाकारतात, असे एका बड्या व्यापारी कंपनीच्या कार्यालयात समजले; तर कारखाना मुंबईच्या उपनगरात दूर आहे, आम्हांला फोर्टातील नोकरी पाहिजे म्हणून नोकऱ्या नाकारणारी मराठी मुले

पाहिल्याचे दुसऱ्या एका कुंपनीच्या बड्या अधिकाऱ्याने सांगितले. नोकऱ्या नाकारण्यासाठी मराठी तरुणांना कोणतेही कारण पुरते. काही मराठी तरुणांची अमुक जागांसाठी निवड झाली आहे आणि त्यातले बरेचसे मराठी तरुण वेगवेगळ्या कारणांमुळे कामावर रुजूच झाले नाहीत, अशी उदाहरणे तर अक्षरश: शेकड्यांनी दाखवता येतील.

मराठी तरुण लघुलिपी शिकत नाहीत. लघुलिपी शिकण्यासाठी कराव्या लागणाऱ्या श्रमांचा त्यांना बाऊ वाटतो. पुण्या-मुंबईतील लघुलिपींच्या वर्गांमध्ये जाऊन पाहिले. त्यांमध्ये ७५–८० टक्क्यांच्या वर दक्षिण भारतीय तरुणांची संख्या आढळते. मुंबईच्या तर अशा अनेक वर्गांमध्ये मराठी मुले नावालाही दिसत नाहीत. मग लघुलेखनांच्या बहुतेक जागी दक्षिण भारतीय दिसत असले तर त्याचा बराचसा रुपका या विषयाविषयी मराठी तरुणांत असलेल्या निरुत्साहावर देता येईल. दक्षिण भारतीय तरुण–तरुणी मात्र मोठ्या उत्साहाने व झपाट्याने या विषयात प्रगती करतात. मुंबईच्या लोकलगाड्यांमध्ये किंवा बस स्टॉपवर मान मोडून लघुलिप्यांचे धडे गिरवणारा तरुण किंवा तरुणी दिसली की नक्की समजावे ही व्यक्ती दक्षिण भारतीय आहे. लघुलिपीविषयी मराठी तरुणांत एवढा अनुत्साह आहे की कितीतरी कचेऱ्यांना अनेक जाहिराती देऊनही मराठी भाषेचे लघुलेखक मिळत नाहीत. त्या जागा तशाच रिकाम्या राहतात.

**" दोन-तीन वर्षांत असा प्रश्न शिल्लक उरणार नाही. आम्ही मराठी शिकून घेऊन त्या जागा भरू, " एका केरळीय लघुलेखकाने मजपाशी उद्गार काढले.**

असे कितीतरी बाबतीत घडते. सेल्समन, ओव्हरसीअर, व्यवस्थापक आदी जागांसाठी रोज शेकडो जाहिराती वृत्तपत्रांमधून झळकतात. कोणत्याही कारखान्याच्या परसोनेल ऑफिसरकडे जाऊन चौकशी करावी, पुरेशा मराठी तरुणांचे अर्जच आले नाहीत अशीच तक्रार ऐकू येईल. आपल्या मराठी लोकांना नोकऱ्यांवर लावावे, त्यांचे भले करावे अशी इच्छा मनात बाळगणाऱ्या मराठी अधिकाऱ्यांचीही प्रामाणिक तक्रार हीच आहे. आपली पुरेशी माणसे येतच नाहीत. मुंबईत एखाद्या जागेसाठी अर्ज मागवले तर आलेल्या १५०० अर्जांपैकी जास्तीत जास्त ७५–१०० अर्ज मराठी लोकांचे असतात. आणि बहुतेक अर्जदार ती जागा भरण्यास पुरेसे लायक नसतात. एखाद्या जागेची जाहिरात वृत्तपत्रांत आली की ती जागा आपल्यासाठी नाहीच असे मराठी माणूस अगोदरच गृहीत धरून त्या न्यूनगंडात सतत वावरत राहतो.

मराठी तरुणांच्या इंग्रजी बोलण्याविषयीचा न्यूनगंड तर सर्वांनाच माहिती आहे. याविषयी एका खास मराठी अधिकाऱ्याचीच हकीकत मोठी मजेदार आहे. तो म्हणतो, " आम्ही मराठी लोक इंग्रजी बोलायला का घाबरतो काही कळत नाही, पण दक्षिण भारतीय अधिकाऱ्यांचे किंवा मुलांचे इंग्रजी विशेष चांगले असते असाही अनुभव नाही. पण बोलताना मात्र ते धीटपणे दडपून देतात. माझे इंग्रजी

लिखाण अतिशय वाखाणले जाते. कुणी त्याच्यात कुठलीही चूक काढू शकत नाही. भाषेची सारेच तारीफ करतात. पण इंग्रजीतून भाषण करायचे म्हटले की मात्र घाम फुटतो. भीती वाटते. माझ्या दक्षिण भारतीय मित्रांचे उलट आहे. त्यांचे इंग्रजी लिखाण विशेष चांगले असते असे नाही. पण बोलताना चुका होवोत काही होवो. ते फाड् फाड् बोलत राहतात. "

एकीकडे हा न्यूनगंड तर दुसरीकडे अंगचुकारपणा. कोणत्याही कचेरीत काम करणाऱ्या मराठी आणि दक्षिण भारतीय कारकुनांची तुलना करावी. दक्षिण भारतीय कारकून साहेबाने सांगितलेले वाट्टेल ते काम, वाट्टेल त्या वेळी, वाट्टेल ते श्रम घेऊन करायला तयार असतो. मराठी कारकुनाचे लक्ष सतत घड्याळावर आणि ऑफिसच्या नियमांवर असते. क्षुद्र कारणांसाठी तो वरिष्ठांशी बंडखोरपणे भांडायला उठतो. दक्षिण भारतीयही बंडखोर असतो. पण कचेरीबाहेर. कचेरीत काम. "

**"अंगचुकारपणा करून चकाट्या पिटत बसणारे मराठी कारकून कामावर घेण्यापेक्षा ढोरमेहनत करणारे दक्षिण भारतीय कामावर घेणे कुणीही पसंत करील."**

असे कुणीही मालक खाजगी बोलण्यात स्पष्ट सांगतो. साहेबाने दिलेले स्टेटमेंट संध्याकाळी दिवे जाळून दक्षिण भारतीय पूर्ण करून देईल. मराठी कारकून मात्र घड्याळाचा काटा पाचवर आला की सरळ चालू लागेल. वाणीचा गोडवा नाही आणि अधिकाऱ्यांची मर्जी राखण्याची वृत्ती नाही. अशा परिस्थितीत स्पर्धेत टिकाव कसा लागणार ?

शिवाय कारकून वर्गातील यच्चयावत दक्षिण भारतीय कोणत्या ना कोणत्या नव्या परीक्षा देत असतो. नवे रात्रीचे वर्ग करून नवे डिप्लोमे पदरात पाडून घेण्याचा त्याचा सतत प्रयत्न असतो. वरच्या जागेकडे त्याची नजर असते. चेंबर्स ऑफ कॉमर्सतर्फे घेतल्या जात असलेल्या व्यापारविषयक परीक्षांना बसणारे बहुसंख्य विद्यार्थी केरळीच. इंडियन मर्चंट चेंबर्सच्या कमर्शियल परीक्षा घेणाऱ्या सर्वांत जास्त म्हणजे १५२ मान्य संस्था केरळात आहेत. महाराष्ट्रात अशा मान्य संस्था अवघ्या १४ आहेत. त्यातल्याही आठ-दहा मुंबईत आणि तेथेही दक्षिणी विद्यार्थ्यांचाच भरणा जास्त आहे. परीक्षा देऊन वरच्या जागा मिळवाव्यात, अशी महत्त्वाकांक्षा ठेवणारे मराठी तरुण कमी. थोड्या कामात भरपूर पैसे देणारी आणि सहजपणे दांडी मारण्यास वाव असलेली नोकरी त्याच्या मते सर्वोत्तम. इंग्रजीचे कच्चे ज्ञान हा काही केवळ मराठी तरुणांचा विशेष अवगुण नाही.

मराठी तरुणांची पांढरपेशा नोकऱ्यांमधील पीछेहाट का होते हे शोधताना केलेले हे थोडेसे आत्मनिरीक्षण. आता थोडी दुसरी बाजूही बघायला हवी. " आम्ही

इतक्या दूर नोकऱ्या शोधत का येतो असे तुम्हांला वाटते? आम्ही काही तुमच्यावर आक्रमण करण्यासाठी, तुमच्यावर वर्चस्व गाजवायला येत नाही. आम्ही इथे येतो ते केवळ पोट भरण्यासाठी. आमच्या राज्यात ते शक्य नाही म्हणून." एका केरळीय तरुणाने सांगितले. केरळातील बेकारी सर्वश्रुत आहे. भाकरीच्या शोधात केरळी माणूस त्रिखंडात कुठेही जायला तयार असतो. पगार कसाही मिळो. कारण हा झगडा त्याच्या अस्तित्वाचाच असतो. द्रविड मुन्नेत्र कळघमच्या चळवळीपासून मद्रासेतील ब्राह्मण हाकलले जात आहेत. राज्यात जागा मिळत नाही म्हणून ते बाहेर पडतात आणि जिथे जातील तिथे चमकतात. सरकारी नोकऱ्यांची—उच्च-पदस्थ सरकारी नोकऱ्यांची—मद्रास आणि म्हैसूरमधील परंपरा फार जुनी आहे. त्यामुळे त्या वातावरणात हे लोक फिट्ट बसतात. मध्यवर्ती आणि इतर राज्यीय सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रथमपासून तामील, म्हैसुरी आणि केरळीयांचे अधिक प्रमाण आहे. सरकारी नोकरी ही त्यांच्यात मानाची मानली जाते. त्यामुळे सारे डोळे इकडेच. बाहेरच्या प्रांतात आल्यावर जमातीप्रमाणे एक गट करून राहण्याची त्यांची नैसर्गिक वृत्ती काही जात नाही. मराठी स्वभावाच्या विरुद्ध अशी एक-मेकाला मदत करण्याची त्यांची प्रवृत्ती असल्याने एका ठिकाणी एखादा दक्षिण भारतीय घुसला की तो पद्धतशीरपणे आपल्या मागून त्या ठिकाणी आणखी आपल्या गावची माणसे लावतो.

मुंबईत तर हे फार चालते. मुंबईत साऱ्या तामीळ लोकांच्या, केरळीयांच्या, तेलगूंच्या आणि कनडीगांच्या संघटना आहेत. या संघटनांमधून मोठमोठे सरकारी व इतर अधिकारी असतात. त्यांची एक सोसायटीच तयार होते. आणि अनेक नोकऱ्यांचे निर्णय अशा सोसायट्यांमध्ये घेतले जातात. साऱ्या भारतात सर्वत्र सरकारी आणि बिनसरकारी क्षेत्रात व्यवस्थापकीय कामांवर उच्च अधिकाऱ्यांच्या जागा मोठ्या प्रमाणावर दक्षिण भारतीयांच्या हाती असतात. **मुंबईतील ३५ मोठ्या कंपन्यांच्या १५०० उच्चपदस्थ अधिकाऱ्यांत फक्त ७५ मराठी आहेत.** याचा उपयोग कसा करून घेतला जातो यासंबंधीची एक वस्तुस्थिती एका माहीतगाराने मला सांगितली. मुंबईतील आणि बाहेरीलही अगदी सर्व मोठ्या व्यापारी आणि औद्यो-गिक कंपन्यांमध्ये एका निनावी उच्चपदाची जागा असते. आणि या जागेवर कटाक्षाने दक्षिण भारतीयच नेमला जातो. या अधिकाऱ्याचे काम एवढेच की वेग-वेगळ्या सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध चांगले ठेवून कंपनीची कामे भराभर करून घेणे. बहुतेक महत्त्वाचे सरकारी अधिकारी दक्षिण भारतीय असल्याने त्याला हे काम भलतेच सोपे जाते. आपल्या माणसांना नोकऱ्या मिळवून देणे वगैरे कामे तर त्यामुळे त्यांना सहज करता येतात.

महाराष्ट्रात दक्षिण भारतीय लोकांची अशी गटबाजी चालते ही गोष्ट खरी आहे. कारखान्यांमध्ये, उद्योगांमध्ये, व्यापारामध्ये कोणताही दक्षिण भारतीय

शिरला की त्याच्यामागून त्याच्या आप्तेष्टांचे असे लोंढेच्या लोंढे सुटतात. दक्षिण भारतीयांचा या स्थलांतरामागचा मूळ हेतू अर्थातच पोट भरण्याचा असतो, आवश्यक म्हणूनच त्यांनी हे स्थलांतर सुरू केले. आता तर स्वतःची जमीन सोडून सारी बंधने तोडून दूर जाण्यासाठी जो निर्भयपणा लागतो तोही त्यांच्या ठायी आलेला आहे. त्यांची भीड चेपली आहे आणि आता केवळ वृत्ती म्हणून अधिक चांगल्या नोकऱ्या मिळतात म्हणून ते मुंबईत आणि महाराष्ट्रात येत असतात. गेल्या काही वर्षांत त्यांच्या स्थलांतराचा हा वेग झपाट्याने वाढला आहे. आणि हे स्थलांतर फक्त मुंबई आणि महाराष्ट्रातच होते असे नाही. जिथे जिथे नोकऱ्या मिळतील तिथे तिथे हे लोक बेधडक घुसतात.

एखाद्या जमातीप्रमाणे गट करून घुसण्याची ही पद्धत केवळ दक्षिण भारतीयांचीच आहे असेही नव्हे–सर्वत्र तेच घडते. एकेका मातीचा गुण असतो. सांगली-मिरजे-कडचे तरुण सैन्यात जातात. मुंबईतले बहुसंख्य पोलिस रत्नागिरीचे. रंगारी साधारण साताऱ्यातूनच येणार. अलिबाग जिल्ह्यातील एका गावचे लोक छापखान्यांमध्ये खिळे जुळवायला मुंबई-पुण्यात येतात. एक माणूस गेला की त्याच्या पाठोपाठ अनेकांनी शिरायचे ही आर्थिक स्थलांतराची सहजप्रवृत्ती आहे. तेच इथे सध्या घडते आहे.

पांढरपेशा नोकऱ्यांमध्ये जशी या लोकांची रांग लागली आहे तशीच इतर बाबतींतही यांची स्पर्धा आहे. उडुप्यांची हॉटेले प्रसिद्ध आहेत. गेल्या एका दशकात भारतातील फार मोठ्या भागात उडुप्यांनी हॉटेलांचा धंदा आपल्या हाती राखला आहे. **मुंबईतील १० हजार हॉटेलांपैकी ४ हजारांच्यावर हॉटेले उडुप्यांनी चालविली आहेत.** दहा वर्षांपूर्वी शंभरातही उडुप्यांची हॉटेले मुंबईत नव्हती. एवढ्या झपाट्याने त्यांनी या धंद्यात प्रगती केली आहे. सहाशे शहरी उडुप्यांची हॉटेले लोकप्रिय होत आहेत. **कारण ती स्वस्त आहेत. आणि त्यांमधील पदार्थ चांगले असतात.** आणि उडुप्यांच्या हॉटेलांतील झाडून सारे नोकर त्यांचे गाववाले असतात. दिवसा हॉटेलात फरशी पुसणारी ही सर्व उडुपी मुले रात्रीच्या शाळेस जातात. वेगवेगळ्या परीक्षा देतात आणि ही नोकरी सोडून देऊन चांगली नोकरी शोधण्याच्या प्रयत्नांत राहतात. **या उलट हॉटेलांमधून काम करणारी मराठी मुले रात्रीचा वेळ वरळी मटका लावण्यात घालवतात. मुंबईच्या मराठी हॉटेलांत घाण वास मारतो म्हणून कुणी शिरत नाही. आणि शेवटी चालत नाहीत म्हणून ती विकावी लागतात उडुप्यांनाच.**

मुंबईतील मराठी लोकांच्या मनात दक्षिण भारतीयांच्या विरुद्ध आकस निर्माण होण्याचे खरे कारण पांढरपेशा नोकऱ्यांमध्ये वाढलेली स्पर्धा हे नसून दक्षिण भारतीयांच्या झोपडपट्ट्यांचा वाढता उपद्रव हे आहे. मुंबईत सुमारे १२ लाख वस्तीच्या झोपडपट्ट्या आहेत. त्यांपैकी अवघी अडीच लाख वस्ती मराठी आहे. आणि बाकीच्यांपैकी ८० टक्क्यांच्यावर दक्षिण भारतीय आहेत. केरळ, मलबार, मद्रास

आंध्र, म्हैसूरमधील बेकार लोकांचे लोंढेच्या लोंढे मुंबईत लोटत असतात. आणि ते बेकायदेशीरपणे झोपडपट्ट्या उभारून राहतात. त्यांच्यामध्ये नाना तऱ्हेचे लोक असतात. गुन्हेगार असतात, हद्दपार केलेले लोक असतात, भिकारी असतात, अपंग असतात आणि त्यांचे सर्व तऱ्हेचे बेकायदेशीर धंदे चालू असतात. बेकायदा दारू गाळण्यापासून तो वेश्या पुरविण्यापर्यंत सारे उद्योग संघटितपणे चालू असतात. त्यांच्या उद्योगांची कुणी दखल दिली तर मार खावा लागतो. त्यांच्या झोपडपट्ट्यां-मध्ये बेकायदा विजेचा प्रवाह आलेला असतो. संघटित गुंडगिरी करून हे लोक पोलिसांवरही दहशत बसवतात. नळांचे पाईप फोडतात. सारा परिवार घाण करतात. आणि आजूबाजूच्या लोकांमध्ये स्वतःबद्दल घृणा निर्माण करतात.

**मुंबईत दक्षिण भारतीयांबद्दल बऱ्याच लोकांच्या मनात घृणा निर्माण झाली आहे हे सत्य आहे. त्याचे कारण मात्र या झोपड्याच.**

सरकार आणि नगरपालिका या झोपडपट्ट्यांना हात लावीत नाहीत. कारण त्या संघटित असतात.

महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या गाळ्यांमध्ये जागा मिळविण्यासाठी मराठी माणसाला कोण यातायात करावी लागते. पंधरा वर्षे सतत महाराष्ट्रात राहत असल्याचा दाखला द्यावा लागतो. मध्ये कुठे एखादे वर्ष बाहेर गेले असले की आली पंचाईत. सतरा खटपटी कराव्या लागतात. इतकेही करून मराठी लोक या गाळ्या-मध्ये जागा घेण्यास फार मोठ्या संख्येने येतात असे नव्हे. गृहनिर्माण मंडळाजवळ अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. पण सहज धावती नजर टाकली तरी मंडळाचे बहुसंख्य गाळे इतर प्रांतीयांनी अडविलेले दिसून येतात. वसाहतीमध्ये भाडेकरू मंडळाचे पदाधिकारी दक्षिण भारतीयच असतात. बाहेरचे मराठी लोक एक तर मुंबईत राहायला यायलाच तयार नसतात. आणि मुंबईतले मराठी लोक उपनगरां-मध्ये चांगल्या जागा मिळाल्या तरी गिरगावातील आपलं खुराडं सोडायला तयार नसतात. म्हणूनच माटुंग्यापासून डोंबिवलीपर्यंत दक्षिण भारतीयांची वस्ती वाढत जाते. अगदी डोंबिवलीतही नव्याने बांधली जाणारी घरे दक्षिण भारतीयच भाड्याने घेताना दिसतात. गृहनिर्माण मंडळाची जागा मिळविण्यासाठी १५ वर्षे सतत महा-राष्ट्रात राहत असल्याचा दाखला लागतो. कोणत्या लटपटी खटपटी करून हे लोक जागा मिळवतात कुणास ठाऊक; पण त्यांना जागा मिळते हे खरे.

साधारणतः पापभीरू आणि कायद्याने चालणाऱ्या मराठी माणसाला हे सारे बेकायदा व्यवहार बोचतात. आणि आपल्या साऱ्या दुःखाचे कारण हे बाहेरून आलेले लोक असे त्याला वाटू लागते. महागाई वाढली, रेशन कमी झाले, पाणी मिळत नाही, सामाजिक असुरक्षितता वाढली या सर्व कटकटींना हे बाहेरचेच लोक जबाबदार आहेत असे त्याला वाटू लागत आणि त्याच्या मनातील आकस पक्का होऊ लागतो.

त्यात भर पडते, फोर्टमधल्या फेरीवाल्यांची आणि बूटपॉलिशवाल्यांची: चार-पाच वर्षांपूर्वी फोर्टमधील सारे बूटपॉलिशवाले मराठी होते. आता त्या ठिकाणी सारे मलबारी आणि केरळी पोरे आहेत. गिऱ्हाइकाला थोडासे भुलवून बुटांना क्रीम वगैरे लावून एकदम अडीच रुपये ते मागतात. कुणी नाही म्हटले की टोळके जमा करून मारामारी. अनेकांना हा अनुभव आला असेल. आणि बूटपॉलिश हा त्यांचा एकमेव धंदा नव्हे इतर अनेक बेकायदा धंदे त्यांचे सतत चालू असतात.

मुंबईचे जवळजवळ सारे फूटपाथ सध्या दक्षिण भारतीय फेरीवाल्यांनी ताब्यात घेतले आहेत. कापड, स्टेशनरी, भाजीपाला आणि इतर कोणताही फुटकळ माल ते फूटपाथवर विकतात आणि प्रचंड फायदा कमावतात. त्यांची संघटना असल्याने भांडवलाची त्यांस कधीच ददात पडत नाही. आपापल्या संघटनांतर्फे त्यांना भरपूर भांडवल मिळत असते. धाडसी प्रवृत्ती असल्याने ते धंदा लवकरच भरभराटीला आणतात आणि मराठी स्पर्धकांना सहज लोळवितात.

जे मुंबईला घडते तेच थोड्याफार प्रमाणात इतर औद्योगिक वसाहतीत घडते. आपल्या राज्यात मराठी लोकांना नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रमाण द्यावे, त्यांना नोकऱ्यांच्या बाबतीत संरक्षण द्यावे असे राज्यकर्त्यांना कधीच सुचले नाही. मराठी अधिकारी साधारणत: कायदा पाळणारे. आपली माणसे कामाला लावावी वगैरे संकुचित दृष्टिकोन खरोखरच फार कमी मराठी अधिकारी ठेवतात. आणि एक राज्य सरकारची खाती सोडली तर इतर ठिकाणी आपली माणसं लावता यावीत एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या जागांवर मराठी माणसं फार नाहीतच मुळी. जे आहेत ते एकमेकांना पाण्यात पाहून, एकमेकांचे पाय ओढण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना आपल्या माणसांसाठी काही करण्याची इच्छा असते आणि तेवढी शक्तीही असते त्यांना लायक माणसं मिळत नाहीत. काही माणसं मिळाली तर ती त्यांच्या आळसामुळे, अंगचुकारपणामुळे कसोटीला उतरत नाहीत. लायक माणसं न्यूनगंडानं पछाडलेली. अर्ज करण्यापूर्वी दहादा विचार करतील आणि शेवटी अर्ज टाकणार नाहीतच.

आणि अशा मोकळ्या कुरणावर आर्थिक दारिद्र्याने गांजलेले, तल्लख बुद्धिमत्तेचे, कष्टाळू दक्षिणी चरायला येतात व भराभरा पुढे सरकतात. आणि मग बोंबाबोंब होऊ लागते, महाराष्ट्रीयांची पीछेहाट होते आहे, मराठी लोकांवर अन्याय होतो आहे. चीड वाढू लागते. संताप वाढू लागतो आणि त्यातूनच मग एखादी शिवसेना जन्म घेते !

(अपूर्ण)

## शब्दबिंब

शब्द रिता, गंध रिता
नाद रिता, छंद रिता
स्वाद रिता, मोह रिता
रात्री खळखळते सरिता
रात्रीचा ध्यान छंद
सरितेचा सूर मंद
हातांचा तीव्र बंध
मदिरेचा मद, सबंध
मद्यालय आसुसले,
चषकांचे खूळ पळे
मदिरेची वात जळे
शब्दबिंब मग उजळे

—अरण्यज्योति

## कृष्णा

जा अशीच जा
मागे फिरून सुद्धा—
पाहू नकोस
चार लोकांमध्ये अशी
अवघडून उभी—
राहू नकोस
विसर विसर सारे
मी काहीच म्हणणार—
नाही
तुझ्या सुखाआड
कधीच येणार—
नाही
सदा चिंतित राहीन
फक्त तुझेच भले
मीरेसाठी देवा !
कृष्णाला पिऊ दे प्याले

—राजीव



## नेत्र दिले मज— !

नेत्र दिले मज बघण्यासाठी
सौंदर्याचे रंग मुलायम
कसे बदलती क्षितिजावरती
त्या रंगांच्या इंद्रधनूतुन
उरल्या सुरल्या प्रकाशकणिका
कशा पसरती अवनीवरती
चोर पावली !
नेत्र दिले मज वदण्यासाठी
जेव्हा अडती अधरांवरती
शब्द लाजरे उघडे करता
हितगुज मनिचे, कधि तुजपाशी
त्या भाषेतच गुंगून जातो
जातो रंगुन पुढ्यात असता
कुणी अबोली !
नेत्र दिले मज रडण्यासाठी
जेव्हा होते मनात वादळ
बसतो हरवुन तुझ्या मूर्तिला
तुझ्या प्रीतीच्या तालावरती
जेव्हा घेते शुद्ध हिरावुन
दहिवर तुझिया पानांवरचे
रोज सकाळी ! !

—अवधूत मालेकर

# आस्वाद

'शब्दबिंब' ही कविता आपण लयबद्ध नादमधुर पंक्तींनी मोहून जाऊन गुणगुणू लागतो. आशयाचा विसर पडेल इतकी त्यांत शब्दांची कलाकुसर आहे. पण खळखळणाऱ्या सरितेचा प्रवाह सर्व कडव्यांत आला असता तर अधिक मौज झाली असती. 'सबंध' हा शब्द चुकारपणे येऊन बसला आहे. बाकी रचना चांगली आहे. हे गीत आहे. एकेला ओळीत एकेका चित्राचा आराखडा आणि षण्मात्रिक सुरेल ओळी यांमुळे कविता आकर्षक झाली आहे. आसुसलेल्या मद्यालयात चषकांचे खूळ पळाले म्हणजे काय ? चषकांनी घ्यायच्याऐवजी आता पिपेच तोंडाला लावणार की काय ? 'अरण्यज्योतीं'नी यावर अधिक प्रकाश पाडायला पाहिजे होता. बाकी आहे त्या स्थितीतही हे गीत चांगले आहे.

'नेत्र दिले मज' या अवधूत भालेकर यांच्या कवितेत एक कल्पना तीन दृष्टि-कोनातून खेळविली आहे. तीत भावनांचा भाग थोडा, कल्पनेचा खेळ अधिक. भावना आल्या आहेत त्या शेवटी. डोळे रडण्यासाठी दिले आहेत खरे–पण ते रडणेही कधी अत्यंत सुखावह असते–कवितेच्या बौद्धिकतेला इथेच भावनेची किनार जोडली आहे. सूक्ष्म विषय अत्यंत सुबोध शब्दांत मांडला हे अभिनंदनीय.

एखाद्याच कल्पनेने एखादी कविता हृद्य होते. 'कृष्ण' या कवितेत पहिले सारे सांकेतिकच आहे. प्रेयसीने निराशा केली तरी त्याबद्दल तिचा द्वेष न करता तिचे भले चिंतणे ही वृत्ती अगणित कवितांत आढळते. खऱ्या प्रेमात हीच भूमिका असली पाहिजे. पण या कवितेत शेवटची कलाटणी हृदयंगम आहे. मीरेसाठी कृष्णाला विषाचे पेले घ्यावे लागतात या विधानाने साऱ्या कवितेला एक नवी लज्जत आली आहे. फरक एवढाच की मीरेला ते समाजाने दिले आणि कृष्ण मीरेसाठी स्वतःच घेत आहे ! हे राजीवांनी स्पष्ट केले असते तर एक नवा पैलू दिसला असता.

–गोपीनाथ तळवलकर

# पाळणा

"या घरात पाळणा हलत नाही...
या घराच्या अंगणात
मूल कधी रांगणारच नाही...
नेमकं हेच...हेच कारण असावं
ह्यांचं...मला पसंत करण्याचं..."

शरद बरबरे

पोस्टमननं एक पाकिट अन् दोन कार्ड घरात टाकली. टाकताना आडनावाचा पुकारा करण्यास तो विसरला नव्हता...प्रमिला संथपणे आपल्या खोलीतून बाहेर आली. निर्जीवतेनं तिनं ती पत्रं उचलली. दोन्ही कार्डं यशवन्ताच्या नावावर होती. ती वाचण्याचंही तिच्या जिवावर आलं. निरुपयोगी वस्तू कुठेही ठेवून द्यावी तशी ती दोन्ही पत्रं तिनं दत्ताच्या तसबिरीमागं ठेवली...आता हातांत फक्त एक पाकिट तेवढं आलं होतं...त्यावरचं अक्षर तिच्या चांगल्या परिचयाचं होतं...ह्याच अक्षरांनी तिला लहानपणी प्रथम 'श्री' काढायला शिकवलं होतं ... तात्यांचं अजूनही लेकीवरचं प्रेम कमी झालं नव्हतं की जरासुद्धा त्याला उतार लागला नव्हता...आठ-पंधरा दिवसांतून ते पोरीला वात्सल्यानं भरलेली, मायेच्या पोटी लिहिलेली पत्रं धाडीतच असत ... पण आता हे पाकिट उघडताना प्रमिलेला मुळी-सुद्धा उत्सुकता नव्हती ... जसं काही तिचं आणि तात्यांचं आता काही नातं उरलंच नव्हतं... एकवार तिनं पाकिटावरून चौफेर नजर फिरविली नि मग नकळत ती पुटपुटली, " अं, तात्यांचं पत्र,...काय असायचं त्यात. प्रकृतीची काळजी घे ... जागरण करीत जाऊ नकोस ... वाचनाचं वेड कमी कर ... आनंदात राहा. विनू तुझी आठवण काढतो ... रोज त्याला उचकी लागते ... वगैरे वगैरे ..." बस्स् ... असंच काही तरी ठराविक साच्याचं त्यात लिहिलेलं असणार ! ... लग्न होऊन सहा महिने झाले...तेव्हापासून तात्यांचा हाच मजकूर ... दुसरं काही नवीन शोधूनही सापडायचं नाही ...

—— आणि नवीन तरी काय असणार म्हणा ... वयात आलेल्या थोरल्या पोरीचं लग्न झाल्यानंतर डोक्यावरचं ओझं खांद्यावर उतरलं असेल त्यांच्या...गरीब असून-देखील श्रीमंत व्याही मिळाले म्हणून कौतुकानं सांगत सुटले असतील ते गावभर...

पण इकडे पोरीच्या काळजाला जखम झाल्याचं ... तिच्या आयुष्यातला आनंद हर-वून टाकल्याचं त्यांच्या गावीही नसेल...ते मनाशी म्हणत असतील, "चला, कर्तव्यातून तर पार पडलो ... पोरीच्या आईला दिलेलं वचन तर पाळलं..."

आईची आठवण येताच प्रतिमा कळवली ... गलबलली ... स्वर्गस्थ आईच्या स्मृतीनं गहिवरून आली ... हातातल्या पाकीटाचं अस्तित्वसुद्धा ती विसरून गेली ... आपल्या खोलीकडे धावत जाऊन तिनं उशीत तोंड खुपसलं नि हुंदक्यानं ती रडू लागली ... तिच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू जणू म्हणत होते..." आई, देवानं तुला इतक्या लवकर का नेलं ग ?...चांगली, सद्गुणी माणसंच देवाला आवडतात ... इतका का तो स्वार्थी असतो माणसांसारखा ?... आई ... तू जर असतीस ना ... तर किनई ... तू हे लग्न होऊच दिलं नसतंस ... आपण गरीब असलो ... आपली मिळकत थोडी असली ... नि आपली पोर एका डोळ्यात अधू असली तरीसुद्धा तू पूर्ण माहिती घेतल्याशिवाय...चौकशी केल्या-खेरीज माझ्या अंगाला हळद लावून दिली नसतीस...हो ना ग आई? ... आणि आई ... खरं सांगू का ... तात्यांना मुळी माझं ओझंच झालं होतं बघ ... अन् म्हणूनच त्यांनी मला ह्या अशा घरात ... "



प्रमिलेला अश्रू आवरत नव्हते... आसवांना आवर घालणारंही तिच्या पाठीशी कुणी नव्हतं ... यशवन्त दुकानाच्या उद्योगात गुंतलेला होता ... तेवढंच हक्काचं माणूस... बाकीच्यांचा जवळ असून काय उपयोग...ते असून नसून सारखंच... सावलीइतके नजीक असून शेकडो योजने दूर दूर ... प्रमिलाच्या पाठीवरून हात फिरवायला...तिचं सांत्वन करायला कुणीच नव्हतं ...

प्रमिलेला तिच्या लग्नाचे मुरु-

वातीचे दिवस आठवू लागले...त्या अनुभवलेल्या सुखाच्या सोनेरी किरणांनी खोली-तल्या मिट्ट अंधारातही तिचं मनं प्रकाशून गेलं... डोळे मिटून, पापण्या निपटून ती त्या सुखद जीवनाचा अनुभव घेऊ लागली ...

... सहा महिन्यांपूर्वी, फक्त सहा महिन्यांआधी प्रमिला सुखाच्या ओझ्यानं गुदमरून गेली होती ... तात्यांनी हरतऱ्हेने प्रयत्न करूनदेखील त्यांच्या कोशिशीला फळं आलं नव्हतं. ते अनपेक्षितपणं आणि प्रयत्नावाचून घडलं होतं ... असेच अनपेक्षितपणे एके संध्याकाळी तात्यांकडे काही अनोळखी माणसे येऊन उतरली... दोन वयस्क गृहस्थ...एक तरुण नि प्रौढावस्थेच्या दरम्यान असणारा तरुण...तात्यांनी त्यांचं स्वागत केलं...पाहुण्यांपैकी एका दुढ्ढाचार्यानं म्हटलं, " भाऊराव,...आम्हांला आपल्या स्थळाची माहिती मिळाली म्हणून आमचं येणं झालं ... मध्यस्थ म्हणून आम्ही आलोत एवढं म्हटलं म्हणजे पुरे ... हे यशवंतराव ... यांच्या मालकीचं कापडाचं दुकान आहे ... बरीचशी जमीन आहे ... चार-पाच घरं आहेत हक्क सांगण्यासारखी ... झालंच तर ... " त्यावर तात्यांनी त्यांना हात उंचावून मध्येच अडवीत म्हटलं, " अहो, पण हे कशासाठी ? त्यांच्या श्रीमंतीची आम्हांला पूर्ण जाणीव आहे ... मोठा घास घेऊ नये लहान तोंडानं म्हणून मी त्यांच्याकडे गेलो नाही त्यापूर्वी ... वाटलं होतं ..." हे कुबेर आम्ही दरिद्री ... ह्यांचा लौकिक मोठा. आम्ही अडगळीसारखे उपेक्षित ... परंतु आज तुम्हीच म्हणता की ... " तात्यांना पुढे बोलवेना ... एखाद्याला भूक सडकून लागली असावी नि थोडंसं अन्न कुठे मिळेल का ह्या विवंचनेत तो असावा आणि तेवढ्यात त्याच्यासमोर कुणी तरी पंचपक्वान्नाचं सुग्रास अन्नानं भरलेलं ताट आणून ठेवावं तसं तात्यांना झालं होतं ...

शेवटी तात्यांनी धीर गोळा करून म्हटलं, " माझी मुलगी चाणाक्ष आहे...हुशार आहे ... संध्याकाळनंतर उभ्या आयुष्यात तिनं कधी उंबरठा ओलांडला नाही ... घराचा ... पण एक सांगतो ... आता जे आपल्या हातचं नाही त्याला तुम्ही–आम्ही काय करणार ... मुलगी एका डोळ्यानं अधू आहे माझी ... ह्यांना आवडेल, पसंत पडेल का ह्याचीच जरा ..."

तात्यांना मध्येच थांबवीत ते गृहस्थ उत्तरले, ..." हे पाहा भाऊराव, तुमचं घराणं आम्ही जाणतो ... कमी शिकलेली का असेना पण गुणवान् पोर हवी आहे ... तेव्हा तशी काही अडचण नाही ... व्यंगाचं म्हणाल, तर असं पाहा ... आमचा पोरगाही काही मदनाचा पुतळा नाही लागून गेला ... भलत्या कल्पनांच्या आहारी जाणारी आम्ही ती माणसं नव्हेत ...एका लग्नात मागे आम्ही तुमची मुलगी पाहिलीय ... यशवन्तालाही दाखवलीय. त्याला तर ती अधू आहे हेच मुळी मान्य नाही... भाऊराव, शरीराचे दोष दिसतात माणसाला. पण वागणुकीतल्या अयबीकडं लक्ष पुरवायला वेळ नसतो कुणाला... ! तर सांगायचं असं की...मुलगी आम्हांला पसंत आहे... आपल्यासारख्याकडून पैशाची आशा करण्याइतके निष्ठुर नि लोभीही आम्ही

नाहीत ..."

तात्यांना आनंदानं वेड लागायची पाळी आली... प्रमिलेच्या मैत्रिणींनी तर तिला नुसतं भंडावून सोडलं ... "आता काय बाई, कापडाचंच दुकान आहे ... मग काय ... राणी सरकारला रोज एक नवी कोरी साडी नजर ... झालंच तर घरंदारं ... आज इथे तर उद्या तिथे ... मज्जा आहे हं ... शिवाय दीर-मावजयांचा संपर्क नाही ... जे ते आपले स्वतंत्र ... मग काय ... राजा-राणीचा संसार ..." असे किती तरी सुखद ताशेरे झाडले जाऊ लागले ... प्रमिला लाजेनं हरखून गेली होती ... आजूबाजूला कौतुकाचे सडे शिंपले जात होते ... काही विघ्नसंतोषी लोकांना वाटतं होतं ते केवळ आश्चर्य ... त्यांच्यांत चर्चा सुरू होती ... ते म्हणत होते, "अहो ... नवलाईचीच गोष्ट म्हणायची ... एका डोळ्यात पोरगी पार कामातून गेलीय नि ह्या पोरानं, पसंत केली कशी तिला ... वेडचापच दिसतंय लेंकाचं ..."

... परंतु तरीही तात्यांनी मोठ्या उत्साहानं प्रमिलेला मांडवात उभं केलं ... आईच्या मायेला मुकलेलं अजाण पोर ... तात्यांच्या काळजात पोरीच्या विरहाचं दु:ख साचू पाहत होतं ... मुलगी उपवर झाली म्हणजे परक्याचं धन ज्याचं त्याला देऊन टाकायचं ... असं सारेच म्हणतात ... ऐकतात ... पण प्रत्यक्ष वेळ येते तेव्हा अश्रूंचे बांध कुणाला आवरता येत नाहीत हेच खरं ...

... मेंदीभरल्या पावलानी प्रमिलेनं यशवंताचा हात धरून हिरव्या चुड्यानं नव्या घरात प्रवेश केला ... ते सर्व जगच तिला नवीन होतं ... वैभवानं तळपत होतं ... श्रीमंतीनं चकाकत होतं ... ऐश्वर्यानं उजळलं होतं ... कुठे आपली चिमुकली झोपडीवजा दोन हातांची खोली नि कुठे हे चिरेबंदी राजवाड्यासारखं घर ... सारंच नवीन ... तिला ह्या सुखद जाणीवेनं थोडं रडूच यायला लागलं ... सुखाच्या भावनेनंदेखील आसवांना वाट मिळते ती अशीच ...

पहिल्या रात्री तिनं यशवंताकडं भीत भीत पाहिलं ... संसारसुखाच्या अपेक्षेनं पुरुषाचा घडलेला तो पहिला स्पर्श ... ती लाजेनं आधीच अर्धमेली झाली होती त्यात हा स्पर्श ... ती रोमांचून गेली ... यशवंताची सावळी मनगटं .... सूक्ष्म लवीनं नटलेली ... आपुलकीनं ओढीत उच्चारलेले मधाळ प्रश्न ... कपाळावरती चमकणारा एक बराच मोठा जुना व्रण ... नीटस नाक ... अधूनमधून खालचा जाडसर ओठ दातांनी हलकेच दाबण्याची गंमतीशीर सवय ... प्रमिलानं हे किती पटकन् टिपलं होतं ? ... तिला स्वत:लाच आश्चर्य वाटून राहिलं होतं ... किती अल्पावधीत आपण विसरलो जुनं दु:ख ! ... नव्या सुखाच्या चाहुलीनं माणूस इतका का बदलतो ! तिला काहीच कळत नव्हतं ...

... जसजसे दिवस–रात्रीचे पाळणे हलू लागले तसतशी प्रमिलाही नात्यागोत्यातल्या माणसांत रुळून गेली ..... सासरच्या संबधितांशी तिच्या ओळखी वाढू

लागल्या ... त्या घरातली ती सर्वांत धाकटी सून होती ... तिच्याहून मोठ्या तीन जावा तिला होत्या ... परंतु प्रत्येकीचा संसार स्वतंत्र होता ... यशवंताच्यापेक्षा मोठे असलेले तीनही भाऊ स्वेच्छेने वेगळे झाले होते ... प्रत्येकाचा स्वतंत्र व्यवसाय होता...रिकामं कुणी नव्हतं...घरादारांची वाटणी अद्याप झाली नव्हती...लग्नाच्या वेळी यशवंताच्या तिन्ही भावांनी मोठ्या उत्साहानं भाग घेतला होता ... तिन्ही जावादेखील सतत धडपडत होत्या ... शिवाय धाकटी नणंदही मिरवत होती ... दोन वर्षांपूर्वीच तिचं लग्न झालं होतं ... प्रमिला यशवंताच्या संसारात खूप सुखी होती ...

..."खरंच, किती सुखाचे होते ते सोन्याचे दिवस ..." उशीत डोकं खुपसून बसलेली प्रमिला मनाशीच म्हणाली ... तिनं इकडं तिकडं पाहिलं ... आपण बराच वेळ अशाच बसून आहोत हे नंतर लक्षात येताच तिनं लगबगीनं केस सारखे केले ... कॉटवर उठून बसत ती मनाशीच पुन्हा म्हणाली .. तात्यांना तरी दोष देण्यात काय अर्थ आहे म्हणा ... त्यांची तरी काय चूक ... आपण सुरुवातीला सुखाच्या लाटेवर तरंगत होतो ... आपल्याला तसं पाहिल्यानंतर तात्यांनी सुटकेचा नि त्याचबरोबर सुखाचा निःश्वास टाकला होता तो काय उगाच ? पण तरी तात्या थोडं चुकलेत... त्यांनी जरा चौकशी करायला हवी होती ... अशा श्रीमंतीनं झगमगणाऱ्या वाड्यापेक्षा गरिबीत शांतपणे उभ्या असणाऱ्या छोट्या घरात आनंदाने राहिले असते मी ..."

...प्रमिला उठली.... तात्यांचं पाकिट फोडणंसुद्धा तिला सुखकारक वाटेना... विचारांच्या विचित्र अवस्थेत ती स्वयंपाकघरात गेली...तिच्या मनात उल्हास असा राहिलाच नव्हता...कुठं जावं नि कुणाशी बोलावं तेच तिला समजत नव्हतं... हा एकलेपणा तिला सहन होत नव्हता. उद्याच्या सुखासाठी आजचं दुःख तिनं साहिलंही असतं...पण जिथं सुखाचा किरण आज, उद्या, परवा...महिन्यानं, वर्षानं, कधीच उगवणार नव्हता तिथं दुःख सहन व्हायचंच कसं...?...

अज्ञानात सुख असतं म्हणतात ना...अगदी खरं आहे ते...महिन्यापूर्वी सुखाच्या हिंदोळ्यावर वीट आल्याचा आळस देणाऱ्या प्रमिलाचं अज्ञान असंच कायम राहिलं असतं तर आणखी बरीच वर्षे तिनं ह्या सुखाचे घुटके स्वैरपणे घेतले असते...पण तसं व्हायचं नव्हतं...तिला लग्नानंतरच्या पाच-सहा महिन्यांतच हे अज्ञान दूर करण्याचा फासा टाकावा लागणार होता...म्हणजे त्याचं असं झालं होतं......

गेल्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गावात कुणाकडं तरी 'हळदीकुंकू' होतं....प्रमिला मोठ्या घरातली सून...अन् त्यातच अगदी नव्याने आलेली... त्यामुळे तिला अगदी आवर्जून बोलवण्यात आलं होतं...त्या घरी ती शेजारच्या दोन-तीन बायकांबरोबर संध्याकाळी हळदीकुंकवाला गेली होती. बड्या घरात पडलेली असल्यानं तिथं तिचं खूपच आगतस्वागत झालं होतं...यशवंताचं सौभाग्य-

लेणं सांभाळीत ती मोठ्या दिमाखात वागत होती. बऱ्याच वेळानंतर त्या घरातल्या एका वृद्ध स्त्रीनं तिला बोलावून आत नेलं होतं...प्रमिलानं त्या वेळी अगदी सहज-पणानं तिथल्या माणसांचं कौतुक मिळवलं होतं... आत गेल्यानंतर आपल्या आता-पर्यंतच्या अज्ञानाचा बुडबुडा असा नकळतपणे फुटेल ह्याची तिला बिचारीला मुळी-सुद्धा कल्पना नव्हती.

ती आत गेल्यानंतर त्या वृद्ध स्त्रीनं तिला विचारलं होतं, " यशवंताचीच बायको ना ग तू ? आता म्हातारपणामुळं दिसत नाही बाई मला चांगलं, म्हणून विचारलं बरं !" त्यावर अंगठ्यानं जमिनीशी चाळा करीत प्रमिला तशीच लाजून अधोमुख बसली होती. मग त्या म्हातारीनंच पुढं आपलं बोलणं सुरू केलं होतं,– " मोठ्या भाग्याची पोरी तू,...अशा घरात पडलीस...नशिबात असतं ते कधी चुकत नाही बरं बाळ; आता एकाच गोष्टीची जरा भीती वाटते...पण तुझ्याकडं पाहिल्यानंतर मात्र..."

प्रमिला म्हातारीच्या विचित्र बोलण्यानं जरा दचकलीच होती. त्या शब्दांचा तिला अर्थबोधच होत नव्हता. शेवटी ती जरा चिडूनच म्हणाली, " कसली भीती वाटते सासूबाई तुम्हांला...माझ्यात तर काही दोष नाही ना दिसला तुम्हांला ?... डोळ्यांचं म्हणाल तर ते त्यांना आधीच..."

" तुझ्याबद्दल नाही म्हणत मी पोरी,..." म्हातारी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत बोलली,–" यशवंताच्या घराबद्दल म्हणते मी..."

–" अहो, पण त्यांचं नि माझं घर का वेगळं आहे ?"प्रमिला फटकन उत्तरली होती.

..."तसं नव्हे ग...आता यशवन्ताचे भाऊ आहेत ना...म्हणजे तुझे थोरले दीर?"

" बरं मग ? त्यांच्याविषयी काय सांगायचंय का ?"...

" हो ग बाई,...अग, वर्षा-दोन वर्षांच्या अंतरानं लग्नं झाली ह्या तिन्ही पोरांची...पण अजून काही..."

" काय सांगायचंय सासूबाई तुम्हांला ? असं अर्धवट का हो बोलता ?..."

" तुला दुखवावसं नाही वाटत पोरी, पण करू काय...कधी तरी कळलंच पाहिजे ना...अग...अजून एकाचाही पाळणा हलला नाही...तिघांच्याही घरी अगदी शुकशुकाट...टिकोबा नि टिकाई...आता लोक काहीतरी बोलतात बाई... मी तरी कुठवर गप्प बसवणार त्यांना...मारणाराचा हात धरता येतो...बोलणा-राच्या तोंडाला कुणी हात लावायचा !...नि त्यात तुझी धाकटी नणंद...!"

" तिचं काय ?..." प्रमिलानं धास्तावून मध्येच विचारलं होतं..." तिनं तर लोकांना बोलायला जास्तच नेट दिलाय...दोन वर्षांपूर्वी झालं बघ तिचं लग्न ...पण ती ही डोमली तशीच, अजून कशाचाच पत्ता नाही...आता लोक सरळ म्हणतात...ह्यांचं घराणंच ' तसं ' आहे म्हणून."

" म्हणजे सासूबाई,ह्या घरात अजून कुणाचाच पाळणा हलला नाही तर ?..."

प्रमिला अधिकच घाबरली होती...

" तेच तर म्हणते आहे बाई मी मघापासून...आता काही चांडाळ मेले कजबुजतात, यशवन्तदेखील त्यांच्याच चालीवर जाणार म्हणून...आणि खरं सांगू का पोरी तुला, रागावू नको बरं! मी काही तुझी वैरीण नाही...पण सांगते...'पाळणा हलत नाही ह्या घरात ' ह्या भावनेनं यशवन्ताला कुणी मुलगीच द्यायला तयार नव्हतं...अशा घरात कोण देईल ग पोरगी ?...आपल्या पोटच्या गोळ्याच्या आयुष्याचं कोण ग वाट्टोळं करील ? आता तुझी गोष्ट वेगळी म्हणा...गरिबीत वाढलेली तू...त्यातच मेल्या देवानं तुझ्या डोळ्यांत कोंबलं अयब...म्हणून तर तुझ्या बापानं..."

प्रमिलेला त्या म्हातारीचे पुढले शब्द ऐकण्याची जरादेखील इच्छा राहिली नव्हती...सोबत आलेल्या बायकांची वाट न पाहता कष्टी होऊनच ती घरी एकटी परतली होती...घरी गेल्यानंतर तिच्या मनात एकच विचार थैमान घालीत होता ..." ह्या घरात पाळणा हलत नाही...ह्या घराच्या अंगणात मूल कधी रांगणारच नाही..." नि मग तिला वाटू लागलं, " नेमकं हेच...हेच कारण असावं ह्यांचं... मला पसंत करण्याचं...डोळ्यात अधू आहेना मी...तात्यांना ओझं झालं होतं ना माझं...म्हणूनच हे जमलं...तात्यांची चिंता सरली. ह्यांची गरज भागली...संपलं ...व्यवहार जमला ..झालं...

...आणि त्या दिवसापासून प्रमिला तात्यांवर चिडू लागली होती...त्यांना मनातल्या मनात स्वार्थी म्हणू लागली होती...यशवंताशी तर तिनं पूर्ण अबोला धरला होता...त्याला तर तिच्या रुसण्याचं कारण मुळी/समजलंच नव्हतं...दोघं अगदी जवळ असूनदेखील खूप दूर गेले होते...कधी कधी यशवंत तिला विचारी, " प्रमिला, तुला झालंय काय...वेड्यासारखं असं घुमेपणानं बसण्याचं खूळ कसलं शिरलंय तुझ्या डोक्यात ?"...परंतु प्रमिलाच्या ओठांची मिठी सुटत नसे...ती नुसतीच मुकेपणानं, निराश चेहऱ्यानं बसून राही...

...असेच दिवस येत होते...जात होते...प्रमिलाच्या मनात एकच विचारांचा डोंब उसळत होता...जसा थोरल्या जावांच्या घरी पाळणा हलला नाही...तशा आपणही वांझच..."...भिंतीवरलं बाळाचं कॅलेंडर पाहिलं की तिला जास्तच दुःख व्हायचं...रडू फुटायचं...नि मन म्हणायचं, ' वेडे, आता तुला अशीच चित्रं पाहून समाधान मानावं लागेल...' ह्या एकाच विचाराला कुरवाळीत प्रमिला काळ पुढे ढकलीत होती...पण हे करीत असताना तिने यशवंतच्या भावनांना मात्र तडा जाऊ दिला नव्हता...मन मेलेलंच आहे...मग शरीराची का पर्वा करायची...ह्या भावनेनं तिनं मुक्या संसाराचं अशरीरी सुतक पाळलं नव्हतं...

...तात्यांची पत्रं येतच होती..." प्रमिला,...प्रकृतीची काळजी घे...विनूची उचकी थांबली नाही..." इत्यादी इत्यादी...प्रमिला पत्र दूर टाकून देत होती.

...तशातच तिची अन्नावरची वासना उडाली...यशवंत तिला बळे बळे चार घास खाण्याचा आग्रह करायचा...पण तिचं मनच थाऱ्यावर नव्हतं...कधी कधी खूप डोकं दुखायचं...थकल्यासारखं वाटायचं...एकदा तर तिला काही तरी खाल्ल्यानं खूप मळमळायला झालं...रात्रभर तिला त्या दिवशी झोप आली नव्हती...तशीच तळमळत ती पडून राहत होती...घरात सासूही मदतीस नव्हती...तिचा आपला नेहमी सर्वांत थोरल्या मुलाकडे मुक्काम असे...हल्ली त्याचं आजारपण कायम झालं होतं...त्यामुळं तिथून तिला हलता येत नसे...एके दिवशी प्रमिलेला जास्तच त्रास व्हायला लागला...यशवन्त खूप घाबरला...भयग्रस्त मनानं तिला म्हणाला, "प्रमिला,...भलताच हट्ट धरून बसू नकोस...इतके दिवस मी तुझं ऐकलं...आज मात्र तुला माझं ऐकावं लागणार आहे...भरल्या घरात विधूर बनून राहायचं नाही मला...आता तुला या क्षणाला माझ्याबरोबर डॉक्टरकडे यावं लागेल...प्रकृतीची हेळसांड तू करू नकोस म्हटलं तरी तू ऐकायची नाहीस...तुला आता यायलाच पाहिजे." यशवन्ताचा नवा पवित्रा दिसताच प्रमिला निमूटपणे डॉक्टर-कडे त्याच्याबरोबर जाण्यास निघाली...

...डॉक्टरांनी तिला तपासलं...यशवंताला आत बोलावलं...नीट माहिती विचारून घेतली...नंतर काही वेळाने ते यशवंताला हसून म्हणाले,..."यशवन्तराव, तुमच्या मिसेसना काही झालं नाही...अगदी उत्तम तब्येत आहे...त्यांची..."

"पण डॉक्टर...तिला हल्ली जेवण जात नाही...मळमळायला होतं...अन्ना-वरची वासना उडालीय..."

"दॅट्स इट्. यशवन्तराव..." डॉक्टर टॉवेलनं हात पुशीत म्हणाले...आणि दिलखुलास हसले...यशवंताला ते पाहून आनंदानं नाचावंसं वाटलं...

घरी गेल्यानंतर प्रमिलेनं विचारलं, "काय म्हणत होते डॉक्टर...कसली धाड लागलीय मला ?"

"ए...असं भलतंच नको बोलूस..." यशवंत तिच्या ओठांवर हात ठेवीत म्हणाला...."डॉक्टर म्हणाले की..."

"तुमच्या बायकोचा आजार बरा होणारा नाही असंच ना...?" प्रमिलेनं विचारलं....

"चूक,...सपशेल...डॉक्टर म्हणाले की यशवन्तराव, आता लवकरात लवकर पाळणा आणण्याची व्यवस्था करा...."

"काय, पाळणा,..! ...पाळणा ?..."...

परंतु प्रमिलेच्या प्रश्नाला उत्तर द्यायला यशवंत तिथे थांबलाच नव्हता...प्रमिला मात्र तात्यांची मूर्ती डोळ्यांसमोर आणून म्हणत होती..."तात्या...तुम्ही कित्ती कित्ती चांगले आहात हो !..."

●



# दक्षिणायन

### एप्रिल, १५

१२ वाजता गाडी हलली. गेला महिनाभर गाजत असलेला आमचा प्रवास खरोखरच सुरू झाला. प्रवास ठरल्यापासून 'न गच्छेत् ब्राह्मण त्रयम्' या उक्तीचा अनुभव येत होता. पहिल्यांदा तिकिटे काढली आणि माझ्या रजा काढण्यात विक्षेप आला. काढलेली तिकिटे परत केली गेली. श्री. जोशी व पुंडलिक यांनी दोघांनी ठरवल्याप्रमाणे पुढे जावे, असे मी सुचवून पाहिले, पण त्या दोघांनी माझ्याकरता हा दि. १५–४–६७ चा मुहूर्त स्वीकारला होता. श्री. ज. जोशी यांनी पुंडलिकांना ऐकू जाईल एवढया आवाजांत सांगितले होते.—— "दि. १५–४–६७ ला नक्की जायचे आहे. मी त्या सुमारास आजारी पडलो तरी नक्की जायचे! तुम्ही व पुंडलिक आला नाही तरी मी जाणारच!" हा 'च' अध्याहृत राहून अखेर, खरोखरच आम्ही तिघे ठरलेल्या दिवशी निघालो होतो.

आमच्या निघण्याचा उत्साह टिकावा, म्हणून स्टेशनवर बरीच मंडळी जमली होती. सौ. पुंडलिक यांच्या यजमानांविषयक औषधपाण्याच्या गंभीर सूचना सुरू होत्या. त्यांच्या छोटया 'मोनिका'कडे लक्ष लागून सूचना थांबू नयेत म्हणून चि. मोनिका, ही आमच्या सौ. जवळ होती. श्री. माजगावकर व सौ. पुरंदरे हे माझ्या टापटिपीची टिंगल करीत होते. माझी चामडयाची नवी कोरी बॅग ही मला नीट भरता आली नाही या सबबीवर त्यातले सर्व सामान उपसण्यात आले

# वि. ग. कानिटकर

# १

व ती श्री. माजगावकर यांनी पुनः भरली तेव्हा माझे सामान टापटिपीनिशी असे उघडे झाले होते.

श्री. जोशी हे, गाडीला ' स्लीपर कोच ' दिसत कसा नाही या फिकिरीत चेकरच्या मागे टोळक्यातून चौकसपणे फिरत होते. चेकरने तेवढ्यात बाँब टाकला, " आज स्लीपर कोच नाही ! "

स्लीपर कोच नाही ! आम्ही स्लीपर कोचमधून जाणार ते आता इतके मनावर बिंबले होते की, स्लीपर कोच नाही म्हणताच, त्या चांडाळ चेकरला खाऊ की गिळू असे झाले. आता सर्व प्रवास बसून करावा लागणार, गर्दी किती आहे, सुरुवात तर चांगली झाली नाही, अशा नाना विवंचना सुरू होतात न होतात तोच मागच्या फलाटावर ' स्लीपर कोच ' दिमाखाने येऊन थांबला !

तोंडात घास घालताना ऐनवेळी नवऱ्या मुलीने मान फिरवावी व घास सांडण्यापूर्वी पुन्हा ' आ ' करावा तसा हा गोड प्रकार झाला. सामानासहवर्तमान आम्ही तिघे आत घुसलो.

विद्याधर पुंडलिकांचे थोरले चिरंजीव मोठे गंमतीदार बोलतात. त्यांनी मागे म्हणे अनंत काणेकरांच्या घरी गेल्यावर, " तुमच्याकडच्या खुर्च्या हॉटेलमधल्या-सारख्या वाटतात, " असे स्पष्ट मत दिले व काणेकरांनी तावडतोब खुर्च्या बदलल्या,

असा क़िस्सा खुद्द काणेकरांच्या तोंडून मी ऐकला होता. गाडी सुटण्यापूर्वी कुमार संजीव याने असाच गंमतीदार प्रश्न केला—

" बाबा, तुम्ही एवढे मोठे मोठे लेखक आणि स्टेशनवर तुम्हांला कोणीच कसे ओळखीत नाही ?"

सर्व प्रवासभर चि. संजू याचा हा मार्मिक प्रश्न आम्ही विसरलो नाही ! गाडी सुटल्यावर मला कितीतरी वेळ हा प्रश्न आठवून हसू येत होते.

गाडीत जागा खूपच वाटत होती. आमच्या समोरच्या बाकावर एक चौकोनी कुटुम्ब होते. प्रवासाला सुरुवात होऊन तास-दीड तास उलटल्यावर माझे लक्ष त्यांचेकडे गेले. तोपर्यंत आम्ही तिघे एकमेकांशी बोलत होतो व एकंदर पुढच्या प्रवासाच्या कल्पनेने सुखावलेले होतो.

हे केरळीय कुटुम्ब टापटिपीने बॅगा उघडीत होते. लावीत होते. सौ. मेनन यांचे थोराड डोळे, उचललेल्या कमानदार भुवया लक्ष्यणीय होत्या. श्री. मेनन हे कुरळ्या केसांचे तिशीच्या आतले गृहस्थ, सारखे सामान लावीत होते. पुण्याला ते बरीच वर्षे राहत असल्याने त्यांना मराठी समजत होते व तरीही ते आमच्या वडबडीकडे मुळीच लक्ष देत नव्हते. याचे कारण त्यांचा ' कुमार बबलू ' हा पोरगा मोठा गोड होता, आणि ते त्याच्याशी खेळत होते. अलीकडे पलीकडे दोन मद्रासी कुटुंबे होती

गाडी धावत होती. अनेक वाडचा लागल्या. होटगी जंक्शनवरून आमची गाडी पुढे गेली आणि खट्कन थांबली. थोडचा वेळाने गाडी सुरू झाली, परंतु ती उलटचा दिशेने ! गाडी सारखी मागे मागे जात होती. अखेर सांधा बदलून गाडी दुसऱ्या रुळावर बाजूला होऊन थांबली. आम्ही खाली उतरलो. आणि इतर चौकस उतारूं-प्रमाणे प्रश्नचिन्हांकित चेहरे करून इकडे-तिकडे पाहू लागलो. इतक्यात आमची गाडी ज्या रुळावर होती त्या रुळावरून विरुद्ध बाजूने एक एक्स्प्रेस धाडधाड आली आणि निघून गेली ! म्हणजे आमची गाडी जर तशीच पुढे जात राहती तर बहुधा १६–४–६७ ला सकाळी—

' मद्रास जनता एक्स्प्रेसला भीषण अपघात. मृतांत लेखक ' असे ' सकाळ 'मध्ये छापून आले असते !

झाला प्रकार नेमका काय झाला याची आणखी चिकित्सा आम्ही केली नाही. सायंकाळ होऊ लागली नाही, तो हा प्रकार. आता सबंध रात्र कशी जायची ? नाना विचार सतावू लागले. पुन्हा होटगीची केबिन लागली आणि गाडी गाणगा-पुराकडे धावू लागली.

गाणगापूर रात्री ८॥ ला आले. रायचूर हे झोपेत मान वर करून खिडकीतून पाहिले. पुन्हा डुलकी लागली व जागा झालो तो गुंटकल आलेले होते. मोठ-मोठ्याने वाफ सोडीत इंजिन विसावल्यासारखे उभे होते. घड्याळात पाहिले तो तीन वाजले होते. १६–४–६७ ही तारीख सुरू होऊन तीन तास झालेले होते.

तीन वाजले होते. आता उठावे. सौ. ने माझ्याआधी केलेली एकच गोष्ट म्हणजे स्लीपर कोचचा प्रवास. गतवर्षी ती 'टीचर्स कॉन्फरन्स 'साठी अलाहाबादला गेली तेव्हाचा. त्यामुळे तिने दिलेली सूचना अंमलात आणणे भाग होते– " स्लीपर कोच असला तरी तुम्ही सकाळी लवकर उठून सगळे आटपा ! मग पाणी संपते ! " सगळे ठीक आहे. परंतु चहा घेतल्याखेरीज आटपायचे म्हटले तरी सगळे आटोपणे कठीण होते. खाली उतरलो. कुंभारणीच्या घरासारख्या अक्षरांची 'गुंटकल' ही अक्षरे पाटीवर ठळकपणे दिसत होती. ती तेलगू की तामीळ हे समजण्याइतका तेलगू वा तामीळ भाषेशी परिचय नव्हता. गुंटकल हे मोठे जंक्शन दिसत होते. येथून एक फाटा बंगलोरकडे जातो, एक हैदराबादकडे जातो, एक बल्लारीकडे व एक मद्रासकडे.

माझ्यापाठोपाठ जोशी यांना जाग आली. ते खिडकीतून बसल्याबसल्या गुंटकल पाहत होते. मध्येच त्यांनी थर्मास उघडून कॉफी पिऊन टाकली. त्यांच्या आधी उठून मला हे सुचले नाही, याचे मला वाईट वाटले. मी त्यांच्याकडे पाहत राहिलो, तेव्हा ते म्हणाले,–" कॉफी गार झाली होती म्हणून पिऊन टाकली "

आमच्या शेजारचा मद्रासी खाली उतरून इंजिनपाशी उकिडवा बसून काय करतो आहे, हे मला कळेना. इंजिनमधील जाळाचा लाल उजेड त्याच्या उघडचाबंब शरीरावर पसरला होता. तितक्यात इंजिनमधल्या एका कोळसा खेचणाऱ्या माणसाने कॉफीची किटली त्याच्या हातात दिली. तेव्हा मला कळले की पठ्ठ्याने इंजिनमधल्या कोळशावर कॉफी करून घेतली. तो आत आला. त्याची लठ्ठ बायको आळसावलेली होती. तिला त्याने प्रेमाने उठवले व ती दोघे मजेत कॉफी पिऊ लागली.

जोशींनी गार का होईना कॉफी प्याली होती आणि मी मात्र चहा, कॉफी काही येईल म्हणून वाट पाहत होतो. काहीच आले नाही. गुंटकलची समुद्रसपाटीपासूनची उंची वगैरे माहिती व तिथला इंडिकेटर वाचून मी पुन: गाडीत चढलो.

पहाट फुटली दोन्ही अंगाला दगडांचे विस्तीर्ण प्रदेश दिसू लागले. आंध्रमध्ये हा खडपा दगड खूपच. पुरुषपुरुष उंचीचे दगड कापून त्यांची कुंपणे घातलेली दिसत होती. एरगुंठा स्टेशनवर हे गुळगुळीत दगड विकायला आलेले होते.

अनेक ठिकाणी टेकड्यांवर प्रचंड दगड, वेडेवाकडे, एकमेकांच्या अंगावर रेललेले दिसत होते. काही मोठमोठे दगड करंगळीएवढ्या आधारावर कसे काय उभे होते कुणास ठाऊक !

मग १० वाजता मोठे स्टेशन आले ते रेणीगुंठा. हे स्टेशन लवकरच येणार हे गाडीतील गडबडीवरून ध्यानीत आलेले होते. सर्वच मद्रासी मंडळींनी जवळजवळ बांधाबांध सुरू केली होती. तिरुपतीला जाणारी सर्व मंडळी इथे उतरतात. मुंबईला जाणारी लोकल जशी मरीनलाईन्सला एकदम रिकामी होते, तशी गाडी इथे रिकामी झाली. यात्रा खाली उतरताना जो कलकलाट होतो तो इथे जाणवला.

स्टेशनसमोर दूरवर उंच उंच असे हिरवी टोपडी घातलेले पर्वतराज उभे होते. रक्ताळलेल्या पाठी दिसाव्या तसे त्यांचे दर्शनीय भाग तांबडया मातीने माखलेले होते. लहान लहान सुबक घरांची ओळ त्या पर्वतराजीत डोकावर होती. हेच ते, तिरुपतीचे स्थान होते तेथे सरकारने केसांचे टोप करण्याचे कारखाने काढले आहेत. इथे दक्षिण भारतीय लोक मुलांमुलींची जावळे उतरतात व लग्न झाल्यावर तरुण स्त्रिया इथे आपला सर्व केशसंभार एकदा तरी देवाच्या पायावर वाहतात.

नवीनच लग्न झालेली जोडपी–मुंडण केलेली पत्नी व हातात एखादे लहान मूल–अशी तिरुपतीहून परतलेली अनेक मंडळी स्टेशनात परत आलेली दिसत होती.

आता भूक कडाडली होती व इथे आम्ही दहिभाताच्या ३० पैशाला मिळणाऱ्या पुडया घेतल्या. केळीच्या पानात लिंबाची फोड व दहिभात बांधलेला होता. पहिल्याच घासाला 'वा: !' असा शब्द जोशी यांनी काढताच समाधान झाले. प्रवासात आता हा शब्द मोठे महत्त्व पावलेला होता ! पाठोपाठ पुंडलिकांची मानही 'अती' हलली. तोपर्यंत पानावर पसरलेल्या कालवणाकडे खावे की खाऊ नये अशा संशयाने मी पाहत होतो. बोटे बरबटून खाणे मला शक्य वाटेना. सौ. ने आठवणीने बॅगेत घातलेला चमचा याचकरता असावा हे लक्षात येऊन, मी चमचा शोधून काढला व बोटे न चाटता हे दहिभात प्रकरण उदरस्थ झाले. आंब्याच्या लोणच्याने या अल्पोपाहाराला खरोखरच सुंदर चव आलेली होती.

अजून आंध्र संपलेला नव्हताच ! आणि मद्रास यायला म्हणे तीन तास होते. मेनन कुटुंबाने होल्डऑल बांधला होता. बबलूचे व कन्येचे कपडे पालटण्यात आले होते. सौ. मेनन यांचा चेहरा पुन: लखलखीत झाला होता. मेनन यांनी बुशकोट बदलला असता तर बरे झाले असते असे मला उगीचच वाटू लागले. फक्त माझ्या बाकापलीकडचा माणूस उघडयाबंब अवस्थेत निरनिराळया पुडया अजून सोडीत होता.

मुंबईहून पुण्याला येताना, पुणे जवळ येऊ लागले की खिडकीबाहेरचा देखावा जसा बदलतो तसा आता बदलला. मद्रासला जाणारे चांगले रस्ते व चांगल्या सडकादेखील आहेत हे जाणवू लागले. बसेस दिसू लागल्या. गाडीजवळून जाणाऱ्या एका बसमधील उतारूंना मी खेळकरपणे हात हलवला. बसमधले मख्ख चेहरे सूतभरही हलले नाहीत. काळया मडक्यांच्या रांगेसारखी ती मुंडकी आमच्यासमोरून मागेपुढे पळत अखेर मागे पडली.

इतक्यात 'आवडी' स्टेशन आले. इथे काँग्रेस कमिटीने स्वीकृत केलेला तो आवडीचा प्रबंध! तूर्त 'व्हेईकल डेपो' महत्त्वाचा. शांततामय सहजीवन व अहिंसेवर श्रद्धा असलेल्यांचा लोकशाही समाजवाद जिथे नक्की ठरला, तिथेच लष्करी सामग्री उत्पादनाचे केंद्र निर्माण व्हावे हे पाहून मोठी गंमत वाटली.

मग पेरांबूर लागले. इथली कोच फॅक्टरी श्री. मेनन यांनी उत्साहाने खिडकीतून दाखवली. सौ. मेनन याही आता बोलू लागल्या. ज्योत विझताना मोठी होते तसा प्रवास संपता संपता बोलका होतो. "मद्रासमध्ये बायका जशी पातळे नेसतात तशी आमच्या केरळात नेसत नाहीत." सौ. मेनन म्हणाल्या. "आम्ही पाच वारीच नेसतो."

माझ्या मागील बाकावरच्या मद्रासी बाईने केस सोडले व पुन: इतक्या झटपट बांधले की मद्रास येईपर्यंत हिचे आता आटोपणार कसे हा प्रश्न निर्माण झाला नाही. आश्चर्य म्हणजे ही बाई तांबूल चघळत होती. आणि पुन: पुन: आरशात पाहून स्वत:च्या छबीवर खूष होत होती. नवरा एकाग्रतेने सामान आवरत होता.

शेवटी एकदाचे मद्रास आले. एक वाजून चाळीस मिनिटे झाली होती. म्हणजे २५ तास ४० मिनिटांनी आम्ही गाडीतून उतरत होतो.

मद्रास सेंट्रल स्टेशन सामान्य मोठ्या स्टेशनासारखे आहे. बाहेरून बोरीबंदरचा थाट असला तरी आतलं रूप चर्चगेटच्या पूर्वीच्या स्टेशनाइतपतच आहे. खाली उतरलो. परंतु लिमये दिसेनात. श्री. लिमय हे मद्रास येथील एका ऑईल इंजिन कंपनीचे मॅनेजर आहेत. मोठ्या आस्थेवाईकपणे त्यांनी आमची तेथील सोय महाराष्ट्र भवनात केली होती. श्री. पुंडलिक व त्यांचा पूर्वस्नेह होता. परंतु मी व जोशी त्यांना प्रथमच भेटत होतो. अर्थात लिमये यांना शोधण्यासाठी पुंडलिक गेले. थोड्याच वेळात पुंडलिक यांचेबरोबर आमच्याच वयाचा तरतरीत चित्पावनी गोरा माणूस येताना दिसला. हेच ते लिमये असले पाहिजेत हे उघड होते. भेटल्यापासून ते चांगले बोलके आहेत हे पटले व मनावरचे दडपण गेले. स्टेशनातून बाहेर येईपर्यंत त्यांनी मद्रासमधील 'महाराष्ट्रीय मंडळ' या संस्थेचा बराचसा इतिहासही सांगितला. घाईघाईत महाराष्ट्र मंडळाचे (अध्यक्ष का चिटणीस?) कुणीतरी भेटले. त्यांचीही ओळख करून दिली. त्यांच्या मोटारीने आम्ही 'महाराष्ट्र भवना'त आलो. महाराष्ट्र भवनाची इमारत व्हेपेरी भागात रूंडॉल्स स्ट्रीटवर आहे. इमारत प्रशस्त व छान आहे. आमच्यासाठी त्यांनी एक मोठी खोली राखून ठेवली होती. परंतु ती तेथील गड्याने झाडून मात्र ठेवलेली नव्हती! आम्ही पोहोचल्यानंतर तेथील गड्याने खोली झाडली. अर्थात ती मला हवी तशी स्वच्छ झालेली नाही हे माझ्या लक्षात आले व मी केरसुणी तो कुठे ठेवतो हे पाहून ठेवले.

अखेर आम्ही मद्रासला पोहोचलो तर होतो! 'हाय टी' हा शब्द मी प्रथमच श्री. लिमये यांचेकडून ऐकला. त्यांनी यासाठी आम्हांला सायंकाळी पाच वाजता निमंत्रण दिले. पार्टीशास्त्रातील निरनिराळे बारकावे पुंडलिक यांना सहज कळतात.

आम्ही आलेल्या सगळ्यांना चहा देतो, परंतु चहाला बोलावणे वगैरे प्रकार कमीच; जवळजवळ नाहीच. आपले अज्ञान दिसू नये म्हणून मी ' हाय टी ' म्हणजे काय हे पुंडलिकांना विचारले मात्र नाही !

सायंकाळी श्री. लिमये यांचे घरी आम्ही गेलो. तिथे लिमये यांनी शिवरामन् नावाचे तामीळ लेखक व त्यांचे दक्षिण भारतीय सहकारी लक्ष्मीकांत यांना बोलाविलेले होते. लक्ष्मीकांत हा चेहऱ्याने महाराष्ट्रीय वाटत होता. मद्रास येथील ' महाराष्ट्रीय मंडळ ' या संस्थेचे चिटणीस व पेरांबूर कारखान्यातील वर्क्स मॅनेजर श्री. भिडे हेदेखील तिथे आलेले होते. इतकी तरुण माणसे महाराष्ट्रापासून इतक्या लांब येऊन अधिकारपदे भूषवितात हे पाहून मोठेच आश्चर्य वाटले. ज्या भागात श्री. लिमये राहतात हा भाग डेक्कन जिमखाना भागासारखा आहे. गर्भश्रीमंत आणि अभ्रश्रीमंत माणसांचे छोटे छोटे बंगले या ' ट्रिप्लीकेन ' भागात आढळले. श्री. लिमये यांच्या घरासमोरच्या विस्तृत पटांगणात रामनवमी उत्सव चालू होता व पद्मभूषण वसंतलक्ष्मी यांचे गायन चालू होते.

सौ. लिमये यांच्या निरनिराळ्या पदार्थांचा आस्वाद घेत आम्ही आमचे काम सुरू केले होते. श्री. शिवरामन् हे नोकरीला रेल्वेत होते व फावल्या वेळात त्यांनी पुष्कळ कथा, नाटके लिहिली होती. गृहस्थ चांगला उंच, थोराड होता. वर्णाने अतिशय काळा असला तरी पाणीदार डोळे, दाट केस व धारदार नाक ही द्राविडी वैशिष्टचे त्याच्याही अंगी होती. खाली लुंगी असली तरी अंगात टेरिलीनचा शर्ट होता व हातात एक पुस्तक होते. तामीळमधील ते काही फार यशस्वी वा महत्त्वाचे लेखक नव्हते. परंतु त्यांचा तामिळविषयक व साहित्यविषयक उत्साह दांडगा दिसत होता. लक्ष्मीकांत व शिवरामन् यांच्या ओळखीही बऱ्याच दिसत होत्या. सिनेमासृष्टीतील काही व्यक्ती, काही मंत्री, मापुसी हे ' द्रविड अर्सु कळघम 'चे नेते इत्यादी मंडळींशी आमच्या मुलाखती घडवून आणण्याचे त्यांनी उत्साहाने ठरवलेले होते. त्यांच्या उत्साहाला अखेर आम्ही कमी पडलो व त्याचा फायदा आम्हाला पुरता करून घेता आला नाही.

चहा घेऊन आम्ही बाहेर पडलो व वसंतलक्ष्मी यांचे गाणे ऐकत रेंगाळलो. त्यांच्या पल्लेदार व धारदार आवाजातले ते दाक्षिणात्य गायन ऐकू लागल्यावर ओळखीच्या सुराशी व रागदारीशी ते नाते सांगू लागले. आलाप, स्वर, मृदंगांच्या ठेक्यावर जलद आघातांनी भजनासारखा शेवट, अशी या तामीळ गायिकेची पद्धत होती. प्रचंड समाज शांततेने बसला होता. येथील माणसांना शुभ्र पोषाखाचा विशेष नाद आहे, हे अशा मोठ्या समाजाकडे आपण पाहू लागलो की ध्यानात येते. भव्य मंडप, उंच व्यासपीठ, मागे रामपंचायतन, शिवानंदस्वामींचे मोठे चित्र, असे ते समारंभाचे चित्र मोठे छान होते.

थोडा वेळ गाणे ऐकून आम्ही श्री. लिमये यांच्या मोटारीने बीचवर आलो.


मरीना बीच ! जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा समुद्र किनारा. रात्रीच्या काळोखात मरीना बीचचे सौंदर्य काही वेगळेच जाणवत होते. रात्र काळोखी पण चांदणी होती. ओहोटी होती व समुद्र खूप लांबवर गेलेला होता. किनाऱ्याभोवती लांबच लांब निळसर दिव्यांची माळ रुंद छातीवरील माळेसारखी वाटत होती. सागराची चमत्कारिक गंभीरता, दूरवर चमकणाऱ्या लांबच लांब शुभ्र लाटा, क्षितिजावर टेकलेले आभाळ, आकाशातील चांदण्यांचा पट, आणि वाळूत समुद्र-सन्निध बसलेले आम्ही 'जीव' यातले गूढ असे नाते होते तरी काय ? अबोल होऊन तिथेच बसून राहावेसे का वाटत होते ? इथे मुंबईच्या चौपाटीवरचा बकाल-पणा जाणवत नव्हता, की समुद्राकडे पाठ फिरवून बसावे असे वाटत नव्हते. समुद्राच्या सान्निध्यात माणूस अंतर्मुख का होतो ? त्याला जीवनाचे विशालत्व जाणवते की आपली क्षुद्रता अबोल करते ? गप्पा मारायचे ठरवले तरी आमचे संभाषण तुटक–तुटक होत चालले होते. संभाषणात एकमेकांकडे बघावे लागते आणि इथे तर समुद्रात हलणारे दूरवरचे जहाजाचे दिवे म्हणत होते, 'इकडे पाहा.' लांबवरचे दीपगृह पाण्यावर प्रकाश फेकीत म्हणत होते–' इकडे पाहा. '

विस्तीर्ण वाळूच्या त्या मैदानावर तुरळक कसल्यातरी हातगाड्या उभ्या होत्या, परंतु खाण्यासाठी तिथे झोंबी उडालेली नव्हती, की गिऱ्हाईकांना त्या हाका घालीत नव्हत्या. निरीच्छेने तासाभराने आम्ही तेथून उठलो.

समुद्राकडे पाठ करून उभे राहताच, सागरासमोर उभ्या असलेल्या प्रासादतुल्य लाल इमारतींचे सौंदर्य नजरेस पडले. अतिशय सुबक अशा या इमारती मुसलमानी स्थापत्यशास्त्राचे सौंदर्य मिरवीत होत्या. मद्रास विद्यापीठाची इमारत ही मूळ अर्काटच्या नवाबाचा राजवाड्याची वास्तू होय. लाल दगडी इमारती या चुनेगच्ची इमारतींपेक्षा अधिक लोभस वाटतात की काय कुणास ठाऊक ?

आमची मोटार भरधाव चाललेली होती. समुद्रावरून येणारे वारे भणाणत आत घुसत होते. खारट वास आसमंतात सर्वत्र भरला होता. या चवीने आम्ही तृप्त होतो.

निवासावर आलो. थोडा वेळ दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची चर्चा केली व आम्ही ताणून दिली. (अपूर्ण)




व्होल्गाची गती संथ आहे, प्रकृती सुस्त आहे. तिला कशाचीच घाई दिसत नाही. पीटर्सबर्ग (सध्याचे लेनिनग्राड) आणि मॉस्को यांच्या मध्यावर उगम पावणारी ही नदी मोठ्या दिमाखाने प्रथम पूर्वेच्या प्रवासाला निघते. कझान आले की मग तिचे जे दक्षिणायन सुरू होते ते कॅस्पियन समुद्राशी मीलन होईपर्यंत. रशियन संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या लोककथांचा आणि लोकगीतांचा हिच्याच तीरावर जन्म झाला. रशियन जनतेला व्होल्गाचा मोठा आधार वाटतो. सतराव्या-अठराव्या शतकातील शेतकऱ्यांच्या आणि कोसॅक वीरांच्या उठावांना व्होल्गानेच खतपाणी पुरविले. युरोपीय रशिया आणि आशियाई रशिया यांच्यांतील भौगोलिक सीमारेषा उरल पर्वतराजींनी निर्माण केली असली तरी त्यांना अनेक अर्थांनी वेगळे केले आहे ते व्होल्गाच्या प्रवाहानेच. व्होल्गाच्या युरोपीय काठावर असंख्य छोट्या-मोठ्या टेकड्यांची रांगच्या रांग उभी आहे. मंगोल आक्रमकांना पिटाळून लावण्यासाठी रशियन जनतेला जे यश लाभले, त्यातील मोठा वाटा या नैसर्गिक तटबंदीचा आहे. आशियाई काठावरच्या प्रदेशाचे स्वरूप नेमके उलटे आहे. मैलोगणती वाटचाल केली तरी कोठेही उंचवटा म्हणून आढळून येत नाही. सारा सपाट प्रदेश.

व्होल्गाच्या युरोपीय तीरावरच लेनिनचा जन्म झाला. त्याचे शैशव आणि बाल्य विकसले ते येथेच. आनुवंशिक दृष्टीने पाहिले तर त्याच्या धमन्यांतून तार्तार, ग्रेट रशियन व व्होल्गा जर्मन असे तिहेरी मिश्रणाचे रक्त वाहत होते. अस्त्राखान हे त्याच्या वडिलांचे गाव तर आईचे माहेर कझान प्रांतात. व्होल्गाच्या तीरावर वसलेल्या सिंबर्स्कमध्ये उल्यानोव्ह कुटुंबाने आपला संसार थाटला. १८६९ मध्ये हे कुटुंब येथे राहावयास आले, तेव्हा त्यांना दोन अपत्ये होती. ॲलेक्झांडर आणि ॲना. त्यानंतर वर्षभरातच लेनिन जन्मला. त्यानंतर त्याला शिक्षणासाठी सारातोव्ह आणि कझान येथे जावे लागले. समारा शहरालगत उल्यानोव्ह कुटुंबाच्या मालकीची जमीन होती. लेनिन अधूनमधून जमिनीच्या कामासाठी तेथे जाई, तेव्हा गावकरी त्याला छोटे जमीनदार म्हणून संबोधत असत. शिक्षण आटोपल्यानंतर लेनिनने समारामध्येच वकिलीच्या व्यवसायाला प्रारंभ केला. अर्थात या व्यवसायात तो

वि. स. वाळिंबे

# व्होल्गा



२

काही रमू शकला नाही. दोन-चार वर्षांच्या आतच त्याने समाराला आणि वकिली पेशाला रामराम ठोकला. परंतु समारा येथील वास्तव्यातच त्याचा क्रांतिकारक चळवळीशी पहिला परिचय झाला. मार्क्सवादाची दीक्षा त्याने येथेच घेतली. समारा सोडून तो पीटर्सबर्गला गेला. क्रांती हाच त्याचा यापुढचा व्यवसाय होणार होता.

लेनिनच्या बालपणी सिबर्स्क हे अतिशय मागासलेले गाव होते. एका प्रांताची राजधानी म्हणून गावाचे महत्त्व असले तरी ते एका बाजूला असल्यामुळे प्रांतापासून वेगळे पडले होते. वाहतुकीची साधनेही तुटपुंजी होती. उन्हाळ्यात व्होल्गातून नौका-

# जेव्हा लाल होते

वाहतूक चालायची. पण थंडीत व्होल्गा गारठली की सारा व्यापार व ये-जा घोड्यावरूनच करावी लागे. सिझरानपर्यंत असा खडतर प्रवास केल्यानंतर मग पुढे आगगाडीची वाट आढळायची. व्होल्गाकाठी असलेल्या इतर कोणत्याही प्रांतिक राजधानीपेक्षा सिबर्स्क अधिक मागासलेले होते ते या कारणांपायी. त्यामुळे येथील शेतकरीवर्ग आजूबाजूच्या जगापासून दूर पडलेला होता. त्याला बाहेर काय चालले आहे, याची फारशी माहिती नसायची. गावात काही किरकोळ कारखाने होते; परंतु ते इतके लहान होते की त्यामुळे गावकऱ्यांची गरज जेमतेम भागायची. सिबर्स्कमध्ये राहणारा सरदार-दरकदारांचा जुना वर्गही आर्थिक ओढगस्तीमुळे मेटाकुटीला आलेला होता थोडक्यात सांगावयाचे तर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही सिबर्स्क शंभर वर्षे मागेच रेंगाळत होते.

निझनी नोव्हग्रोड, कझान किंवा अस्त्राखान या गावांइतके सिबर्स्क जुनेही नव्हते; त्यामुळे मध्ययुगीन इतिहासाच्या फारशा खुणा येथे पाहावयास मिळत नव्हत्या. दोनशे वर्षांपूर्वी येथे पहिली वस्ती झाली. रशियन रॉबिनहूड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्टेनका रझीनच्या कथा आणि दंतकथा व्होल्गाच्या खोऱ्यात सर्वत्र ऐकू येत परंतु याला अपवाद होता सिबर्स्कचा. या गावाला हे काहीही माहीत नव्हते. लेनिनचा जन्म होण्यापूर्वी येथे दोनच नामवंत व्यक्ती होऊन गेल्या. एक, इतिहासकार कारामझिन व दुसरी कादंबरीकार गोनेंचरोव्ह. परंतु हे दोघेही रशियात त्या काळी वावरत असलेल्या बुद्धिमंतांच्या मानाने इतके सामान्य होते की त्यावरूनदेखील सिबर्स्कच्या बौद्धिक कुवतीचा प्रत्यय यावा. जुनाट वळणाच्या लाकडी इमारती, डोंगराळ भूभागामुळे जिन्यांच्या पायऱ्यांसारखे चढउतार करावे लागणारे रस्ते, गावाच्या मधोमध उभ्या असलेल्या टेकडीच्या टोकावरून दिसणारा व्होल्गाचा सुस्त प्रवाह— एकंदरीत सिबर्स्कचा त्या वेळचा सारा देखावा चेतनाशून्य होता, जीवन कळाहीन होते. दारिद्रय आणि अज्ञान यांनी सिबर्स्कचे जीवन झाकाळून गेले होते.

परंतु लेनिनच्या वडिलांची सांपत्तिक परिस्थिती चांगली असल्यामुळे लेनिनला किंवा त्याच्या भावंडांना दारिद्रयाचा काच सहन करावा लागला नाही. त्याचे वडील इल्या उल्यानोव्ह यांना या छोटेखानी राजधानीच्या सरकारदरबारी मान होता. शिवाय शिक्षणक्षेत्रातील व्यक्ती म्हणून गावातील उच्चभ्रूंच्या गोटातही त्यांचा वावर असे. इल्या उल्यानोव्ह जिवंत असेपर्यंत या कुटुंबाला परिस्थितीची वेडीवाकडी वळणे मुळीच परिचित नव्हती. मुलांना कशाचीच ददात नव्हती. शिक्षकाच्या घरी आढळणाऱ्या शिस्तशीर वातावरणातच लेनिनचे बालपण व्यतीत झाले. साधी पण आदबशीर राहणी, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या उपयोगी पडण्याची परोपकारी वृत्ती आणि ज्ञानोपासनेची आवड यामुळे उल्यानोव्ह कुटुंब सुखाने आणि समाधानाने कालक्रमणा करीत होते. शाळा सुटली की नदीत डुंबावे किंवा मासे पकडावेत,

कोकरासारख्या उडचा मारीत टेकडीचे टोक गाठावे, थंडी पडली की लोकरीचे कपडे चढवून व्होलगाच्या हिममय पृष्ठभागावरून हुंदडावे, वेळ असला तर खांद्यावर बंदूक टाकून लगतच्या जंगलातील पाखरे टिपावीत असा लेनिनचा कार्यक्रम असे. त्यातून उन्हाळ्याची मोठी सुटी सुरू झाली की, लेनिन आईबरोबर कझान प्रांतातल्या कुकुशकिनो या गावी आपल्या आजोळी जायचा आणि मामाच्या पियानोवर बोटे फिरवीत गाणे गुणगुणायचा.

वयाच्या पाचव्या वर्षापासूनच त्याचे घरगुती शिक्षण सुरू झाले. अभ्यासाचे पहिले धडे लेनिनने आईच्या हाताखालीच गिरविले. बुद्धी मुळातच तल्लख असल्यामुळे शाळेच्या वार्षिक परीक्षेत तो चांगल्या रीतीने उत्तीर्ण व्हायचा. शाळेत असताना त्यानें खूप बक्षिसे मिळविली. वाचनाचा तर त्याला पहिल्यापासूनच नाद होता. कादंबऱ्या आणि काव्यसंग्रह हा तर खास आवडीचा प्रांत. वाचनाप्रमाणेच संगीताचीही त्याला आवड होती. आपल्या बालपणाविषयी स्वत: लेनिनने जे काही थोडेबहुत लिहून ठेवले आहे किंवा त्याच्या भावंडांच्या ज्या आठवणी आढळल्या आहेत त्या पाहिल्या की विसाव्या शतकातल्या या महान क्रांतिकारकाच्या भावी जीवनप्रवाहाचा आणि बालपणाचा काहीही कार्यकारणभाव आढळून येत नाही. लेनिनच्या प्रारंभीच्या जीवनासंबंधी आता बरीच माहिती उपलब्ध झालेली आहे. ती पाहिली की सुसंस्कृत आई-वडील, समाधानी गृहजीवन, शालेय अभ्यासक्रमामध्ये प्रशंसनीय प्रगती असे सारे काही सुरळीत चाललेले होते हे दिसून येते. सांगावयाचा इत्यर्थ एवढाच की सामाजिक अन्यायाविरुद्ध मन पेटून उभे टाकावे आणि ते आपोआपच क्रांतिकार्याकडे वळावे असे खडतर जीवन लेनिनच्या वाट्यास आलेले नव्हते, मन विस्कटून जावे असे काहीही घडलेले नव्हते. त्याच्या मनात पहिली ठिणगी पडली ती वयाच्या सोळाव्या वर्षी. अॅलेक्झांडरला—त्याच्या थोरल्या भावाला—झारच्या खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल फाशी देण्यात आले या घटनेमुळे लेनिनच्या तरुण मनावर फार मोठा आघात केला. आतापर्यंत कथा-काव्यविश्वात रमलेले त्याचे मन खाडकन जाग यावी तसे वास्तवाकडे खेचले गेले. अॅलेक्झांडरच्या फाशीची बातमी वाचल्यानंतर तो पोलादी निर्धाराने उभा ठाकला.

अॅनाने—लेनिनच्या थोरल्या बहिणीने—आपल्या आठवणीमध्ये असे लिहून ठेवले आहे की आपले वडील इल्या उल्यानोव्ह हे जसे पराकाष्ठेचे उद्योगी व कष्टाळू होते, तसेच ते शीघ्रकोपीही होते. विनोद त्यांच्या स्वभावाला मानवत नव्हता असे नव्हे. परंतु मूलत: त्यांची प्रकृती गंभीर होती! इल्या उल्यानोव्ह सात वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. इल्या यांचा थोरला भाऊ या वेळी वीस वर्षांचा होता. वडिलांचे छत्र हरपताच आपल्या धाकट्या भावाचे शिक्षण व्यवस्थित पार पडावे म्हणून इल्या यांच्या थोरल्या भावाने शिक्षणाला रामराम ठोकला व


संसाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. आपल्या मोठ्या भावाने आपल्यासाठी केवढा त्याग केला आहे, याची इल्या यांना सतत जाणीव होती ! आपण आपल्या शिक्षणात कसूर करता कामा नये, या जाणीवेने ते झटून अभ्यासाला लागले. इल्या उल्यानोव्ह यांनी आपल्या थोरल्या भावाचा त्याग वाया जाऊ दिला नाही. व्होल्गाच्या मखापाशी वसलेल्या अस्त्राखान येथील शालेय शिक्षण आटोपल्यानंतर इल्या कझान विद्यापीठात दाखल झाले. शाळेतील काय किंवा विद्यापीठातील काय, प्रत्येक परिक्षेत ते चांगल्या रीतीने उत्तीर्ण होत असत. कझान विद्यापीठातील गणिताचे प्राध्यापक लोबॅशेव्हस्की यांचा आवडता विद्यार्थी म्हणून इल्या ओळखले जाऊ लागले. लोबॅशेव्हस्की यांच्या शिफारशीमुळेच इल्या यांना शिक्षण आटोपताच पेन्झा येथील शाळेत विज्ञान व गणित विषयांचे शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. पेन्झानंतर इल्या यांची निझनी नोव्हग्रोड येथे बदली झाली. तत्पूर्वी नुकताच त्यांचा विवाह झाला होता. पेन्झा येथील शाळेत नोकरी करीत असताना अविवाहित इल्या उल्यानोव्ह आपल्या एका शिक्षकमित्राकडे जेवावयास जात असत. तेथेच त्यांचा आणि शिक्षकमित्राच्या बहिणीचा—मारिआ ॲलेक्झांड्रोव्हना ब्लँक हिचा—परिचय झाला व या परिचयाची परिणती विवाहात झाली. यानंतर लवकरच बदली झाल्यामुळे इल्या आणि मारिआ यांनी आपला संसार निझनी येथे थाटला. तेथील वास्तव्यात त्यांना ॲना आणि अलेक्झांडर ही दोन अपत्ये झाली. निझनीस माध्यमिक शिक्षक म्हणून सहा वर्षे काढल्यानंतर इल्या यांना बढती मिळाली. सिबर्स्क प्रांताचे शाळा—तपासनीस म्हणून नेमणूक होताच इल्या आपली पत्नी व दोन मुलांसह सिबर्स्कला राहावयास आले. निझनीसारख्या मोठ्या गावातून सिबर्स्कला येणे इल्या यांना फारसे आवडले नाही. परंतु नव्या बढतीमुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सावरेल या हेतूने त्यांनी स्थलांतर केले.

१८६९ मध्ये इल्या उल्यानोव्ह शाळा-तपासनीस म्हणून सिबर्स्कला राहावयास आले तेव्हा त्यांचे वय ३९ वर्षांचे व त्यांच्या पत्नीचे वय ३५ वर्षांचे होते. सिबर्स्कमधील नव्या नोकरीवर रुजू झाल्यानंतर त्यांना तिसरे अपत्य झाले. २२ एप्रिल १८७० रोजी लेनिनचा जन्म झाला. त्याचे व्लादिमिर असे नाव ठेवण्यात आले आहे. व्लादिमिर म्हणजे जगदीश. रशियाच्या पहिल्या ख्रिश्चन सत्ताधीशाचे ते नाव होते आणि म्हणूनच इल्या यांनी मोठ्या कौतुकाने आपल्या दुसऱ्या मुलाचे ते नाव ठेवले. लेनिन सत्ताधीश झाल्यानंतर सिबर्स्क गावाचे भाग्य उजाडले. उल्यानोव्ह कुटुंब येथे राहत होते म्हणून नंतर सिबर्स्क उल्यानोव्हस्क या नावाने ओळखले जाऊ लागले.

उल्यानोव्ह दांपत्यास एकूण सात मुले झाली. त्यातले एक जन्मताक्षणीच मरण पावले. उरलेल्या सहा अपत्यांचा सांभाळ करण्यात इल्या उल्यानोव्ह व मारिआ ॲलेक्झांड्रोव्हना हे दंग असत. इल्या उल्यानोव्ह यांना फिरती असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याचे कार्य आपोआपच मारिआवर येऊन पडले. परंतु

तिला गृहकामातून फारसा वेळ मिळेनासा झाला तेव्हा उल्यानोव्ह यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे मुलांसाठी घरी खाजगी शिक्षकाची शिकवणी सुरू झाली. सिबर्स्क प्रांतात शिक्षणाचा प्रसार व्हावा, तेथे अधिक शाळा उघडल्या जाव्यात, शिक्षणाचा दर्जा वाढविण्यात यावा यासाठी इल्या उल्यानोव्ह यांचे प्रयत्न चालू होते. परंतु वरिष्ठ सरकारी अधिकारी या प्रश्नासंबंधी इतके उदासीन व बेफिकीर होते की, त्यांना उल्यानोव्ह एवढी धडपड का करत आहेत हे समजत नव्हते. सरकारी अधिकारी लक्ष देत नाहीत, असे आढळून येताच इल्या यांनी नवे शिक्षक तयार करण्यासाठी स्वतःच व्याख्याने देण्यास आरंभ केला. त्यांची ही तळमळ पाहून वरिष्ठ अधिकाऱ्यांना थोडीशी उपरती झाली व त्यांनी इल्या उल्यानोव्ह यांना पुन्हा बढती दिली. सिबर्स्क प्रांतातील प्राथमिक शाळांचे संचालक म्हणून इल्या उल्यानोव्ह काम पाहू लागले. सर्वसामान्य नागरिकांमध्ये शिक्षणाचा फारसा प्रसार होऊ नये असेच सरकारी धोरण असले तरी एखाद दुसऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस उल्यानोव्ह यांच्या प्रयत्नांना उत्तेजन द्यावेसे वाटे. त्यामुळे आपोआपच उल्यानोव्ह यांचा सरकार दरबारी दरारा होता. १८७४ मध्ये त्यांना 'अॅक्चुअल स्टेट कौन्सिलर' हा किताब देण्यात आला व त्यामुळे सिबर्स्कमधल्या उचभ्रू समाजात त्यांचा समावेश होऊ लागला. इल्या उल्यानोव्ह क्रांतिकारक वृत्तीचे होते व त्यामुळे जन्मापासूनच लेनिन बोल्शेव्हिक होता असे जे अधिकृत चारित्रात वर्णन करण्यात येते ते सत्याशी पूर्णपणे विसंगत आहे हे यावरून स्पष्ट होते. शिक्षणाचा प्रसार हाच इल्या उल्यानोव्ह यांचा एकमेव ध्यास होता व या ध्यासापायीच त्यांचे सारे जीवन व्यतीत झाले ही वस्तुस्थिती त्यांच्या विद्यार्थ्यांनीही नमूद करून ठेवली आहे. लेनिन पंधरा–सोळा वर्षांचा असताना इल्या उल्यानोव्ह यांचे निधन झाले. इल्या यांचे निधन होईपर्यंत त्यांच्या घरात क्रांतीचा विचारही शिवलेला नव्हता. लेनिनची आई मारिआ ही तर जमीनदाराचीच मुलगी होती. मारिआच्या वडिलांनी हुंडा म्हणून आपल्या जमिनीचा पाचवा हिस्सा जावयाला दिला होता व त्यामुळेच उल्यानोव्ह कुटुंबाकडे कुकुशकिनो येथील जमीन आली होती. इल्या उल्यानोव्ह यांच्या मृत्युनंतर आपल्या मुलांबाळांची देखभाल करण्यात मारिआचा बराच वेळ जाई. मारिआ दीर्घायुषी होती. १९१६ मध्ये वयाच्या ८१ वर्षी ती मरण पावली. लेनिनला भेटण्यासाठी ती दोनदा स्वित्झर्लंडलाही जाऊन आली होती. परदेशांत राहून क्रांतिकारकाचे उपेक्षित जीवन कंठणाऱ्या आपल्या मुलाबद्दल–लेनिनबद्दल–मारिआला कौतुक वाटे. पण तेही त्यांच्या दृढनिश्चयी स्वभावाचे. त्याची क्रांतीची स्वप्ने त्या वृद्धेसही कळू शकली नाहीत. आपला मुलगा मायदेशी परतावा, असे मारिआला खूप वाटे. त्याप्रमाणे तो परतलाही. एक सामान्य नागरिक म्हणून नव्हे तर नव्या रशियाचा सर्वसत्ताधीश म्हणून ! पण मुलाचे हे वैभव पाहण्याचे मारिआच्या नशिबात नव्हते.

[ अपूर्ण ]




# हिंदु समाज संघटना आणि विघटना

" सर्वांचे पूर्वपरंपरांचे अभिधान एक केंद्र असले, वर्तमान सुखदुःखे अभिन्न असली आणि भविष्यकालच्या आकांक्षा आणि ध्येये समरूप असली म्हणजे तो लोकसमूह समाज या पदवीला पात्र होतो. " या सार्थ आणि समर्पक व्याख्येनुसार हिंदुसमाजाविषयी फार महत्त्वाची मूलगामी चर्चा डॉ. सहस्रबुद्धे यांनी प्रस्तुत प्रबंधात केली आहे. " समआचारविचार, समप्रतिष्ठा, अभिन्न श्रद्धास्थाने, एकरूप ध्येयाकांक्षा या निकषांवर घासून पाहता हिंदुलोकसमूह हा समाज ठरेल काय ? कोठल्याही श्रद्धास्थानाचा, मानबिंदूचा अवमान झाला तर अखिल समाज संतप्त होऊन खवळून उठला पाहिजे, प्राणान्त प्रतिकाराला सज्ज झाला पाहिजे हे लक्षण हिंदुसमाजात दिसते काय ? आज दिसत नसले तर पूर्वी कधी दिसत होते काय ? आणि या लक्षणांनी संपन्न होऊन आत्मरक्षणाचे सामर्थ्य हिंदूंनी कधी प्राप्त करून घेतले होते काय ?" याची वेदपूर्वकालापासूनची साधार आणि सुसंगत छाननी करण्याचा अभ्यासू उपक्रम या प्रबंधात केलेला आहे. आर्य म्हणजे कोण, येथून प्रारंभ करून

# म ह त्त्व पू र्ण मौ लि क वि चा र

## नि शि कां त मि र ज क र

सद्यःपरिस्थितीत हिंदुधर्माच्या संघटनासाठी करण्यात येणाऱ्या आणि करणे आवश्यक आहे अशा प्रयत्नांच्या विवरणापर्यंत फार मोठ्या, विस्तृत आणि व्यापक आलोडनाचा आवाका लेखकाने पेललेला आहे. प्रत्येक विवक्षित मुद्द्याचा अगदी मुळापासून शास्त्रशुद्ध विचार करण्याची ग्रंथकर्त्याची भूमिका आहे आणि इतिहासाच्या तर्काधिष्ठित आलोचनेचा सुस्थिर पाया तिला लाभलेला आहे.

इतिहासाचा मागोवा घेताना डॉ. सहस्रबुद्धे यांनी असे स्पष्ट केले आहे, की आर्य हा शब्द वंशवाचक नसन श्रेष्ठत्वप्रभुत्व, सुसंस्कृतत्व याचा वाचक आहे. यजनशीलता आणि तत्संबद्ध अशी वैदिक संस्कृती हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण होते. सर्वांना वेदनिष्ठ यज्ञप्रधान संस्कृतीत समाविष्ट करावयाचे ('कृण्वंतो विश्वमार्यम्') ही आर्यांची प्रतिज्ञा होती. त्यानुसार शक, कुशान, हूण यांसारख्या रानटी व हिंस्र जमातींचेही त्यांनी आर्यीकरण केले. वेद यज्ञसंस्था व संस्कृत भाषा यांचा प्रसार आर्य ऋषींनी भारतभर केला. लोकसंग्रहाचे व्यापक कार्य आर्यांनी केले. भूमिनिष्ठा आणि राष्ट्राभिमान यांची बीजे त्यांनी येथे रुजविली. याचाच परिणाम म्हणून, प्रचंड सेना घेऊन आलेल्या जगज्जेत्या सिकंदराला येथे तसून् तसू भूमीसाठी संग्राम करावे लागले. त्याच्या मृत्युनंतर त्याच्या सत्तेचा मागमूसही भारतात राहिला नाही. याच भारतनिष्ठेच्या संघटनातत्त्वावर मौर्य साम्राज्य उभारले गेले.

परंतु हिंदुसमाजाचे दुर्दैव असे की, प्रभावी संघटनातत्त्वांच्या बरोबरच विदारक विघटनातत्त्वांचा प्रवाहही निर्माण झालेला होता, आणि त्याचा जोर व वेग हळूहळू वाढत होता. समतेच्या श्रेष्ठ तत्त्वाला खिंडारे पडू लागली होती. चातुर्वर्ण्य, जातिभेद आणि अस्पृश्यता या क्रमाने हिंदुसमाज विनाशाच्या गर्तेच्या पायऱ्या उतरत होता. या भेगा हळूहळू इतक्या रुंदावत गेल्या की हिंदुधर्माचे आणि पर्यायाने हिंदुसमाजाचे एकसंध सलग रूपच नाहीसे झाले.

हिंदुधर्माचे स्वरूप यामुळे अत्यंत विकृत, हास्यास्पद आणि विनाशकारी बनले, मुस्लिम अधिसत्तेला आकार येण्यास हिंदुधर्माचे हे घृणास्पद स्वरूपच कारणीभूत

झाले. "कोठल्याही घटनेचा अर्थ आकळण्याची ऐपतच त्या वेळी हिंदुसमाज-धुरिणांत राहिली नव्हती ... एकादशीसारख्या उपवासाला तांबडा भोपळा चालेल की दुध्या, अस्पृश्यांचा वारा अंगावर आला तर कोणते प्रायश्चित्त घ्यावे, सावली पडली तर कोणते आणि प्रत्यक्ष स्पर्श झाला तर कोणते, मुलीचे लग्न आठव्या वर्षी करावे की सव्वाआठव्या वर्षी, या असल्या गहन व समाजजीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या समस्या सोडविण्यात येथल्या धर्मशास्त्रज्ञांची बुद्धी चोवीस तास गुंतलेली असल्यामुळे मंदिरविध्वंस, स्त्रियांवरील अत्याचार, पारतंत्र्य असल्या क्षुल्लक प्रश्नांचे अर्थ आकळून घेण्यास त्यांना वेळच नव्हता !" विजयनगरच्या साम्राज्याचा अपवाद वजा केल्यास हिंदू समाजाची विजिगीषा कधी उफाळून आलीच नाही.

## 'पराक्रमांची यंत्रे'

शिवछत्रपतींसारख्या महत्त्वाकांक्षी, धोरणी आणि पराक्रमी महापुरुषामुळे मराठी राज्याची निर्मिती झाली आणि थोरले बाजीराव, थोरले माधवराव, महादजी शिंदे यांच्या पराक्रमाने त्याचा साम्राज्यविस्तार केला. तथापि राष्ट्रनिष्ठा, संघटनतत्त्व, ज्ञानार्जनाची हौस, विज्ञानाचा अभ्यास यांच्या संपूर्ण अभावामुळे मराठे म्हणजे केवळ 'पराक्रमाची यंत्रे' बनले. स्वजनविच्छेदात त्यांच्या शक्तीचा अपव्यय झाला. शीखांच्या इतिहासात याचीच आवृत्ती झाली. गुरु गोविंदसिंग वीर बंदाबैरागी आणि महाराजा रणजितसिंग यांसारखी तुरळक दैदीप्यमान नावे सोडली तर शीखांचा समाजही आपसातील दुहीमुळे केव्हाही संघटित होऊ शकला नाही.

आधुनिक काळात लो. टिळक, म. गांधी यांसारख्या राष्ट्रपुरुषांनी राष्ट्रभक्तीतून आणि स्वामी विवेकानंद, राजा राममोहन रॉय, स्वामी श्रद्धानंद यांसारख्या तत्त्वप्रणेत्यांनी धर्मविवरणातून समाजसंघटनेचे साध्य गाठण्याचे प्रयत्न केले. तथापि, आज निधर्मीपणाचा उदो उदो करताना समाजसंघटनेच्या एका महत्त्वाच्या प्रभावी साधनाकडे दुर्लक्ष होते याची जाणीव ठेवली जात नाही. मिशनऱ्यांच्या चिकाटीने धर्मतत्त्वे लोकांच्या मनात बिंबवून त्यांना समान ध्येयाच्या सहजप्रेरणेने एकत्र करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे हे सर्व विवेचन महत्त्वाचे आहेच; शिवाय त्यांच्या तर्कशुद्ध भूमिकेमुळे त्याचे मूल्य फारच उंचावले आहे. "मागील काळच्या वैभवाचे श्रेय जर आपण आपल्याकडे घेतो, आपली धर्मतत्त्वे, आपले असामान्य समाजशास्त्र, आपली स्पृहणीय नीतिमत्ता, आपले चारित्र्य, सर्व विषयांत अप्रतिहत प्रवेश करणारी आपली बुद्धिमत्ता यांमुळेच आपल्याला त्या प्राचीन काळी अतुल वैभव प्राप्त झाले, असे आपण म्हणतो तर पुढे जी अवनती झाली त्या वेळी आपल्या या सर्व गुणांचा लोप झाला असला पाहिजे. आपण त्या थोर तत्त्वांपासून च्युत झालो असलो पाहिजे

आपले थोर चारित्र्य नष्ट झाले असले पाहिजे, हे मान्य करून ते अपश्रेयही आपल्या माथी घेण्याची समंजसता आपण दाखविली पाहिजे. ही वक्तव्यता, हे उत्तरदायित्व आपल्या शिरी घेणे यातच न्याय आहे व यातच उज्ज्वल भविष्याचे बीज आहे." अशा परखड धारणेने डॉ. सहस्रबुद्धे यांनी इतिहासाचे विश्लेषण केले आहे. पूर्वजांच्या गुणांचा जसा त्यांनी सन्मानपूर्वक अभिमानाने उल्लेख केला आहे, तशीच त्यांच्या दोषांची काटेकोर चिकित्साही सर्वत्र केली आहे. भाबडा परंपराभिमान किंवा दूषित दोषैकदिग्दर्शन या दोन्हींपासून त्यांची टीकापद्धती निर्लेप आहे. गुणगौरवामागे स्फूर्तीची तर दोषदर्शनामागे सुधारणेची भावना आहे. लेखकाच्या अभ्यासपूर्ण व्युत्पत्तीचे दर्शन सर्वत्रच घडते. 'नामूलं ब्रूयते किञ्चित्'–आधाराविना काहीही सांगावयाचे नाही, हा व्युत्पन्न टीकाकारांचा बाणा असतो. प्रस्तुत प्रबंधाचा विषय ऐतिहासिक समालोचनावर अधिष्ठित असल्याने तर येथे प्रत्यंतर पुराव्यांचे विशेषच महत्त्व आहे. लेखकाने तो बाणा पुरेपूर अंगीकारला आहे. ऋग्वेद आणि महाभारतापासून तो पाश्चात्त्य इतिहासकारांच्या ग्रंथांपर्यंत ठिकठिकाणचे योग्य उतारे देऊन आपले सिद्धान्त त्यांनी सिद्ध केले आहेत.

## जातिभेदाचे पिशाच

सिद्ध करण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जातिभेदाची निरर्थकता. मूलतः जातिव्यवस्था जन्माधिष्ठित नसून गुणाधिष्ठित होती, अनुलोम–प्रतिलोम विवाह सर्रास होत होते याची असंख्य उदाहरणे प्राचीन ग्रंथांतून त्यांनी दिली आहेत. हिंदुसमाजाचा विनाश अटळ बनविणाऱ्या या दुष्ट रूढीचे वैयर्थ्य आणि त्यातील धोकेबाजपणा स्पष्ट करण्याचा त्यांनी मनापासून प्रयत्न केला आहे. १. हिंदुधर्मात मूलतः जातीजातींत श्रेष्ठकनिष्ठ भाव नव्हता. २. कालांतराने श्रेष्ठकनिष्ठता निर्माण झाली तरी ती कर्माधिष्ठित होती. अनुलोम–प्रतिलोम विवाह होत होते. ३. हळूहळू जातींमध्ये संकुचितपणा आला. ४. संकुचितपणा इतका वाढत गेला की अस्पृश्यता निर्माण झाली. ५. 'परधर्मीयांची चाकरी बरी, पण परजातीशी संपर्क नको' ही हीन विचारसरणी प्रबल झाली. अशा तऱ्हेने जातिभेदाचे हे पिशाच हळूहळू बेभान होत गेले. त्याची करणी हिंदुसमाजाला कशी मारक ठरली हे डॉ. सहस्रबुद्धे यांनी प्रभावीपणे सुस्पष्ट केले आहे.

सध्याची भारताची परिस्थिती अशी बनत चालली आहे की अशा तऱ्हेचे अभ्यासपूर्ण प्रबंध समाजचैतन्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक ठरत आहेत. अनेकविध मानवी प्रवृत्तींना आणि विभिन्न मनोधारणांना एकमेकांच्या सहकार्याने समान कल्याण साधण्यासाठी संघटित प्रयत्नांनी एकत्रित करावयाचे असेल, तर त्यासाठी धर्मभावना हीच एक गोष्ट किती सामर्थ्यशाली ठरते हे इतिहासानेच दाखवून दिले आहे. ते नाकारून काहीच उपयोग नाही. फार तर आपल्याला एवढे करता येईल, की या धर्माने संकुचितपणा आणि प्रतिगामी प्रवृत्ती वाढू नये ही काळजी घेणे

तेवढी सावधगिरी बाळगली, धर्म-प्रवृत्तीला विज्ञानाच्या जाणीवेची जोड दिली आणि व्यापक दृष्टिकोनाने जगाकडे पाहिले तर आजही कोटीकोटींचे समूह या एका रज्जूने बांधले जातील. त्यांच्या हातून आश्चर्यकारक प्रकल्प पार पडतील. मात्र यासाठी इतिहासाचे अवलोकन करून त्याने उघड केलेले सत्य आपण मान्य केले पाहिजे. पूर्वी झालेल्या चुका सुधारल्या पाहिजेत. आत्मपरीक्षण केले पाहिजे. स्वतःच स्वतःचे कठोर टीकाकार बनले पाहिजे.

प्रस्तुत प्रबंधासारख्या विश्लेषक अभ्यासाने हेच साध्य होण्यास मदत होते. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांची परखड टीका, सुयोग्य मूल्यमापन आणि दूरदर्शी मार्गदर्शन यांसाठी हातभार लावील यात शंकाच नाही. अर्थात वाचकांचीही तशी पात्रता असावयास हवी. येथे तळमळीने मांडलेले विचार समजून घेण्याची इच्छा हवी. योग्यता हवी. अन्यथा वेळ घालविण्यासाठी प्रस्तुत ग्रंथ हाती धरणारा वाचक 'इतिहासाचे पुस्तक' म्हणून त्याची संभावना करण्यास कमी करणार नाही. (हे आपल्या समाजाचे आणखी एक दुर्दैव !)

[ 'हिंदुसमाज संघटना आणि विघटना' : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
किंमत सहा रुपये : कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पृष्ठे २६६ ]


## शिवस्वप्न

रसिकांनी गौरविलेल्या प्रफुल्ल दत्त-कृत 'शिवस्वप्न' या श्री शिवछत्रपतिचरित्र गीतावलीचा कार्यक्रम श्री. माधव गोवित्रीकर व त्यांचे सहकारी सादर करीत असतात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी ऐकण्यासारखा हा एक चारित्र्य-संवर्धक एकमेव संगीत कार्यक्रम आहे. सरल भावस्पर्शी गीतरचना व अभिजात शास्त्रीय संगीतावर आधारित आकर्षक चाली, ही या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. पुण्या-मुंबईत 'शिवस्वप्न'चे अनेक कार्यक्रम झालेले आहेत.

पुणे येथे नू. म. वि. सभागृहात १० जून ६७ हा दिवशी हा कार्यक्रम रसिकांना ऐकावयास मिळेल.

परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस
सहा साहसे — दा. सी. देसाई
मूल्य प्रत्येकी दोन रुपये
राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी,**
सायनाचार्य, नासिक
दि. १० ते १६ जून १९६७

**मेष :** नको ते प्रसंग आणि नाही त्या मानगडी या साडेसातीत आपण सहन केल्यात. तो एक खडतर तपस्येचा काळ होता. त्या तपश्चर्येचे फल या वेळी आपल्या पदरी टाकावे अशी ग्रह-स्थितीची इच्छा दिसते.

मुख्यत: शिक्षणासाठी, नोकरीधंद्या-साठी या वेळी आपले स्थानांतर घडेल. आणि त्या नव्या वातावरणात आपले सारे कर्तृत्व पणास लागेल–आणि यशही तसेच नेत्रदीपक लाभेल. या आठवड्या-तील गुरु-शुक्र योगाची ही सारी करामत.

स्थावराचा-वाहनांचा प्रश्नही या वेळी सुटावा. भावी उज्ज्वल भवितव्याची रूपरेषा आखली जावी. सांपत्तिक-दृष्ट्याही हा काल फारसा अनिष्ट जाणवणार नाही.

दि. १३ ते १६ या काळीच बऱ्या-चशा अनुकूल घटना घडाव्यात.

**वृषभ :** धनस्थानी बुध, पराक्रम-स्थानी गुरु-शुक्र, ही अपेक्षासाफल्याची ग्रहस्थिती आपल्या वाट्यास आलेली आहे. हवामान अनुकूल आहे, प्रयत्नांची वल्ही मारलीत की तुमची 'ध्येयनौका' इच्छितस्थली पोचायला कितीसा वेळ लागणार ?

मुख्यत: कला-साहित्याचे क्षेत्र तुमच्या-साठीच राखीव आहे. त्यात तुमच्या अंगच्या अद्‌भुत सामर्थ्याचे दर्शन घडेल.

शिवाय राजकीय वर्तुळातही तुमचा दबदबा वाढू लागेल. अनेक व्यावसायिक कामेही या वेळी गती घेऊ लागतील. इष्टमित्र दिलखुलासपणे तुम्हांला सहकार्य करू लागतील.

मंगलकार्य घडेल. दूरचा प्रवासही घडावा.

दि. ११ ते १४ या वेळी बरीचशी कार्ये अपेक्षेप्रमाणे घडून यावीत.

**मिथुन** : सध्याचा काळ तसा वाईट नाही पण विशेष चांगलाही नाही. सूर्य-मंगळांची कोंडी फुटेपर्यंत थोडेफार हे असेच चालायचे. पैसा हाती बराच येईल पण तो जातो कुठे आणि कसा याचा पत्ता लागेनासे होईल. वेळ निभावेल इतकेच.

धनस्थानी गुरु-शुक्रांची उपस्थिती असल्यामुळे गेल्या कित्येक दिवसांत प्रयत्नांची शिकस्त करूनही जी कामे झाली नाहीत ती या वेळी झटपट होऊन जातील. कामांचा डोंगर उपसला जाईल. थोडाफार सांपत्तिक ताण जाणवला तरी आपले नडणार नाही कुठेच.

या वेळी कौटुंबिक मंगलकार्यात भाग घ्यावा लागेल. तसेच काही सामाजिक क्षेत्रातही जबाबदारीचे ओझे उचलावे लागेल. सर्वत्र यश मिळेल. पण त्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

दि. १३ ते १५ या कालाची नोंद घ्या.

**कर्क** : सध्या आपणांस ग्रहमान अनुकूल असूनही मनावर सतत दडपण पडल्यासारखे जाणवेल. अहोरात्र परिश्रम करून कामाचे डोंगर उपसावे लागतील. थोरामोठ्यांच्या भेटीगाठीने अनेक राजकीय समस्या सोडवाव्या लागतील. क्षणाची उसंत मिळणार नाही पण या धावपळ-धडपडीचे श्रेय मात्र पूर्णांशाने पदरी पडेल.

भावी प्रगतीच्या उभारणीसाठी हे सारे परिश्रम करीत आहात. आणि या वेळी आपणांसही असा आत्मविश्वास वाटू लागेल की, नजीकचा भविष्यकाल आपलाच आहे.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात निर्विवाद बहुमत लाभेल, विरोधी संघटना उभारण्यात यश मिळेल, ज्या ज्या क्षेत्रात आपण पाऊल ठेवाल तिथे तिथे आवाज उठवू लागाल. दि. ११–१३–१६ अपेक्षित यश देणारा काल.

**सिंह** : सूर्य तुमच्या लाभस्थानाकडे यायला निघालेला आहे. तो आपल्या बऱ्याचशा आशाआकांक्षा सफल करायला कटिबद्ध आहे. कारण अशी ग्रहस्थिती पुन्हा वर्षभर आपणांस दिसणार नाही.

आजवरच्या अनेक व्यथा-विवंचना तो मिटवील, व्यापारधंद्यातील घसरण थांबवील, नोकरीतील पेचप्रसंग सोडवून तुमचे जीवन निर्वेध व निष्कंटक बनवील.

मुख्यत: ग्रंथप्रकाशन-छपाई, वृत्तपत्र व्यवसाय आणि अनेक यांत्रिक-तांत्रिक धंदे याला उत्थान देणारी ही वेळ आहे. प्रयत्नांची शिकस्त केलीत तर गेल्या वर्षभरात मिळाले नसेल इतके यश या वेळी मिळून जाईल.

या वेळी नवे स्नेहसंबंध जुळून येतील. मित्र परिवार खूपच वाढेल.

दि. १०–१३–१५ या कालाचे महत्त्व खूपच जाणवेल.

**कन्या** – सूर्य-बुध दशमात तर शुक्रासारखा यशस्वी ग्रह गुरुसमवेत लाभात. या वेळसारखी गुरु-शुक्र युती तर १२ वर्षे तुम्हांला लाभू शकणार नाही.

या सर्वोत्तम ग्रहस्थितीचे सांगणे एकच, " करा, काय ते आता करा. "

या वेळी अफाट पैसा मिळेल आणि अचाट कार्य केल्यामुळे जगात प्रसिद्धी लाभेल. या सबंध वर्षातील अधिकाधिक चांगला काल आगामी १।।–२ महिन्यांचा.

अंगच्या सुप्त गुणांचा विकास होईल, समाजातील अत्युच्च स्थान विनाविरोध लाभू शकेल. प्रतिष्ठा-यश-आरोग्य सर्व काही अपेक्षेबाहेर लाभावे. ईश्वरी कृपेचाही पदोपदी प्रत्यय यावा.

दि. ११–१३–१५–१६ या दिवशी आपल्या ज्या ज्या अपेक्षा असतील त्या त्या पूर्णांशाने सफल व्हाव्यात.

**तूळ** – मंगळ व्ययस्थानी असला तरी त्याचा कायापालट झालेला आहे आणि अष्टमातील सूर्य तुमच्या भाग्यस्थानाकडे वेगाने वाटचाल करू लागलेला आहे. ही लक्षणे तुमचा अनिष्ट काल ओसरल्याची आहेत, असं समजायला हरकत नाही.

या वेळी भावी कार्यक्रमाचे वेळापत्रक आखण्यात येईल. नव्या व्यवसायास प्रारंभ करण्याचे ठरविण्यात येईल.

शिवाय दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य मिळवावे लागेल आणि घसरलेला धंदा सावरण्यासाठी शिकस्तीचा प्रयत्न करावा लागेल. या साऱ्या गोष्टींत घवघवीत यश मिळेलच, पण त्यासाठी अविश्रांत परिश्रम करावे लागतील.

दि. १०–११–१३–१६ या काली सर्वत्र अनुकूल वातावरण दिसू लागेल.

**वृश्चिक** – गुरु-शुक्र युती भाग्यस्थानी झाली त्याच वेळी अंतरिक्षातील साऱ्या ग्रहांनी तुम्हांला वरदान दिले की, " विजयी भव. "

या वर-प्रदानाने तुमची सारी हयात उजळून निघेल. कालाची अनुकूलता लाभली की, साऱ्या गोष्टी कशा अपेक्षेप्रमाणे घडू लागतात याचे प्रात्यक्षिक म्हणून वृश्चिक राशीच्या व्यक्तींचाच नामनिर्देश करावा लागेल.

नोकरीधंद्यांत अनपेक्षितपणे प्रचंड लाभाच्या घटना घडू लागतील. या कालापासून तुमच्या भाग्याला उधाण यायला लागेल.

आपली आजवरची तपश्चर्या याच वेळी फळास यावी. सांपत्तिक लाभ, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय मानसन्मान सारे काही लाभावे.

दि. ११–१२–१३–१६ या कालाची प्रामुख्याने नोंद करा.

**धनू** – आपल्या अनिष्ट ग्रहस्थितीला उतार पडू लागल्याची लक्षणे याच आठवड्यापासून दिसायला लागतील.

या वेळी आपले परिश्रम अगदीच वाया जाऊ नयेत. व्यावसायिक व्यथाविवंचना

मिटायला लागतील. कौटुंबिक वातावरणातील कटुता जाऊन प्रसन्नता दिसू लागेल. या आठवडयात जवळपासचा प्रवास घडेल अथवा राहण्याची जागा बदलावी लागेल.

वृत्तपत्रीय लेखन, यांत्रिक-कार्य व वैद्यकीय व्यवसाय याला हा काल बराच चांगला आणि प्रगतीचा जाणवेल.

विरोधक आता सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येण्यास धजणार नाहीत. मनातील बऱ्याचशा काळज्या या वेळी दूर होतील.

दि. ११-१३-१५ या काली बऱ्याचशा प्रगतिदायक घटना घडाव्यात.

**मकर** – आज सर्वत्र आघाडीवर आहे फक्त मकरराशी. गेल्या आठवडयापासूनच मकरराशी व्यक्तींच्या भोवती तेजोवलय विलसू लागलेले आहे. त्यांचे सर्वच क्षेत्रात महत्त्व आणि माहात्म्य वाढीस लागलेले आहे.

राजकारण हे त्यांचे खास क्षेत्र. त्यात त्यांच्याविना पान हलेनासे होईल. साहित्य आणि कला क्षेत्रांतही त्यांचा भाव वधारू लागेल.

नोकरीधंद्यात अपेक्षेबाहेर यश लाभेल. स्थानांतर घडेल. काहींना परराष्ट्रीय प्रवासही घडेल. शिक्षणात नेत्रदीपक यश लाभेल. वृत्तपत्रीय प्रसिद्धी मिळेल. धनोत्पादनाचे नवेनवे मार्ग दृष्टिक्षेपात येतील. मंगलकार्ये निर्विघ्नपणे पार पडतील.

दि. १३ ते १६ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**कुंभ** – सूर्याचे राश्यंतर घडताच (दि. १५) तुमचेही वातावरण पालटू लागेल, अधिक प्रसन्न दिसू लागेल. मंगळ आठवा असला तरी त्याचा फारसा त्रास आता होणार नाही.

या महिन्यापासून अनेक स्थगित कामे गती घेऊ लागतील. तुमचे शिक्षणासाठी, व्यवसायासाठी लवकरच स्थानांतर घडेल. नवे कार्यक्रम आखण्यात गढून जाल, नवे वेळापत्रक आखण्यात दंग व्हाल.

या आठवडयातील लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, प्रभावी व क्रांतिकारक लेखन घडेल. त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात विशेष मान्यता वाढू लागेल.

सांपत्तिक अडचणी व प्रकृतीची विवंचना बरीचशी दूर होईल.

दि. ११-१३-१५ या काळी अनुकूल गोष्टी घडू लागतील.

**मीन** – अजूनही तुमचे वातावरण अपेक्षेप्रमाण सुधारलेले नसले तरी आता पूर्वीसारखा कंटाळवाणा काल जाणवू शकणार नाही.

गुरु-शुक्र युती तुमच्या पंचमस्थानी होत आहे. या योगामुळे साहित्यिक व कलात्मक प्रवृत्तींचा विकास घडेल. हाती अनेक मार्गांनी पैसा यायला लागेल. सिनेसृष्टीतील कलावंतांना तर या योगाचा अधिकाधिक लाभ होईल.

कौटुंबिक वातावरणात प्रसन्नता जाणवू लागेल, नोकरीधंद्यातील बरेचसे पेचप्रसंग सुटायला लागतील. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील.

दि. १०-१३-१६ या काली अपेक्षित घटना घडाव्यात. ●

## चित्रपट

## मीलन

**जुनी बाटली**
**जुनी दारू**
**लेबलही जुनेच !**

'नावात काय आहे? गुलाबाचं नाव बदललं तरी सुवास बदलणार आहे थोडाच?' असा काहीसा काव्यमय युक्तिवाद विश्वविख्यात कवी–नाटककार शेक्सपिअर करून गेलाय! परंतु हा भवसागर तरून जायला नावाच्या नावेची पदोपदी जरूरी असते.

एखादी नवपरिणीत वधू खाली पाहत, सफरचंदी गालावरील रक्तिमा लपवीत आपल्या मंजुळ आवाजात जेव्हा एखाद्या 'वसंताचं' नाव घेते तेव्हा अवती भवतीच्या रसिकांना ऋतुराज वसंतच अवतरल्याचा भास होत नाही काय? नवऱ्याला नावच नसतं तर हा बहारदार प्रसंग पाहायला मिळाला असता काय? आणि पुढे आयुष्यभर नवऱ्याला नावं ठेवण्याची संधी बायकांना तरी मिळाली असती काय? आणि म्हणे, नावात काय आहे! वा:! पण मी म्हणतो, मग शेक्सपिअरने तरी स्वत:च्या नाटकांना 'हॅम्लेट', 'किंग-लियर' इत्यादी गोंडस, गुलगुलीत नावं कशाला दिली? आणि मुख्य म्हणजे स्वत: तरी 'शेक्सपिअर' हे नाव का धारण केलं? 'अमुक तमुक लेखकाचं अमकं तमकं नाटक' अशा प्रकारे का आपला नाटयसंसार चालविला नाही? की लोकप्रिय झाला म्हणून लोकांना आपलं काहीही सांगायचं?

नमनाप्रमाणे नावालाच घडाभर तेल, अशासाठी की, हल्ली आमच्या हिंदी चित्रपट निर्मात्यांचं कल्पना–दारिद्र्यच इतक्या पराकोटीला पोचलंय की, चित्रपटासाठी नवनवीन कथा सोडाच, पण नावंही त्यांना सुचेनाशी झालीयत् ! आता हेच पाहा नं ! 'प्रसाद प्रॉडक्शन'ने नुकताच चित्ररसिकांना 'मीलन'च्या रूपात जो 'चित्रमय प्रसाद' दिलाय् त्याचं नाव ! ह्याच नावाचा दिलीपकुमारचा चित्रपट पूर्वी एकदा येऊन गेलाय् ! बाकी हल्ली बऱ्याच चित्रपटांना जुन्याच चित्रपटांची नावं सर्रास दिली जात आहेत. उदा.–खानदान, खजाँची, स्ट्रीटसिंगर, देवदास इ. इ.

म्हणजे खऱ्या अर्थाने हे 'मीलन' नव्हे, हे तर 'पुनर्मीलन !' कोणाचे ? चित्रपटरसिक व चित्रनिर्मात्यांचे ! आणि यातल्या कथेत नायक–नायिकेचे मीलन जरी दुसऱ्या जन्मी होत असले तरी प्रेक्षक–निर्मात्यांचे हे तथाकथित मिलन मात्र याच जन्मी अगदी दहा-बारा वर्षानंतरच घडत आहे !

पुनर्जन्म ! कितीदा पुनरुज्जीवन करणार आमचे निर्माते या विषयाचे ? पण आजवर या विषयावरील एकाही चित्रपटाला बॉम्बे टॉकीजच्या 'महल'ची उंची गाठता आलेली नाही ! एकजात सगळी खुजी खुराडी !

बोटीवाल्याचे एका श्रीमंत मुलीवर प्रेम, ही यातली कल्पनाही 'जब जब फूल खिले' मधून उचललेली ! आणि चोरलेले चपखल व चोखपणे सादर करण्याचे चातुर्य तरी अंगी असावे ?

वीस वर्षांपूर्वी घडलेले एक 'बॉय मीटस् गर्ल' प्रकरण नव्या जन्मात नव्या उत्साहाने डोके वर काढते, ही कथा. अर्थातच फ्लॅशबॅक तंत्राने चित्रीत. पण वीस वर्षांपूर्वीचा पोशाख, वातावरणादी सर्व 'जैसे थे' पोझिशनमध्ये यात दिसतात ! जणू वीस वर्षे जग कासवासारखे सुस्त व स्वस्थ एकाच जागी बसून होते ! त्यात कुठलेच परिवर्तन घडले नाही ! बाकी कथा सांगणे म्हणजे केवळ जागा अडवणेच. चित्रपटाचे नाव 'मीलन' म्हणून कथा 'मीलन'ची असे म्हणायचेच. एरवी कथा कोणत्याही सिनेमाला चालेल.

नूतन, सुनील दत्त यांची कामं छानच. लक्ष्मीकांत–प्यारेलालच्या संगीतात तसा नावीन्याचा अभावच. तरीही एक–दोन गाणी 'बॉक्स ऑफिस हिट' ठरावीत ! दिग्दर्शक–अदुर्थी सुब्बाराव असे नाव पडद्यावर दिसते. परंतु प्रत्यक्ष चित्रपटात मात्र हे सुब्बाराव कोठेच दिसत नाहीत ! (कदाचित् त्या पडलेल्या के. सुब्बारावच्या दुखवट्याचा ठराव पास करण्याच्या गडबडीत ते असतील !)

नावासह सर्व चोरीचा माल एकत्रित गुंफण्याचं अवघड कार्य म्हणजेच नेहमीच्या भाषेत–'ष्टोरी पाडण्याचं' काम अत्रेया व मुल्लापुदी.

रंगीत फोटोग्राफीमुळं चित्रपट 'बघनीय'. एरव्ही सारं सारं असहनीयच !!

●

# हिंदी

## पडद्यावरील

# ~~~ प्रणय ~~~

## हिदायतखान

पावसाचं आणि प्रणयांचं नातं काय असावं, कुणाला माहीत; पण पाऊस सुरू झाला की, प्रणयी-जीवांच्या मनात एक अनामिक ओढ निर्माण होते खास.

आता हेच पाहा ना! आषाढ उजाडला. पावसाचे ढग आकाशात जमा झाले नि त्याबरोबर कविकुलगुरू कालिदासाने यक्षाच्या अंतःकरणातील विरहाच्या दुःखाला साकार केलं. 'मृच्छकटिक' या नाटकातील चारुदत्त व वसंतसेना यांचा पावसालाही उबविणारा तो प्रणयप्रसंग. पडदा उघडल्यानंतर रंगभूमीवर दिसणारा हा प्रणयप्रसंग किंवा पडद्यावरच्या प्रणयाला एक वेगळीच प्रगल्भता व कोमलता प्राप्त करून देणारे राज कपूरच्या 'बरसात' मधील ते एकाहून एक सरस प्रणय-प्रसंग पाहा; त्यात तुम्हांला पावसाचं प्रभुत्व प्रकर्षाने पाहावयास मिळेल.

राज कपूरच्या 'बरसात' पासूनच आमच्या हिंदी रजतपटावरील रोमान्सला एक निराळे वळण लागले. तत्पूर्वी झाडाआड लपून हातवारे करीत प्रेमगीत गाणे किंवा तलावात वा सरोवरात खडे मारीत प्रियेशी प्रेमकूजन करणे, हीच आमच्या पडद्यावरील प्रणयाची परिसीमा होती!

राज कपूरचे त्यानंतरचे सर्व चित्रपट, तसेच इतर काही कल्पक दिग्दर्शकांचे 'सुजाता', 'पैगाम', 'धूल का फूल', 'मुगलेआझम' किंवा अगदी अलीकडचे 'मेरे मेहबूब', 'जब जब फूल खिले', 'संगम', 'अनुपमा' इत्यादीं चित्रपटांतील प्रणयदृश्ये फारच वेधक होती. काहींची हाताळणी तर अतिशय हळुवारपणाने करण्यात आलेली होती.

'सुजाता' या चित्रपटातील अधीर व सुजाता यांच्या भेटीचा बागेतील तो प्रसंग, भयतांची एकांतातील ती प्रथमभेट. नववधूसारखी लाजरी-बुजरी. दोघांनाही खूपखूप बोलायचे असते, परंतु शब्द ओठांवरच अडखळतात. शब्दांची भाषा दगा

देते. हात देते ती केवळ डोळ्यांची भाषा. नाहीतरी प्रमात हीच भाषा अधिक प्रभावी ठरते. पण मग डोळ्यांना जे सौंदर्य दिसते ते हवेसे वाटते हातांना! 'अधीर' कमालीच्या अधीरतेने 'सुजाता'ला स्पर्श करतो. अननुभवी, अनाघ्रात 'सुजाता'ला झालेला तो पहिलावहिला पुरुषाचा स्पर्श! ती अक्षरशः थरथरते, बावरते. तिच्या डोळ्यांच्या पापण्या फडफडतात. जमिनीकडे झुकतात. त्याच वेळी लाजाळूची पाने हस्तस्पर्शामुळे मिटत आहेत, अशा 'मॉंटाज'चे 'क्लोजअप्' पडद्यावर दिसते आणि दिग्दर्शकाच्या कल्पकतेचे कौतुक वाटते. प्रणयाचे केवढे हळुवार तरीही मनोहर चित्रण हे!

... तसाच 'पैगाम'मधील तो प्रसंग ... निळ्याशार जलाशयाकाठी एक प्रणयी-युग्म येऊन बसते. दोन प्रेमिकांची पहिली भेट. काय बोलावं, कसं बोलावं याचा विचार करीत उभयताही किती तरी वेळ स्तब्धच. वातावरण निःशब्दच.

शेवटी, वल्लभाला एक युक्ती सुचते. तो ती लगेच अंमलातही आणतो. तो आपल्या प्रियेला बळेच विचारतो, "अं ? काय म्हणालीस ?"

जसं ती काहीतरी म्हणाली होती आणि ते बिचाऱ्याला ऐकूच आले नव्हते!

"कुठं काय ?" प्रिया उत्तरते.

मग तो याच युक्तीची पुनरुक्ती करतो. प्रियेलाही मग त्यातली खोच कळते. ती खळाळून हसते. तोही. अशा प्रकारे ती अबोल भेट एकदाची बोलकी होते...

'मेरे मेहबूब' मधला पडदानशीन प्रणय. पडद्यांचा अडसर न जुमानणारा पण तरीही संयमित, शालीन.

'जब जब फूल खिले' मधला रांगड्या प्रियकराचा प्रणय त्याच्या हातातील काश्मिरी कुसुमांसारखा कोमल वाटतो. रसरशीत वाटतो. काश्मीरच्या नयन-मनोहर पार्श्वभूमीवरील नंदा-शशी कपूरचा तो आगळा व काहीसा बावळा प्रणयही १४ कॅरेटच्या जमान्यात अगदी अस्सल बावनकशी वाटतो.

पुनः 'धूल का फूल'मध्ये पावसाच्या व प्रणयाच्या अनामिक व अतूट नात्याच प्रत्यंतर घडतं.

...पावसापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी दोन प्रेमी-जीव एका पर्णकुटीचा आश्रय घेतात. पावसाचं धुंद-फुंद वातावरण, वादळाचं तांडव-नर्तन, त्यांच्या भावनांना-संवेदनांना आवाहन करते.

आसमंतातील वादळ वाढतं. काहीसं भडकतंच. इकडे त्या प्रणयीजनांच्या शरी-रातही तुफान उठतं! ते दोघेजण हळूहळू पर्णकुटीत शिरू लागतात—त्या शरीरां-तर्गत तुफानाला तोंड देण्यासाठी!

ह्या प्रसंगात उत्तानतेला अधिकतर वाव असूनही दिग्दर्शकाने त्याचा कोठेच अतिरेक होऊ दिलेला नाही, हे कौतुकास्पद.

उभयता प्रेमिक भावभावनांच्या आहारी जात असल्याचं त्यांच्या चेहऱ्यावरील

भावांवरून, अर्थपूर्ण हालचालींमधून नुसते सुचित करण्यात आलेले आहे.

नुकताच वैशिष्टयपूर्ण चित्रपट म्हणून गाजलेल्या 'अनुपमा' मधील शर्मिला व धर्मेंद्रची बागेतील भेट. धर्मेंद्र तिला फुले मागतो पण ती देत नाही. तेथेच टाकते आणि धूम पळते. नंतर धर्मेंद्रला फुले मिळतात! केव्हा? तिने त्याच्या प्रेमाचा स्वीकार केल्यावर! ती गाव सोडून निघून गेल्यावर!

हिंदी पडद्यावरील प्रणयाचा परामर्श घेताना मला काही बंगाली, मराठी चित्र-पटांतील वैशिष्टचपूर्ण प्रणयदृश्येही आवर्जून आठवतात.

वस्तुत: बंगाली चित्रपटात प्रणयाला मुळीच प्राधान्य नसते. पतिपत्नींतील प्रणयदेखील त्या चित्रपटातून क्वचित्‌च चित्रीत केलेला आढळतो. 'पाथेर पांचाली' व 'चारुलता' ह्यात पतिपत्नींच्या प्रणयांचे माफक पण मोहक चित्रण आढळते. 'नायक'मध्ये नायकावर एक अजाण, आजारी मुलगी फिदा असल्याचे दिसते तर त्याची मुलाखत घेऊ इच्छिणाऱ्या एका स्त्री-मासिकाच्या संपादिकेवर त्याचा जीव जडतो; त्याचे मर्मभेदक तरीही मनमोहक चित्रण आढळते.

'क्षुधित पाषाण' या रवींद्रनाथ टागोरांच्या कथेवरील चित्रपटात एका विलासी राजाच्या जनानखान्यातील एका सुंदरीचा अतृप्त आत्मा राजवाड्यात भटकत असतो, त्यावरच नायकाचे प्रेम जडते, याचे आगळे वेगळे दर्शन घडते.

अली अकबरखाँ यांच्या प्रभावी पार्श्वसंगीतामुळे त्या वेगळ्या धर्तीच्या कल्प-कतापूर्ण हाताळणीने नटलेल्या प्रणयप्रसंगाचे सौंदर्य वाढते.

मराठी माणसाचं भांडणावर जरी प्रेम असलं तरी प्रेमाशी काय भांडण आहे, कोण जाणे! कारण मराठी पडद्यावरील प्रणय अगदीच भिकार असतो. २५ वर्षांपूर्वीसारखा शिळा वाटतो!

एक तर मराठी चित्रपटात सहसा तमाशा असतो, त्यामुळे तेथे सगळा रांगडा कारभार.

तथापि अशाच एका तमाशा चित्रपटातील—'पंचारती'मधील—चंद्रकांत—सुलोचना यांचा तो प्रणय—प्रसंग फारच सुंदर होता.

सकाळी उठल्यापासून घरातून बाहेर पडण्यापर्यंतचा बायकोबरोबरच नवऱ्याचा सुखसंवाद व त्या वेळचा सुलोचनाचा लज्जा, प्रेम इत्यादी भावनांचा आविष्कार फारच अप्रतीम होता. पण बोटांवर मोजण्याइतकीच अशी उदाहरणे.

'everything is fair, in love and war' असे म्हटले जाते. परंतु पडद्यावरील प्रणयाबाबत ही सवलत बहाल करून कसं चालेल? कारण मग आमचे दिग्दर्शक हिंदी पडदेही चुंबनाने 'ओले' केल्याशिवाय राहतील काय! मागे कोणी तरी तशी मौलिक (!) सूचना केलीही होती. ●

[ बिहार परिवार : पान ७ वरून ]

" आमचे प्रतिनिधी थेट बिहारमध्ये जाणार आहेत अन् तिथे अन्नछत्र उभारणार आहेत. म्हणजे असं पाहा की आपण दिलेला प्रत्येक पैसा बिहारी माणसाला निश्चित मिळणार. पैसे खाल्ले जाण्याची शक्यता यामुळं अजिबात नाही !"

...चेहेऱ्यावर प्रसन्नतेचं साम्राज्य असे ! आठयांचा मागमूस नसे ! !

" आपल्याला ' माणूस ' माहीत असेल ? "

" कोण माणूस ?"

" अहो, असं काय करता ' माणूस ' साप्ताहिक माहीत नाही काय ? त्याचा आम्हाला पाठिंबा आहे ! करता ना मदत ? "

...ओठांतून नकळत एखादं स्मित घरंगळत बाहेर पडे आणि मग फक्त पाकीट उघडल्याचा आवाज होई...नोटा बाहेर निघत..पावती फाडली जाई. पैसे देणाऱ्याच्या चेहेऱ्यावर समाधान पसरे; पावती देणाऱ्याचा चेहरा आनंदात फुलून येई. दोघांनाही एका बिहारी माणसाला एक महिना वाचवण्याचा आनंद मिळे ! ...

हे असं रविवारी दुपारपर्यंत चाललं होतं. दुपारी कामगारांनी जेवण दिलं... तितक्याच आपुलकीनं ! तीन वाजता शेवटची फेरी झाली. पाच वाजता काम थांबलं. डॉक्टरांकडे चहा झाला. भेळेवर सर्वजण तुटून पडले ! सर्वांचा प्रेमानं निरोप घेऊन, जमलेले एकवीसशे रुपये बरोबर घेऊन, आम्ही चाळीसजण उत्साहानं परतलो...पुण्याकडे ! !

...अखेर पुणं स्टेशन आलं. दोन दिवसांच्या सतत श्रमानं दमलो होतो. पाऊल उचलणं जड जात होत. वीरांगना अतिशय थकल्या होत्या...तरीदेखील प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास होता...लोकांबद्दल कृतज्ञता होती आणि हे सर्व पैसे बिहारी माणसाला पोहोचविण्याच्या जबाबदारीची जाणीवदेखील होती ! !

रविवार दिनांक २७ मे, या दिवशी पहिली चार विद्यार्थ्यांची तुकडी सिकंदराबाद एक्स्प्रेसने निघालीही. अनिल अवचट, रवींद्र गुर्जर, अनिल दांडेकर आणि अरुण फडके. पुणे स्थानकावर या तुकडीला निरोप देण्यासाठी या चौघांचे नातेवाईक, मित्र आणि यूथ ऑर्गनायझेशनचा तमाम जथा जमला होता. माधवराव पटवर्धन होते, इंदिराबाई मायदेव होत्या, भाऊसाहेब नातू होते आणि श्री. ग. माजगावकरही.

*या तुकडीबरोबर बिहारमध्ये खर्च करण्यासाठी एकूण १५०० रुपयांचा निधी व दोन खोकी औषधे पाठविण्यात आली.*

*या तुकडीला प्रथम कोल्हापूरच्या तुकडीशी संपर्क साधण्यासंबंधी अवश्य त्या सूचना देण्यात आल्या.*

*दुसऱ्या तुकडीची जमवाजमव येथे सुरू आहे.*

●

साप्ताहिक ' माणूस '

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

राजा शिवछत्रपति

सप्रेम भेट.

• •

सप्रेम भेट योजना : १ जून ते १५ ऑगस्ट १९६७

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.